

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५५ * अंक १७८ * | * नागपूर * | रविवार, दिनांक २८ सप्टेंबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## थोडक्यात..

### इस्रायलचा गाझात हल्ला ३२ जणांचा मृत्यू

■ **तेलअविव :** इस्रायलने गाझामध्ये मोठ्या प्रमाणात हवाई हल्ला केला आहे. या हवाई हल्ल्यात रात्रीच्या वेळी किमान ३२ जणांचा मृत्यू झाला. युद्धबंदीसाठी वाढत्या आंतरराष्ट्रीय दबावादरम्यान हे हल्ले झाले आहेत, परंतु इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू युद्ध सुरू ठेवण्यावर ठाम आहेत. नुसीरत निर्वासित छावणीत एकाच कुटुंबातील नऊ जणांचा मृत्यू झाला. न्यू यॉर्कमधील संयुक्त राष्ट्रांच्या महासभेला संबोधित करताना नेतान्याहू यांनी आपला देश हमासविरुद्धचे काम पूर्णपणे संपवू इच्छितो असे म्हटल्यानंतर लगेच हे हल्ले झाले.

### वांगचुक यांच्यावर एनएसए जोधपूर तुरुंगात रवानगी



**लेह :** लडाखचे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना शुक्रवारी दुपारी त्यांच्या उल्याक्टोपो या गावात पोलिसांनी अटक केली. त्यांना राजस्थानमधील जोधपूर मध्यवर्ती कारागृहात विमानाने नेण्यात आले. वांगचुक यांच्यावर राष्ट्रीय सुरक्षा कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२४ सप्टेंबर रोजी लेहमध्ये झालेल्या हिंसाचारासाठी सरकारने वांगचुक यांना जबाबदार धरले, ज्यामध्ये चार तरुणांचा मृत्यू झाला आणि ४० पोलिस अधिकाऱ्यांसह ८० लोक जखमी झाले. आतापर्यंत साठ जणांना अटक करण्यात आली आहे.

लेहमधील परिस्थिती अजूनही तणावपूर्ण आहे. सलग चौथ्या दिवशी कर्फ्यू लागू करण्यात आला आहे आणि शाळा आणि महाविद्यालये बंद आहेत. खबरदारी म्हणून प्रशासनाने मोबाईल इंटरनेट सेवा देखील बंद केल्या आहेत.

## काळरात्र... काळी पहाट!

# तीन अपघातात १५ ठार

### वर्धा जिल्ह्यात चौघांचा मृत्यू : छत कोसळून ६ ठार : कार अपघातात ५ दगावले

■ **वृत्तसंस्था / महासागर प्रतिनिधी**
**रायपूर, गुरुग्राम, वर्धा, दि. २७ :**

शुक्रवार २६ सप्टेंबरची रात्र १० जणांसाठी काळरात्र ठरली तर शनिवारची पहाट हरियाणातील ५ जणांसाठी काळी अशीच उगवली. शुक्रवारी रात्री छत्तीसगडच्या रायपूर येथे स्टील कंपनीचे छत कोसळून ६ जणांना जीव गमवावा लागला. विदर्भाच्या वर्धा जिल्ह्यात शुक्रवारी रात्री कारच्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. याच जिल्ह्यात वीज कोसळून दोघे दगावले. तिकडे, हरियाणाच्या गुरुग्राममध्ये महागड्या कारच्या अपघातात ५ जणांना जीव गमवावा लागला.

छत्तीसगडच्या रायपूर जिल्ह्यातील सिलातारा परिसरात असलेल्या गोदावरी स्टील प्लांटमध्ये शुक्रवारी (२६ सप्टेंबर) झालेल्या भीषण अपघातात सहा कामगारांचा मृत्यू झाला असून सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातावेळी सुमारे २०० कामगार उपस्थित होते.

जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक लाल उम्मेद सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, कामगार प्लांटमध्ये काम करत असताना जड छतासारखी रचना अचानक कोसळली. या दुर्घटनेत सहा जणांचा जागीच मृत्यू झाला तर सहा जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळी आणखी लोक गाडले असल्याची भीती वर्तवण्यात येत असून, बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

अपघाताची माहिती मिळताच पोलिस व बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह आणि जखमींना तात्काळ रुग्णालयात हलवण्यात आलं. वरिष्ठ पोलिस अधिकारीही घटनास्थळी उपस्थित राहून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. या दुर्घटनेवर मुख्यमंत्री विष्णु देव साई यांनी शोक व्यक्त केला.



रायपूर जिल्ह्यात कोसळलेले स्टील प्लँटचे छत | वर्धा जिल्ह्यात अपघातग्रस्त कार | गुरुग्राममध्ये कारचा चुराडा

**वर्धा :** नागपूर वर्धा बायपास मार्गावर इव्हेंट सभागृहापुढे झालेल्या कार अपघातात दोघांचा मृत्यू झाला. नागपूरवरून कार भरधाव वेगात वर्धेकडे येत असताना चालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे कार अनियंत्रित झाली आणि दुभाजक ओलांडून कंटेनरला धडकली. कारमधील कमलाबाई ठाकूर (वय ८५) व गजानन तिडके (वय ४७) या दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर अनुप्रिया रणजितसिंग ठाकूर, अवंतिका ठाकूर व कारचालक दीपक हे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना सावंगीच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रणजितसिंग ठाकूर यांचा महिन्यापूर्वीच मृत्यू झाला असून, या कुटुंबावर संकट कोसळले आहे.

शुक्रवारी रात्रीच घडलेल्या दुसऱ्या एका घटनेत काका पुतण्याचा वीज पडून मृत्यू झाला. हिंगणघाट तालुक्यातील वायगाव निपाणीलगत असलेल्या भिवापूर येथे ही घटना घडली. येथील अनिल दत्तूजी ठाकरे (वय ४१), सौरभ गजानन ठाकरे (२५) व वेदांत अनिल ठाकरे (१८) हे तिघे मोटारसायकलने निघाले होते. जोरदार पाऊस सुरू झाला. धोका नको म्हणून ते वाटेत एका झाडाखाली थांबले. रेनकोट घालून उभे असतांना वीज या गाडीवर पडली. त्यात अनिल दत्तू ठाकरे व सौरभ गजानन ठाकरे हे जागीवरच ठार झाले.

हरियाणातील गुरुग्राममध्ये शनिवारी सकाळी एक भीषण रस्ता अपघात झाला. राष्ट्रीय महामार्गावरून बाहेर पडताना थार कार दुभाजकाला धडकल्याने पाच जणांचा मृत्यू झाला. तीन मुली आणि तीन मुले थारमध्ये होती. ही घटना पहाटे ४:३० वाजता घडली. दोन तरुण आणि तीन तरुणी जागीच ठार झाल्या, तर एकाची प्रकृती गंभीर आहे.

राष्ट्रीय महामार्ग एक्झिट ९ वर एक भीषण अपघात झाला. हा अपघात वेगामुळे झाला. हे सहा जण उत्तर प्रदेशहून गुरुग्राममध्ये काही कामासाठी आले होते. घटनेची माहिती मिळताच, पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह ताब्यात घेतले. त्यांनी तपास सुरू केला आहे. प्रतिष्ठा मिश्रा असे एका तरुणीचे नाव आहे. सहा जणांपैकी पाच जणांचा मृत्यू झाला आहे आणि एकाची प्रकृती गंभीर असून त्याला गुरुग्राममधील मेदांता रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या कुटुंबियांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## काँग्रेस अजूनही सुधारत नाही

### मोदीचे टीकास्त्र



■ **वृत्तसंस्था**
**भुवनेश्वर, दि. २७ :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी ओडिशातील झारसुगुडा येथे पोहोचले. त्यांनी सुमारे ३८ मिनिटे जनतेला संबोधित केले. यादरम्यान त्यांनी स्वावलंबी भारत, जीएसटी बचत महोत्सव आणि काँग्रेसच्या राजवटीत भ्रष्टाचार यासारख्या मुद्द्यांवर भाष्य केले.

पंतप्रधान म्हणाले की, जेव्हा दूरसंचार क्षेत्र सुरू झाले तेव्हा भारत मागे पडला होता. सोशल मीडियावर विनोद फिरत होते. त्यांना आश्चर्य वाटले की काय लिहिले आहे. आता, भारत स्वदेशी ४ जी तंत्रज्ञान असलेला पाचवा देश बनला आहे.

मोदींनी काँग्रेसशासित राज्यांमध्ये सुरू असलेल्या लुटीचाही उल्लेख केला. पंतप्रधान म्हणाले, केंद्र सरकारने कर कमी केले आहेत, परंतु हिमाचल प्रदेशातील काँग्रेस सरकार जनतेला त्याचे फायदे देत नाही. ते स्वतःचे कर लादून लुटण्यात गुंतले आहेत. त्यांनी अजूनही त्यांच्या कारवाया थांबवलेल्या नाहीत.

पंतप्रधानांचा १५ महिन्यांतील हा सहावा ओडिशा दौरा होता. त्यांनी ६०,००० कोटी रुपयांच्या अनेक प्रमुख रेल्वे, शिक्षण आणि आरोग्य प्रकल्पांचे उद्घाटन केले आणि बीएसएनएलच्या स्वदेशी ४जी तंत्रज्ञानाचाही शुभारंभ केला.

## तमिळ अभिनेता विजयच्या रॅलीत चेंगराचेंगरी

# ३२ जणांचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, नमक्कल, दि. २७ :**

तामिळनाडूतील नमक्कल येथे अभिनेता विजयच्या रॅलीत चेंगराचेंगरी झाली. तामिळनाडूचे आरोग्यमंत्री एम.ए. सुब्रमण्यम यांनी सांगितले की, या अपघातात २९ जणांचा मृत्यू झाला आहे, ज्यात अनेक मुले आहेत. ३० हून अधिक लोक जखमी झाले आहेत.

टीव्हीके (तमिलगा वेत्री कळघम) चे प्रमुख आणि अभिनेता विजय यांच्या रॅलीत मोठ्या संख्येने लोक जमले होते. गर्दी इतकी वाढली होती की, परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागली. अभिनेता-राजकारणी असलेले विजय गर्दीला संबोधित करत होते. काही लोक बेशुद्ध पडल्यानंतर त्यांना त्यांचे भाषण थांबवून रॅली सोडावी लागली.

सीएम स्टॅलिन यांनी घटनेबद्दल दुःख व्यक्त केले. ते म्हणाले, मंत्री अनबिल महेश यांना घटनास्थळी पाठवण्यात आले आहे. त्यांनी पोलिस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना तातडीने परिस्थिती पूर्ववत करण्याचे आदेश दिले आहेत.

असे वृत्त आहे की, गर्दी इतकी मोठी झाली होती की लोकांना श्वास घेणेही कठीण झाले होते. अचानक तिथे उपस्थित असलेले लोक आणि कार्यकर्ते बेशुद्ध पडू लागले. त्यानंतर अभिनेता विजयने आपले भाषण थांबवले आणि लोकांना शांतता राखण्याचे आवाहन केले. त्यांनी आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना गरजूंना मदत करण्याची आणि त्यांना रुग्णवाहिकेत पोहोचवण्याची विनंती केली.

## सामाजिक, आर्थिक समानता निर्माण करणे ही सामूहिक जबाबदारी

### सरन्यायाधीश भूषण गवई यांचे प्रतिपादनः जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण

■ **दीपक भावसार**
**नाशिक, दि. २७ :**

देशातील सर्वच नागरिकांसाठी सर्वात मोठा ग्रंथ म्हणजे भारताचे संविधान आहे. भारतीय संविधानामुळेच प्रत्येकाला सप्त स्वातंत्र्ये प्राप्त झाली असल्याचे स्पष्ट करीत देशात सामाजिक, आर्थिक समानता निर्माण करणे ही सामूहिक जबाबदारी आहे. राजकीय लोकशाहीबरोबरच सामाजिक, आर्थिक समानतेकडे वाटचाल होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले. यावेळी त्यांनी याबाबतचे विविध दाखले देत राज्यघटनेचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत समानतेचा पुरस्कारही भाषणातून केला.

येथील नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नूतन आधुनिक इमारतीचे लोकार्पण तथा उद्घाटन सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते मनोगत व्यक्त करताना बोलत होते.

व्यासपीठावर मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर, न्या. रेवती डेरे मोहिते, न्या. एम.एन. सोनम, न्या. आर. व्ही. घुगे, न्या. ए.एस. गडकरी, न्या. मकरंद कर्णिक, न्या. सारंग कोतवाल, न्या. जितेंद्र जैन, न्या. अश्विन भोबे, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऑफ इंडिया अनिल सिंग, राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीचंद



जगमलानी, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे अध्यक्ष अमोल सावंत, नाशिक वकील संघाचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य जयंत जायभावे, ॲड. अविनाश भिडे यांचेसह बार कौन्सिल व वकिल संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

शनिवारी सकाळी जिल्हा न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते झाल्यावर येथील पोलिस कवायत मैदानावर आयोजित भव्यदिव्य कार्यक्रमात गवळी यांनी जनतेला उद्देशून भाषण केले.

यावेळी त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या समानतेच्या नीतीचा उहापोह करीत राजकीय लोकशाहीबरोबर सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचाही पुरस्कार केला.

देशातील नागरिकांना राजकीय अधिकार देण्यासोबतच सामाजिक आणि आर्थिक समानता देण्याची गरज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केली होती. आजच्या काळात ही समानता निर्माण करणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले.

गवई म्हणाले की, डॉ. आंबेडकर यांनी २५ नोव्हेंबर १९४९ रोजीच्या भाषणात एक व्यक्ती, एक मत या आधारावर राजकीय समानता निर्माण केल्याचे म्हटले होते. मात्र, सामाजिक आणि आर्थिक लोकशाही निर्माण झाली तरच या लोकशाहीला अर्थ असेल, असे मत त्यांनी व्यक्त केले होते. स्वातंत्र्याबरोबरच समानता हवी, यासाठी त्यांचा आग्रह होता. आजच्या काळातही हे तंतोतंत लागू पडते.

गवई यांनी राज्य शासनाचेही कौतुक केले. महाराष्ट्राचे ज्युडेशियल इन्फ्रास्ट्रक्चर अतिशय चांगले असल्याचे सांगत तालुका स्तरापासून उच्च न्यायालयापर्यंतच्या इमारती चांगल्या असल्याचे सांगितले. शासन याबाबत सकारात्मक असल्याचेही ते म्हणाले. नाशिककरांच्या वतीने वकील संघाने गवई यांचा यथोचित सन्मान केला.

यावेळी गवईंच्या हस्ते अनेकांना गौरविण्यात आले. त्यांच्या हस्ते काही पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले. मंत्री नरहरी झिरवळ, खा. राजाभाऊ वाजे, माजी केंद्रीय मंत्री भारती पवार, आ. सरोज अहिरे, विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलद शर्मा, विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, रवत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष भगीरथ शिंदे, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, मनपा आयुक्त मनीषा खत्री, जि. प. सीईओ ओमकार पवार यांच्यासह अधिकारी, लोकप्रतिनिधी, मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

## सर्वस्व पणाला लावू..

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २७ :**

राज्यातील अनेक भागांत पावसाचा जोर पुन्हा वाढला असून काही ठिकाणी पूर स्थिती निर्माण झाली आहे. या आपत्तीमुळे उद्ध्वस्त झालेले संसार पुन्हा उभे करण्यासाठी आम्ही सर्वस्व पणाला लावू, अशा आश्वासक शब्दांत उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी नांदेड जिल्ह्यातील पूरग्रस्त नागरिकांना धीर दिला.

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील मणार धरण परिसरातील बहाद्दरपुरा, शेकापूर, घोडज पूरबाधित नागरिकांशी त्यांनी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या माध्यमातून व्हिडिओ कॉलद्वारे थेट संवाद साधला. आपत्ती ओढावली असली तरी खचून जावू नका, सरकार पूर्णपणे तुमच्या पाठीशी उभे आहे, असे पवार म्हणाले.

## ओबीसी समाजाचा बीडमधील आजचा मेळावा स्थगित

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. २७ :**

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद व सकल ओबीसी समाजाच्या वतीने २८ सप्टेंबर रोजी बीड येथे महामेळावा आयोजित करण्यात आलेला होता.

या परिसरात होत असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर प्रथम शेतकऱ्यांना मदत व्हावी यादृष्टीने हा महामेळावा काही कालावधीसाठी स्थगित करण्यात करण्यात येत असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे.

## लक्ष्मण हाके यांच्या गाडीवर हल्ला

■ **वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. २७ :**

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या गाडीवर अहिल्यानगर जिल्ह्यात हल्ला झाला आहे. काही अज्ञात तरुणांनी त्यांच्या गाडीवर दगडफेक व लाठ्याकाठ्यांनी हल्ला केला आहे. ही घटना घडली तेव्हा हाके गाडीतच होते. पण सुदैवाने त्यांना कोणतीही अप्रिय घटना घडली नाही.

लक्ष्मण हाके यांची आज अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील दैत्य नांदूर येथे ओबीसी एल्गार सभा होणार होती. या सभेसाठी ते कारने जात होते. रस्त्यात ते एकेठिकाणी नाश्ता करण्यासाठी थांबले. तेथून पुढे निघाल्यानंतर त्यांचा ताफा नगर तालुक्यातील अरणगाव लगत पोहोचला असता अज्ञात तरुणांनी त्यांची गाडी रोखून गाडीवर दगड व लाठ्याकाठ्यांनी हल्ला चढवला. त्यात त्यांच्या कारचे मोठे नुकसान झाल्याचे वृत्त आहे.

## माजी गृहमंत्री देशमुख दहीसावळीत दाखल



■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. २७ :**

एकाच गावात एकाच आठवड्यात दोन शेतकरी आत्महत्या.. या शिर्षकांतर्गत दैनिक महासागरच्या मुख्य आवृत्तीत पहिल्या पानासह यवतमाळ जिल्हा आवृत्तीमध्ये आज २७ सप्टेंबर रोजी वृत्त प्रकाशित झाले.

**दखल**

या वृत्ताची तातडीने दखल घेत राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आज भरपावसात दहिसावळी येथे जाऊन सदर आत्महत्याग्रस्त कुटुंबांना भेट देऊन सांत्वन केले व शासनाने तात्काळ एकरी ५० हजार रुपये मदत द्यावी, अशी मागणी केली.

यवतमाळ जिल्ह्याच्या महागाव तालुक्यातील दहिसावळी गावात एकाच आठवड्यात दोन तरुण शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. २१ सप्टेंबर रोजी विपुल घोरपडे यांनी तर बुधवार २४ सप्टेंबर रोजी नामदेव बाबाराव बावणे या शेतकऱ्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

एकाच गावात तीन दिवसात दोघांनी आत्महत्या करूनही शासन, प्रशासनाकडून कुणीही दखल घेतली नाही, हे वृत्त महासागने आज २७ च्या अंकात प्रकाशित करताच, माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी भर पावसात दहीसावळ गावाकडे धाव घेत मृत शेतकरी कुटुंबियांचे सांत्वन केले.

अतिवृष्टी, नापिकी, कर्जाचा डोंगर यामुळे राज्यातील शेतकरी पुरता हतबल झाला असून, महायुती सरकार गप्प तेवढ्या हाकत आहे. अशा गंभीर परिस्थितीत सरकारने कर्जमाफी करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यायला हवी, असे अनिल देशमुख यांनी म्हणाले.

## त्या आल्या... त्यांनी पाहिले... त्यांनी जिंकले!

# रोकडे ज्वेलर्स महाल शोरूमच्या ग्रँड नव्या लूकचे अनावरण

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**

पंडित बच्छराज व्यास चौक, महाल येथे रोकडे ज्वेलर्सच्या प्रतिष्ठित नव्या शोरूमचे शुक्रवारी विधीवत उद्घाटन करण्यात आले. पहाटे ६ वाजल्यापासूनच हजारो ग्राहकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेष ऑफर्सचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांची मोठी गर्दी केली.

सकाळच्या सुरुवातीच्या तासांत सोने व चांदीच्या दागिन्यांवर मेकिंग चार्जेसमध्ये ६०% सूट देण्यात आली जी दुपारनंतर ३०% राहिली. संपूर्ण दिवसभर हिऱ्याच्या दागिन्यांवर मेकिंग चार्जेस पूर्णतः मोफत होते.

सोबतच महाल शोरूमचा १६,००० चौरस फूटापर्यंत विस्तार करण्यात आला, यामुळे हे विदर्भातील सर्वात मोठे ज्वेलरी डेस्टिनेशन ठरले आहे. लग्नसराईसाठी ग्राहकांनी आकर्षक दागिने निवडले आणि या ग्रँड उद्घाटनाला यशस्वी रितेल इव्हेंट्सपैकी एक बनवले.

भव्य वातावरणात सेलिब्रिटींच्या उपस्थितीने सोहळ्याला अधिकच झळाळी आली. दुपारी १२ वाजता अभिनेत्री प्राजक्ता माळी आणि सायंकाळी ५ वाजता अभिनेत्री




सोनाली कुलकर्णी यांनी उपस्थित राहून ग्राहकांवर मोहिनी घातली. त्या आल्या, त्यांनी पाहिले अन् जिंकले, असेच झाले. ही ग्रँड ओपनिंग अशा वेळी झाली जेव्हा रोकडे ज्वेलर्सची एलं टॉप ५० ज्वेलरी ब्रँड्समध्ये निवड झाली, ज्यामुळे हा उत्सव अधिक ऐतिहासिक ठरला.

महाल शाखेच्या २५ वर्षांच्या परंपरेला अधोरेखित करताना संचालकांनी यास भूतकाळाचा उत्सव आणि भविष्यकाळाकडे टाकलेले धाडसी पाऊल असे संबोधले.

संचालक राजेश रोकडे, सारंग रोकडे म्हणाले, हा टप्पा फक्त आजवरच्या आमच्या प्रवासाचा उत्सव नाही, तर भविष्यासाठी नवे मापदंड निर्माण करण्याचा संकल्प आहे. आमच्या प्रत्येक पावलामागे ग्राहकांचा विश्वास आणि पारदर्शकता, डिझाईनची उत्कृष्टता व अप्रतिम मूल्य याविषयीची आमची बांधिलकी आहे.

मर्कंडराव रोकडे यांनी स्थापलेला व पाच पिढ्यांची परंपरा असलेला रोकडे ज्वेलर्स हा विदर्भातील सर्वात विश्वासार्ह ज्वेलरी ब्रँड आहे. महाराष्ट्रभरातील विविध शोरूम्ससह, हा ब्रँड सदैव विश्वास, विविधता, गुणवत्ता, सेवा आणि पारदर्शकता या तत्त्वांवर ग्राहकांचे जीवन समृद्ध करत आहे.

या ग्रँड ओपनिंगला यशस्वी बनवणाऱ्या हजारो ग्राहकांचे रोकडे ज्वेलर्सतर्फे मनःपूर्वक आभार मानले जातात. आगामी काळातही याच विश्वास व समर्पणाने सेवा देण्याचा संकल्प ब्रँड पुनः उच्चारतो.

# बीएसएनएलच्या स्वदेशी निर्मित '४ जी' सेवेचे लोकार्पण

## महाराष्ट्र शासनाच्या अकराशे ऑनलाईन सेवा गावागावात मिळण्यात मदत होणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २७ :

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आत्मनिर्भर भारत योजनेंतर्गत संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या '४जी' तंत्रज्ञानाधारित सेवेचे लोकार्पण झारसुगुडा ओडिशा येथून दूरदृष्य प्रणालीद्वारे झाले. याअंतर्गत बीएसएनएलच्या 92 हजार 633 टॉवर्सचे लोकार्पण झाले असून, यापैकी 9 हजार 30 टॉवर्स महाराष्ट्रात उभारले गेले आहेत. या माध्यमातून देशातील तसेच राज्यातील लाखो लोकांपर्यंत '४जी' तंत्रज्ञान पोहोचणार असून महाराष्ट्र शासनाच्या अकराशे ऑनलाईन सेवा गावागावात पोहोचण्यात या कनेक्टिव्हिटीचा फायदा होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते '४जी' नेटवर्कच्या दूरदृष्य प्रणालीद्वारे लोकार्पणानिमित्त साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सांस्कृतिक कला मंदिर, येरवडा येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. याप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय युवक कार्य व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, भारती एअरटेलचे संस्थापक अध्यक्ष सुनील मित्तल, खासदार मेधा कुलकर्णी, बीएसएनएलचे मुख्य महाव्यवस्थापक हरिंदर कुमार, दूरसंचार विभागाचे विशेष महासंचालक आर. के. गोयल उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात राज्य शासनाकडून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या अकराशे सेवा ऑनलाईन आणि व्हॉट्सअॅपवर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यातील 90 टक्के सेवा एन्ड टू एन्ड डिजिटल करण्यात येत आहेत. त्यामुळे नागरिकांना बसल्या जागी त्याच्या अर्जाची माहिती मिळणार आहे. सेवा हमी कायद्याची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने करण्यात येत आहे. नागरिकांना मोबाईलवरून सेवा उपलब्ध करून देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. यासाठी कनेक्टिव्हिटी असणे आवश्यक आहे. गावोगावी भारतनेटच्या माध्यमातून फायबर सेवा उपलब्ध करून देण्यात येत असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना धन्यवाद दिले आणि बीएसएनएलचे अभिनंदन केले.



बीएसएनएलच्या 92 हजार 633 टॉवर्सचे लोकार्पण होणे ही आनंदाची बाब असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यातील 9 हजार 30 टॉवर्स महाराष्ट्रातील आहे. देशातील 24 हजार 680 हजार गावांना या टावर्सच्या माध्यमातून '४जी' नेटवर्क उपलब्ध होणार आहे. देशाला विकसित करण्यासाठी परस्पर दळणवळण (कम्युनिकेशन) महत्त्वाचे आहे. 21 व्या शतकाच्या सुरुवातीला तत्कालीन प्रधानमंत्री स्व. अटलबिहारी वाजपेयी यांनी विकासाचा मार्ग हा दळणवळण असल्याचे म्हटले होते. त्यांनी दळणवळणाच्या दृष्टीने देशाला आणि गावांना रस्त्यांच्या माध्यमातून जोडण्यासाठी सुवर्ण चतुष्कोण योजना आणि प्रधानमंत्री ग्राम सडक योजना सुरू केली. आता 21 व्या शतकात विकासासाठी केवळ रस्ते नाही तर कनेक्टिव्हिटी महत्त्वाची असल्याचे लक्षात आले. मोबाईल कनेक्टीव्हीटी आणि इंटरनेट गावात पोहोचविल्याशिवाय या शतकातील विकास गावापर्यंत पोहोचविता येत नाही. त्यामुळे गावागावात हे तंत्रज्ञान पोहोचविण्यासाठी '४जी' टॉवर्सची निर्मिती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात झाली.

सुरुवातीला स्वतःचे '४जी' तंत्रज्ञान फिनलँड, स्वीडन, चीन आणि दक्षिण कोरिया या चार देशांकडे होते. चीन हे तंत्रज्ञान देण्यासाठी सहकार्य करणार नव्हते. त्यामुळे आत्मनिर्भर भारत करण्यासाठी तंत्रज्ञान निर्मितीसाठी देशातील कंपन्यांना एकत्रित करून प्रयत्न सुरू झाले. सी-डॉट, तेजस, आयआयटी, टीएसएस आणि बीएसएनएल यांनी शुद्ध, देशी तंत्रज्ञानावर आधारित '४जी' तंत्रज्ञानाची निर्मिती करून भारत या क्षेत्रातील पाचवा देश बनला आहे. भारताला ज्या-ज्यावेळी कोणी आव्हान दिले त्यावेळी भारताने आपली क्षमता दाखवून दिली आहे. भारतातील ज्ञान, तेज, कर्मण्यतेद्वारे आपण जगाला उत्तर देऊ शकतो आणि आजचा कार्यक्रम त्याचाच एक भाग आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

गावात इंटरनेट पोहोचते तेव्हा आपण गावाला जगाशी जोडत असतो. आरोग्य, शिक्षण क्षेत्रासाठी कनेक्टीव्हीटी महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांना हवामानाची, वातावरण बदलाची माहिती देऊन त्यांचे नुकसान टाळता येते. स्मार्ट व्हिलेजच्या सहाय्याने गावातील सर्व व्यवस्था उत्तम करता येतात.

# ओबीसी बांधवांनो

### आत्महत्येच्या वाटेला जाऊ नका : छगन भुजबळ

■ महासागर प्रतिनिधी

नाशिक, दि. २७ :

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि ओबीसी चळवळीतील प्रमुख नेते छगन भुजबळ यांनी भावनिक पोस्ट करत ओबीसी समाजाला साद घातली आहे. ओबीसी बांधवांनो, आत्महत्येच्या वाटेला जाऊ नका. आरक्षण वाचवण्यासाठी आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहोत. तुमचं दुःख, तुमची वेदना आम्हाला समजते. संविधान आणि न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवा. आपण हक्कासाठी लढतोय, पण टोकाचं पाऊल उचलून आपल्या कुटुंबांना अंधारात ढकलू नका, असे आवाहन भुजबळ यांनी केले.



मराठा-ओबीसी आरक्षणाचा संघर्ष महाराष्ट्रात दिवसेंदिवस तीव्र होत चालला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाज ओबीसी प्रवर्गातून आरक्षणाची मिळवले आहे. त्याविरोधात ओबीसी नेते आपला हक्क वाचवण्यासाठी लढा उभारण्याचा प्रयत्न करत आहे. याच संघर्षाच्या सावटाखाली ओबीसी समाजात प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली असून, गेल्या काही दिवसांत या समाजातील अनेकांनी आत्महत्येचा मार्ग पत्करल्याच्या हृदयद्रावक घटना घडल्या आहेत.

त्यातच बीड जिल्ह्यातील तागडगाव येथे कांचन सानप या विद्यार्थिनीने, तर परभणीतील आडगाव दराडे येथील कुमार आघाव या युवकाने आपले जीवन संपवल्याने ओबीसी समाजात तीव्र असंतोष पसरला.

याच मालिकेत बीडमधील राहुल पतंगे आणि आत्माराम भागे या तरुणांनीही आत्महत्या केली. या घटनांनी ओबीसी समाजात शोककळा पसरली असून, समाजाच्या भावना अस्थिर झाल्या आहेत.

# प्रेम प्रकरणातून तरुणाची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :

प्रेम प्रकरणातून एका तरुणाने इमारतीच्या 11 व्या मजल्यावरून उडी मारून आपली जीवनयात्रा संपवल्याची घटना मुंबईलगतच्या ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली उपनगरात घडली आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाला असून, त्यात हा तरुण उडी मारताना दिसून येत आहे.

ऋषिकेश परब असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. त्याने डोंबवली पश्चिम भागातील सुदामा इमारतीच्या 11 व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. मृत ऋषिकेशचे एका तरुणीवर प्रेम होते. पण त्यात अपयश आल्यामुळे त्याने आत्महत्या केली. यासंबंधीच्या माहितीनुसार, सकाळी 8 वाजेपासून हा तरुण आत्महत्या करण्याचा प्रयत्न करत होता. स्थानिक पोलिस व अग्निशमन दलाच्या जवानांनी त्याला त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना यश आले नाही. अखेर 12 च्या सुमारास त्याने इमारतीच्या 11 व्या मजल्यावरून उडी मारून आपली जीवनयात्रा संपवली.

या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हा व्हिडिओ शेजारच्या इमारतीमधील एका व्यक्तीने रेकॉर्ड केला आहे. त्यात ऋषिकेश परब हा बाल्कनीच्या ग्रिलला लोंबकळलेला दिसत आहे. अवघ्या 7 सेकंदाच्या या व्हिडिओत अखेर हाताची गाठ सैल झाल्यामुळे तो खाली कोसळताना दिसून येत आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

दुसरीकडे, मुंबईच्या पवई परिसरातही अशीच एक घटना घडली आहे. या घटनेतही एका 19 वर्षीय तरुणाने प्रेम प्रकरणातून घरातील अँगलला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेनंतर त्याच्या शेजारी राहणाऱ्या एका तरुणीनेही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण ती बचावली. तिच्यावर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी योग्यवेळी निर्णय : अजित पवार

■ महासागर प्रतिनिधी,

बारामती, दि. २७ :



पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून मदत मिळण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे. राज्य सरकारकडून मदतीसाठी तयारी करण्यात आली असून लवकरच योग्य निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. बारामती येथे आयोजित कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना पवार यांनी लवकरच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. पवार म्हणाले, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. केंद्र सरकारकडून मदत मिळावी, अशी अपेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे राज्याच्या दौऱ्यावर आले असताना मी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या मागणीचे पत्र दिले आहे. त्यामुळे योग्य वेळी निर्णय घेतला जाणार आहे.

राज्यात पावसाने आहाकार माजवला असल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पूर आला आहे. आणखी पाच ते सहा दिवसांचा रेडअलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी तयारी करण्यात आली आहे.

# अतिवृष्टीने केवळ शेतकरीच नव्हे, तर बारा बलुतेदार बाधित रोगराईवर तातडीने उपाययोजना करा : शरद पवार

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. २७ :

महाराष्ट्रात सध्या सर्वत्रच अतिवृष्टी सुरू असून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. तसेच पूर परिस्थितीमुळे जनजीवन देखील विस्कळीत झाले आहे. यावर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे.

ते म्हणाले, महाराष्ट्रात सुरु असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या आपत्तीमध्ये केवळ पिकांचेच नुकसान झाले नाहीतर जनावरेदेखील मोठ्या प्रमाणावर



दगावली आहेत. या अभूतपूर्व संकटाची व्याप्ती खूप मोठी आहे. अतिवृष्टीने केवळ शेतकरी वर्ग बाधित झाला नसून त्याची मोठी झळ गावातील लहान मोठे व्यावसायिक, कारागीर आणि शेतमजुरांना देखील बसली आहे. एकंदरीत गावांमधील बारा बलुतेदार, मागासवर्गीय समुदायावर देखील हे अरिष्ट कोसळत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

शरद पवार म्हणाले, गावपातळीवर इंधनाचा आणि अन्नाचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा निर्माण झाला असून सार्वजनिक वितरण व्यवस्था गतिमान करण्याची आवश्यकता आहे. रोगराई पसरण्याची शक्यता असून त्यास आळा घालून आरोग्याच्या सुविधा देखील तातडीने उपलब्ध करणे गरजेचे आहे. विध्यार्थांच्या शिक्षणावर देखील विपरीत परिणाम झाला असून त्याकडे त्वरेने लक्ष द्यावे लागेल.

## दसऱ्यापर्यंत महाराष्ट्रात जोरदार पाऊस

**मुंबई** : राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळत असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे आणि शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. याच पार्श्वभूमीवर, ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी पुढील सहा दिवसांसाठी, म्हणजेच दसऱ्यापर्यंत महाराष्ट्रातील हवामान कसे राहील, याबद्दल माहिती दिली आहे. दसऱ्यापर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात जोरदार पावसाची शक्यता आहे. जोरदार पावसाची ही शक्यता मध्य व वायव्य बंगालच्या उपसागरा दरम्यान तयार झालेल्या हवामानाच्या स्थितीमुळे निर्माण झाली आहे. चंद्रपूर, हिंगोली, पैठण, अहिल्यानगर मार्गे मुंबईच्या दिशेने पुढे सरकण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# घोडबंदर पातलीपाडा पुलावर कारचा अपघात

■ महासागर प्रतिनिधी,

ठाणे, दि. २७ :

घोडबंदर येथील पातलीपाडा पुलावर शुक्रवारी मध्यरात्री एका कारचा अपघात होऊन चालक जखमी झाल्याची घटना उघडकीस आली. या घटनेची माहिती मिळताच, घटनास्थळी ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, शहर वाहतूक पोलीस कर्मचारी दाखल झाले. या अपघातामुळे पातलीपाडा पुलावरील ठाणे घोडबंदर वाहिन्यांची वाहतूक धिम्या गतीने सुरू होती.

शैलेश सरोदे (२७) असे कार चालकाचे नाव आहे. ते एकटेच शुक्रवारी मध्यरात्री कारने मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून घोडबंदरच्या दिशेने प्रवास करत होते. त्यांची कार घोडबंदर येथील पातलीपाडा पुलावर येताच कार चालक शैलेश सरोदे यांचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे कार थेट रस्त्यावरील दुभाजकावर आदळली. या अपघातात सरोदे हे किरकोळ जखमी झाले. या अपघाताची माहिती मिळताच, घटनास्थळी ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, शहर वाहतूक पोलीस कर्मचारी दाखल झाले. यावेळी सरोदे यांना किरकोळ दुखापत झाल्याने जवळील रुग्णालयामध्ये प्रथमोपचार करिता दाखल करण्यात आले. या अपघातामुळे वाहनामधून रस्त्यावर तेल सांडले होते. यामुळे ठाणे घोडबंदर वाहिनीवरील वाहतूक संथ गतीने सुरू होती. आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांच्या मदतीने सांडलेल्या तेलावर माती पसरविण्याच आली. अपघातग्रस्त वाहन रोडच्या बाजूला करण्यात आले असून रस्ता वाहतुकीसाठी पूर्णतः खुला करण्यात आला.

ठाण्यातील घोडबंदर रोड हा शहरातील सर्वात महत्त्वाचा मार्ग मानला जातो. मुंबई, नवी मुंबई तसेच ठाणे पश्चिमेकडून पालघर, गुजरातकडे जाणाऱ्या वाहनांसाठी हा प्रमुख मार्ग असल्याने येथे नेहमीच मोठी वाहतूक असते. त्यामुळे अशा प्रकारचे अपघात झाल्यास वाहतूक विस्कळीत होऊन वाहनचालकांची गैरसोय होते.

मागील महिन्यात देखील अशीच एक घटना पातलीपाडा पुलावार घडली होती. ट्रक चालक आणि त्याचा सहकारी हे दोघे सुमारे ८ टन लोखंडी पाईप आणि रॉड घेऊन नवी मुंबईहून गुजरातच्या दिशेने वाहतूक करत होते. यावेळी ट्रक पातलीपाडा पूलावर येताच ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले होते. यामुळे ट्रक थेट रस्त्यावरील दुभाजकावर असलेल्या विद्युत खांबावर आदळला होता.

# पावसामुळे लातूर बिदर-हैदराबाद मार्ग बंद



■ महासागर प्रतिनिधी,

छत्रपती संभाजीनगर, दि. २७ :

लातूर येथे शुक्रवारी रात्री पुन्हा जोरदार पावसाला सुरुवात झाली. चाकूर, निलंगा आणि औसा तालुक्यात पावसाचा जोर वाढला. अनेक ग्रामीण रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहे. पुन्हा पुलावरुन पाणी वाहू लागले आहे. ओसरु लागलेला पूर पुन्हा वाढला आहे. लातूर-बिदर-हैदराबाद महामार्गावरील वाहतूक बंद महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील विंचूर येथील पुलावरून पाणी आल्याने ही परिस्थिती ओढावली आहे. धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यात पुन्हा एकदा पावसाने कहर केल्याने राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन विभागातील जवानांना नागरिकांना बाहेर काढण्यासाठी पाठविण्यात आले आहे.

लातूर येथे शुक्रवारी रात्री पुन्हा जोरदार पावसाला सुरुवात झाली. चाकूर, निलंगा आणि औसा तालुक्यात पावसाचा जोर वाढला. अनेक ग्रामीण रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहे. पुन्हा पुलावरुन पाणी वाहू लागले आहे. ओसरु लागलेला पूर पुन्हा वाढला आहे. चाकूर रेणापूर अहमदपूर आणि निलंगा तालुक्यात मुसळधार पावसाचा फटका बसला आहे.

बेंबळी -बोरखेडा रस्ता वाहतुकीस बंद झाला. काजळा तालुका धाराशिव पुलावरून पाणी वाढल्याने रस्ता वाहतुकीस बंद आहे. गोविंदपूर खामसवाडी रस्ता बंद झालेला आहे. धाराशिव तालुक्यातील आरणी गावात सकाळी आठच्या सुमारास नदीच्या प्रवाहातून मार्ग काढताना कुटुंबाने जीव धोक्यात घालणाऱ्या दोघांना वाचविण्यात यश आले.

लातूर जिल्ह्यात निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी परिसरात अवघ्या आठ तासांत ६३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या मुसळधार पावसामुळे अनेक छोटे-मोठे पूल पाण्याखाली गेले आहेत. तेरणा प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू आहे. निलंगा आणि औराद शहाजानी भगातील पावसामुळे अनेक छोट्या मोठ्या पुलावरून पाणी जात असल्याने वाहतुकीवर परिणाम झाला आहे. वांजरखेडा, ऊसतुरी, हालसी तुगाव, लिंबाळा,मानेजवळगा, बडूर,बोरसुरी या गावांची वाहतूक बंद करण्यात आली आहे. जिल्ह्यातील औसा- भादा मार्गावरील हळदुर्ग येथील पुलावरून पाणी जात असल्याने वाहतूक ठप्प झाली. त्याचबरोबर थोडगा येथील पुलावरून पाणी जात असल्याने थोडगा ते मोघा, किल्लारी ते मदनसुरी, उदगीर तालुक्यातील नेत्रगाव येथील रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला आहे. ज्या गावातून नागरिकांना सुरक्षित स्थळी आणले गेले होते त्या गावात नागरिकांना पुन्हा पाठवले गेले.



■ **नाशिक** : कर्मवीर गणपत दादा मोरे जनता विद्यालय पिंपळगाव बसवंत, तालुका निफाड विद्यालयातील सर्व शिक्षिका

# मुंबईत टॅक्सी-रिक्षांवर धडक कारवाई

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :

मुंबईत अॅप-आधारित टॅक्सी, रिक्षा आणि बाईक-टॅक्सींच्या गोंधळामुळे प्रवाशांच्या तक्रारींना ऊत आला आहे. मनमानी भाडे, परवाना नसलेले चालक आणि अतिरिक्त शुल्क अशा प्रकारच्या गैरव्यवहारावर अखेर सरकारने कारवाईचा बडगा उगारला आहे.

गेल्या काही दिवसांतच २६३ वाहनांवर तब्बल ३.८८ लाखांचा दंड ठोठावण्यात आला. काही चालकांवर तर थेट एफआयआर दाखल करण्याची वेळ आली. एवढेच नव्हे तर, प्रवाशांकडून दर ठरवून दिल्यापेक्षा जास्त रक्कम घेणाऱ्यांवर देखील नजर ठेवली जात आहे. दरम्यान, शासनाने नुकतेच महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम २०२५ आणि ॲग्रिगेटर्स पॉलिसी लागू केली आहे. यामुळे ई-बाईक आणि इलेक्ट्रिक दुचाकीने प्रवासी वाहतूक करण्यास परवानगी मिळाली असून, पहिल्या १.५ किमी साठी १५ आणि नंतर प्रति किमी १०.२७ एवढेच भाडे आकारता येईल.

ऑटो-टॅक्सींसाठीही शासनाने ठरवलेले दर बंधनकारक केले असून, काळी-पिवळी टॅक्सींसाठी पहिल्या १.५ किमी प्रवासाचे भाडे ३१, ऑटो रिक्षासाठी २६ तर एसी वाहनांसाठी १०% अधिक भाडे निश्चित करण्यात आले आहे. फसवणूक करणाऱ्या बेकायदेशीर चालकांनी तातडीने नियम पाळावेत, अन्यथा पुढे आणखी कठोर कारवाई केली जाईल.



■ **नाशिक** : मुख्याध्यापक सर्व शिक्षिका कर्मचारी वर्ग सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यामंदिर सिन्नर...

# भाजी विक्रेत्याचा पूरग्रस्तांसाठी पुढाकार

## मुख्यमंत्री सहायता निधीत दिले १.१३ लाखांचे दान

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २७ :

पुणे येथील भाजी विक्रेते चरण नामदेव वनवे यांनी पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीला १ लाख १३ हजार ७४० रुपयांचे दान दिले आहे. कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांच्या उपस्थितीत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे हा धनादेश सुपूर्द केला.

चरण वनवे हे शंकर महाराजांचे भक्त आहेत. त्यांनी आपल्या घरातील महाराजांच्या पादुकांसमोर एक डबा ठेवला होता. भाजी विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून ते दररोज शंभर रुपये या डब्यात जमा करत असत. आपत्कालीन परिस्थितीत गरजूंना मदत करण्याच्या उद्देशाने त्यांनी ही बचत केली होती.



वनवे यांनी सांगितले की, त्यांची तिसरी पिढी भाजी विक्रीचा व्यवसाय करत आहे. त्यांच्या आईने कोरोना काळात गरजूंना १ लाख रुपयांची मदत केली होती. 'आपला पैसा इतरांच्या कामी यावा, अन्यथा तो दुःखाचा डोंगर आहे,' अशी त्यांच्या आईची शिकवण होती. आईच्या निधनानंतर त्यांनी हा वारसा पुढे नेण्याचा निर्णय घेतला.

नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत करण्याच्या उद्देशाने ते दररोज शंभर रुपये बाजूला ठेवत असत. समाजाची गरज लक्षात घेऊन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनानंतर त्यांनी ही जमा केलेली रक्कम पूरग्रस्तांसाठी दान केली.

आमदार हेमंत रासने यांनी वनवे यांच्या दानाचे कौतुक केले. ते म्हणाले, "अत्यंत गरीब परिस्थितीतही समाजाचे देणे लागतो या भावनेतून वनवे यांनी केलेली मदत लाखमोलाची आणि समाजाला प्रेरणा देणारी आहे."

यावेळी त्यांनी कसबा मतदारसंघात पूरग्रस्तांसाठी मदत अभियानाचा शुभारंभ केल्याचेही सांगितले. रासने यांनी नागरिकांना पूरग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन केले.

## नवरात्रीत विशेष सवलत

### पण अटींचा फटाका तयार!

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. २७ :

नवरात्रीचा जल्लोष, ढोल-ताशांचा गजर, भक्तिगीतांचा दणदणाट... पण यंदा ठराविक दिवसांसाठीच मिळाली आहे अतिरिक्त परवानगी. उपनगर जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश जाहीर होताच सांस्कृतिक व धार्मिक मंडळांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले. ठरवलेल्या मर्यादा, ध्वनीप्रदूषण कायद्याचे नियम, न्यायालयाचे आदेश आणि शांतता क्षेत्रातील निर्बंध हे सगळं काटेकोर पाळवंच लागणार आहे. अन्यथा थेट कारवाई टळणार नाही, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. ती फक्त तीन दिवसांसाठीच - सप्तमी (२९ सप्टेंबर), अष्टमी (३० सप्टेंबर) आणि नवमी (१ऑक्टोबर) या दिवशी सकाळी ६ ते रात्री १२ पर्यंतच लागू असेल.

# पाणंद रस्ते दुरुस्तीला प्राधान्य : राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल

## सेवा पंधरवाडा अंतर्गत ॲड. जयस्वाल यांच्या हस्ते रामटेक उपविभागात ५९१ लाभार्थ्यांना पट्टे वाटप

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २७ :

पाणंद रस्ते हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असतो. शेतात पाणंद रस्त्याच्या माध्यमातून ये-जा होत असते. हे रस्ते दुरुस्त करण्यास शासनाचे प्राधान्य असल्याचे वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल आज दि.२७ सप्टेंबर ला गंगा भवन येथे म्हणाले.



रामटेक येथील गंगा भवन येथे "सर्वांसाठी घरे" उपक्रमांतर्गत पट्टे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी ते बोलत होते. राज्यमंत्री ॲड.जयस्वाल यांच्या हस्ते रामटेक उपविभागात ५९१ लाभार्थ्यांना पट्टे वाटप करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन, रामटेकचे तहसीलदार रमेश कोळपे यांच्यासह लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसामान्यांना हक्काचे घर मिळावे, प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ प्रत्येकाला मिळावा यासाठी सरकार सातत्याने कार्यरत आहे. या योजनेद्वारे हजारो कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा विषय असणाऱ्या पाणंद रस्त्यांच्या दुरुस्तीला प्राधान्य राहणार असल्याचे ॲड. आशिष जयस्वाल यावेळी म्हणाले.

शासनाच्या विविध योजनांमुळे आता नागरिकांना घर बसल्या ऑनलाइन सेवा मिळत आहेत. पूर्वी सरकारी कार्यालयांचे फेरे मारावे लागत असत परंतु आता पारदर्शक आणि जलदगतीने निर्णय होत असून जनतेच्या अडचणी कमी होत असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. जिल्ह्याचा पाणंद रस्ता उपक्रमांतर्गत राज्यात अव्वल क्रमांकावर त्यानेच आहे. जिल्ह्यातील अनेक पाणंद रस्ते मोकळे झालेले आहेत. अजून काही कामे बाकी आहेत. ती कामे येत्या काळात पूर्णत्वास न्यायची आहेत. पट्टे वाटपातही नागपूर जिल्हा अग्रेसर आहे. येत्या काही दिवसात पट्टे वाटपाचे उर्वरित काम पूर्ण करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाले.

या कार्यक्रमात नगर परिषद कन्हान अंतर्गत १५३,नगर पंचायत पारशिवनी अंतर्गत ७१, नगर पंचायत कांद्री अंतर्गत २९, पंचायत समिती पारशिवनी अंतर्गत ग्रामीण भागातील ४९ असे पारशिवनी तालुक्या अंतर्गत एकूण ३०२ तसेच मौदा तालुक्यातील रामटेक विधानसभा मतदार संघांतर्गत १०२ मालकीहक्क पट्टे गरजू लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले.

रामटेक तालुक्या अंतर्गत ग्रामपंचायत सालईमेटा, मनसर, नवरगांव, पिंडकापार(सोनपूर), पटगोवारी येथील ११७ शासकीय जागेवरील रहिवासी प्रयोजनार्थ मालकीहक्क पट्टे तसेच मौजा कट्टा, कांद्री, लोहडोंगरी येथील एकूण ७० वनहक्क पट्टे गरजू लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले.

यावेळी प्रास्ताविक रामटेक उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन यांनी केले.सूत्र संचालन देवलापारच्या अप्पर तहसिलदार पूनम कदम यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन रामटेक चे तहसीलदार रमेश कोळपे यांनी केले असून कार्यक्रमात विशेष कार्य अधिकारी शिवराज पडोळे, प्रशांत सांगडे,रामटेक पं.स. गट विकास अधिकारी जयसिंग जाधव, पारशिवनीचे तहसीलदार सुरेश वाघचौरे, पारशिवनीचे गट विकास अधिकारी सुभाष जाधव,कन्हान चे मुख्याधिकारी दिपक घोडके,कांद्री चे मुख्याधिकारी सचिन गाडगे,पारशिवनी चे मुख्याधिकारी नितीन लुंगे यांनी गरजु लाभार्थ्यांना पट्टे वाटप कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न केले.

कार्यक्रमात नायब तहसीलदार भोजराज बडवाईक, अमित निबांळकर, मुकुंदा भूरे, रमेश पागोटे आणि पुरवठा समिती विभागातील सहा. गट विकास अधिकारी मारोती भुजाडे, विस्तार अधिकारी राजु कोल्हे व इतर कर्मचारी वृध्द कार्यक्रम स्थळी उपस्थित होते.

## २ तडीपार गुंड अटकेत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

एमआयडीसी पोलिसांनी बुधवारी रात्री गस्तीदरम्यान दोन तडीपार गुंडांना अटक केली. नीतेश उर्फ बच्चा गुणवंत कालभूत (३०) रा. इंदिरा मातानगर, हिंगणा आणि पवन उर्फ किस्सी तुळशीराम कोरडे (२४) अशी अटकेतील तडीपार गुंडांची नावे आहेत.

रात्री ८ वाजताच्या सुमारास पोलिसांचे पथक एकात्मतानगर परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान पानठेल्याजवळ उभ्या नीतेशने पोलिसांना पाहताच पळ काढला. संशय आल्याने पाठलाग करून त्याला पकडण्यात आले. चौकशीत तो तडीपार असल्याचे पुढे आले. परिमंडळ क्र. १च्या पोलिस उपायुक्तांनी गतवर्षी २८ नोव्हेंबर २०२४ रोजी २ वर्षांसाठी नागपूर जिल्ह्यातून तडीपार केले होते. दुसरी कारवाई रात्री ८.४५ वाजताच्या सुमारास वैशालीनगर परिसरात करण्यात आली. गणेश चौकात पोलिसांनी पवनला पकडले. अभिलेख तपासणी असता त्याला गतवर्षी २ वर्षांसाठी तडीपार केले असल्याचे समोर आले. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध तडीपारीचे उल्लंघन केल्याचा गुन्हा नोंदविला आहे.

## विजेची तार तुटुन पडल्याने दोन गायीचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. २७ :

जिवंत विजेची तार तुटुन खाली पडली. याच्या संपर्कात आल्याने संगम येथील गोपालकाच्या दोन गायीचा जागीच मृत्यू झाला. वेळीच विद्युतप्रवाह बंद केल्याने आठ गुरे थोडक्यात बचावली. ही घटना आज सकाळी ८वाजताच्या सुमारास वानाडोंगरी संगम मार्गालगत घडली. वानाडोंगरी-संगम गावाला जोडणाऱ्या मार्गाच्या शेजारी जाणाऱ्या विद्युत सर्व्हिस लाईन ची तार आज सकाळी एका मोठ्या अज्ञात वाहनांला अडकून तुटली. ती तशीच पडुन राहिली.



दरम्यान संगम येथील गोपालक मंगेश भिवापुरे यांची चरायला सोडल्यानंतर आठ-गायी या भागात आल्याने या विद्युत प्रवाहित तारेच्या संपर्कात आल्या.अचानक विजेचा धक्का बसल्याने त्या खाली कोसळल्या. हा प्रकार लक्षात येताच गोपालकाने तात्काळ वीज वितरण कंपनी च्या लाईनमन ला फोन केला. ताबडतोब वीज पुरवठा बंद केल्याने त्यातील आठ गायी कशाबशा निसटल्या. मात्र दोन गायीचा जागीच मृत्यू झाला. यानंतर वीज वितरण कंपनी चे सहायक अभियंता व एमआयडीसी पोलीस घटनास्थळी दाखल झाले.पंचनामा करण्यात आला. या घटनेत गोपालकाचे मोठे नुकसान झाले आहे.त्याला नुकसान भरपाई देण्यात यावी. तसेच या छोट्या मार्गाने टोल वाचविण्यासाठी नियमित मोठे वाहन जातात. त्याचा बंदोबस्त करण्यात यावा.

तसेच रस्ता ओलांडनाऱ्या सर्व्हिस लाईनला भूमिगत करण्यात यावे अशी मागणी बालविश्व चॅरिटीबल ट्रस्टचे नाना सातपुते, शेतकरी किशोर राऊत, अमोल घोडमारे,कवडू काकडे, मनोज राऊत, पुरुषोत्तम भिवापुरे, भोंगाडे यांनी केली आहे.

## गटशिक्षणाधिकारी यांना वेळ नसल्यामुळे विद्यार्थ्यांसह पालक आले हिंगण्याला

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. २७ :

शाळेची पेंडिंग रिक्वेस्ट अप्रूव्ह करण्यासाठी हिंगणा पंचायत समिती परिसरातील गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील जबाबदार कर्मचाऱ्यांना वेळ मिळत नसल्यामुळे मुख्याध्यापक व विद्यार्थ्यांसह स्वतः पालकांनी गाठले गटशिक्षणाधिकारी कार्यालय.परंतु गटशिक्षणाधिकारी हरडे उपस्थित नसल्यामुळे पालकांसह विद्यार्थ्यांना आल्या पावली परत जावे लागले.

हिंगणा गटशिक्षणाधिकारी कार्यालया अंतर्गत येणाऱ्या सुराबर्डी येथिल महात्मा फुले विद्यालयाच्या एकूण 17 करिता विधार्थी विद्यार्थ्यांची स्वामी विवेकानंद हायस्कूल, वडधामना या शाळेने पेंडींग रिक्वेस्ट अप्रुव्हड केलेली नाही.त्यामुळे महात्मा फुले विद्यालय सुराबर्डी येथील मुख्याध्यापक विजय पिसे यांनी वारंवार गटशिक्षणाधिकारी कार्यालयाला ही समस्या सांगीतली असताना सुद्धा ही समस्या सुटली नाही. त्यामुळे शेवटी नाइलाजास्तव पालकांना आपली दैनंदिन रोजमजुरी सोडून गटशिक्षणाधिकारी कार्यालयात यावे लागले.परंतु गटशिक्षणाधिकारी उपस्थित नसल्यामुळे मुलांना पालकांसह आल्या पावली परत जावे लागले. शेवटी शिक्षण विस्तार अधिकारी शोभणे यांचेकडे पालकांचे प्रवेश अर्ज व विद्यार्थ्यांची पेंडींग रिक्वेस्ट स्टेटस यादी हस्तांतरीत करुन विध्यार्थी, पालक व मुख्याध्यापक परत गेले. 30 सप्टेंबरच्या विद्यार्थी संख्येवर संच मान्यता होत असल्यामुळे गटशिक्षणाधिकारी काय भूमिका घेतात याकडे शाळेचे लक्ष लागले आहे. सोबत विध्यार्थी पालक शिक्षक व महात्मा फुले चे मुख्याध्यापक विजय पिसे उपस्थित होते.

## उपजिल्हा रुग्णालयात नि:शुल्क रोग निदान शिबीर

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २७ :

उपजिल्हा रुग्णालय कामठी येथे वैद्यकीय दंतरोग निदान व उपचार आणि शस्त्रक्रिया शिबिराचे निःशुल्क आयोजन करण्यात आले आहे .दिनांक २९ सप्टेंबरला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते सकाळी ९,३०वाजता उदघाटन होणार आहे.



या कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणुन रामटेकचे खासदार शामकुमार बर्वे व इतर आमंत्रित मान्यवर तसेच रूग्ण आणि रुग्णालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थिती राहणार आहेत. दिनांक १७ सप्टेंबर पासुन २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सुरू असलेल्या "स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान " अंतर्गत कार्यक्रम सुरू असुन त्याबाबत विशेष तपासणी आणि निदान प्रक्रिया राबविण्यात येत आहे. वरील "वैद्यकीय दंतरोग निदान व उपचार आणि शस्तक्रिया "शिबीर उपसंचालक, आरोग्य सेवा नागपुर मंडळ, नागपुर आणि जिल्हा शल्यचिकित्सक सर्वोपचार रुग्णालय नागपुर आणि तालुका आरोग्य अधिकारी कामठी यांचा संयुक्त विद्यमाने उपजिल्हा रुग्णालय कामठीच्या परिसरात राबविण्यात येत आहे.

या शिबिरात विशेष करुन पौष्टीक आहार, सिकल सेल, थलेसेमिया, अनिमिया, हीमोफीलीया, मुख कर्क रोग, स्तन कर्करोग, गर्भाशय, तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थाचे दुष्परिणाम, नेत्ररोग तपासणी, मानसिक रोग तपासणी मधुमेह, उंच रक्तदाब, क्षयरोग, स्वच्छता व स्वच्छ परिसर इत्यादी आरोग्याशी निगडीत सर्व राष्ट्रीय कार्यक्रमा अंतर्गत जनजागृती बाबतचे प्रदर्शन मांडण्यात येणार आहेत.

## सांस्कृतिक राष्ट्रीय पोवाडा कार्यक्रमाचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

लखमाजी व्यायाम शाळा व हनुमान मंदिर इतवारी मस्कासाथ चौक नागपूर येथे 22 ऑगस्ट ला शुक्रवारी पोळा निमित्त सांस्कृतिक राष्ट्रीय पोवाडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम रात्री दहा ते सकाळी सहा वाजेपर्यंत गुरुमेख भारती मंडळ बंगाली पंजाब यांनी सादर केला. यावेळी विनोद शाहीर, रामचंद्र खोपकर, रामचंद्र मोहपेकर व सहकारी मंडळी होती. यावेळी नीलकंठ शाहीर, रामू हिंगणेकर, शाम शाहीर, भास्कर पौणीकर सुरेश महाजन उपस्थित होते.

## सेंटर पॉइंट वर्धमान नगरच्या मुलींचा फुटबॉल स्पर्धेत विजय

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर नागपूर जिल्हा क्रीडा विभागातर्फे आयोजित १७ वषाखालील आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत सेंटर पॉइंट स्कूल, वर्धमान नगरच्या मुलींनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या बळावर दिमाखदार विजय संपादन केला.या विजयी संघात दिवा रोचवानी (कर्णधार), समायरा खुराना (उपकर्णधार), ओजस्वी वाडे (गोलकीपर), आशिका जैन, नाजिया चिमथानावाला, जनिषा पंचमतिया, आरोही जरारिया, सकेता शिवहरे, अनन्या शाह, वाची अग्रवाल, अनघा यादव आणि रिद्धि चंदन यांचा समावेश होता. संघातील खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय




क्रीडा प्रशिक्षक बिरेन्द्र बघेल यांना दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने संघभावना आणि तंत्रशुद्ध खेळाचे प्रदर्शन करत स्पर्धेतील सर्व सामना जिंकले.

शाळेच्या प्राचार्या कांचन उके, उपप्राचार्या दीपा चक्रवती व जयती चक्रवती यांनी विजयी संघाचे अभिनंदन करत डिविजन स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. संघाच्या या यशामुळे शाळेत आनंदाचे वातावरण आहे.

## तडीपार चाकू अटकेत

नागपूर : बजाजनगर ठाण्याच्या बीट मार्शलने गस्तीदरम्यान एका तडीपार गुंडाला विना परवानगी परिसरात फिरताना अटक केली. रोहित उर्फ चाकू धनू वर्मा (३०) रा. दंतेश्वरीनगर झोपडपट्टी असे अटकेतील तडीपाराचे नाव आहे. चाकू हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यांची नोंद आहे. त्याची लगाम कसण्यासाठी परिमंडळ क्र. १ च्या पोलिस उपायुक्तांनी गतवर्षी नोव्हेंबर महिन्यात त्याला जिल्ह्यातून दोन वर्षांकरिता तडीपार केले होते. सोमवारी सायंकाळी बजाजनगरचे बीट मार्शल ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान ऑरेंज सिटी रुग्णालयामागे राम गादी भंडारजवळ चाकू संशयास्पदरित्या फिरताना दिसला. पोलिसांना पाहताच त्याने पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. चौकशीत तो तडीपार असल्याचे पुढे आले.

## अनाथाश्रम येथे फळ वाटप

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २७ :

२७ सेप्टेंबरला माजी नगरपरिषद अध्यक्ष शाहजहान भाई सफाहत यांच्या वतीने, कामठी येथील सेठ कस्तुरचंद डागा बाल सदन (अनाथाश्रम) येथे माजी केंद्रीय मंत्री, राज्यसभा सदस्य आणि अखिल भारतीय कॉंग्रेस समितीचे सरचिटणीस मुकुल वासनिक यांचा वाढदिवस अनाथ मुलांमध्ये साजरा करण्यात आला. ज्यामध्ये मुलांना चिप्स, बिस्किट पॅकेटसह फळांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर, शहर कॉंग्रेस समिती कार्यालयात केक कापून वासनिक यांचा वाढदिवस देखील साजरा करण्यात आला. यावेळी शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री रमेशजी दुबे, शहर कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तथा कार्यालयीन प्रभारी लक्ष्मण संगेवार, कामठी शहर सेवादल अध्यक्ष नितेश यादव, महिला कॉंग्रेस अध्यक्षा सुरैया बानो, माजी नगरसेवक अर्शद भाई, माजी नगरसेवक उबेद अफरोज, गोल्डन समाचारचे संपादक एम.ए. तैफब खान, जिल्हाध्यक्ष ताईफ खान आदी मान्यवर उपस्थित होते. कॉंग्रेसचे सरचिटणीस विशाल ताकभावरे, शहर कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस वासिक अन्सारी, सेवादल संयोजक अब्दुल सलाम भाई, विक्की सिंघानिया, महिला कॉंग्रेस उपाध्यक्ष शाहीन शेख, सरचिटणीस चेतना गोडबोले, आशा ताय गौरे, समसून बाजी, विभा मेश्राम, शबाना परवीन, असगरी बेगम आदीं कार्यकर्ते उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**
नागपूर विभाग
ई-टेंडर सूचना
मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील खालील कामांच्या अंमलबजावणीसाठी स्थापित कंत्राटदारांकडून Sr.DEE/TRS/ELS/AQ द्वारे डिजिटल स्वाक्षरी केलेले ऑनलाइन खुले ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा सूचना क्रमांक – ELS/AQ/DRG/WCQ/25-26/16 दिनांक २४.०९.२०२५, कामाचे नाव – ईएलएस/एक्यू च्या ३-फेज इलेक्ट्रिक लोकोमोटिव्हच्या सीसीबी आणि ई-७० पॅनेलच्या ब्रेक सिस्टमशी संबंधित दुरुस्ती/ओव्हरहॉलिंग क्रियाकलाप. कामाची अंदाजे किंमत रु. ४६,३३,२००.००/- (रु. छेचाळीस लाख तेहतीस हजार, दोनशे फक्त), कमाल ठेव – रु. ९२,७००.००/- (रु. बयाण्णव हजार, सातशे फक्त). पूर्ण होण्याचा कालावधी – २४ महिने, निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ – दि. २४.१०.२०२५ वेळ १५.०० तास. वेबसाइट पत्ता :http:ireps.gov.in
SUN 214 Sr.DEE/TRS/ELS/AQ
टिकट के लिए UTS APP डाउनलोड करे

**Change Of Name**

MY OLD NAME WAS RAJESH-KUMAR MANOHARLAL BARAGWNE. NOW MY NEW NAME IS RAJESH MANOHAR BARAGVNE.
ADD : BETALA ,BETARA, BHANDARA 441905.

MY OLD NAME WAS VIDYA PREMJI KAPADI. NOW MY NEW NAME IS VIJAYA PREMJI KAPADI.
ADD : FLAT NO.102, KAVITA APT. BEHIND ASIRWAD KIRANA STORE NARENDRA NAGAR NAGPUR - 440015.

MY OLD NAME WAS VIREN-DRA KUMAR HARINKHEDE. NOW MY NEW NAME IS VIRENDRA TILAKCHAND HARINKHEDE.
ADD : NEAR NUTAN SCHO-OL, HANUMAN MANDIR, RAM-NAGAR, GONDIA 441614.

MY OLD NAME WAS MOHD AYUB KHAN/AYUB TAJ KHAN. NOW MY NEW NAME IS MOHAMMAD AYUB MOHAMMAD YUSUF.
ADD : HOUSE NO.380 BHAL-DARPURA NAGPUR 440018.

MY OLD NAME WAS SHEIKH MD HASHIR HAROON. NOW MY NEW NAME IS MOHAM-MAD HASHIR SHEIKH MOHA-MMAD HAROON SHEIKH.
ADD : FLAT NO.202 KAMGAR NAGAR NAGPUR 440026.

MY OLD NAME WAS SUMAIYA KHANAM HABEEB KHAN. NOW MY NEW NAME IS SUMAIYYA NIGAR HARIS PATHAN.
ADD : PLOT NO.04 SWAGAT NAGAR NAGPUR 440013.

MY OLD NAME WAS SHAIKH KAREEM SHAIKH YASEEN. NOW MY NEW NAME IS SHEIKH KARIM SHEIKH YASIN .
ADD : PLOT NO 434 ASHIR-WAD NAGAR NEAR N I T GROUND NAGPUR 440024.

MY OLD NAME WAS TOSHIB-UDDIN RAFIKUDDIN. NOW MY NEW NAME IS TAUSI-FUDIN RAFIKUDIN SHEIKH.
ADD : CHITRA TALKIES CHAUK, NAGPUR

## भारत महा ई-व्ही रॅलीचे भव्य स्वागत



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

भारत महा ई-व्ही रॅली नागपूरात दाखल होताच शहराने त्याचे रूपांतर हरित गतिशीलतेच्या उत्सवात केले. तब्बल २१,००० किलोमीटर आणि १०० दिवसांच्या या ऐतिहासिक प्रवासात नागपूर हे एक महत्त्वाचे टप्पे ठरले, जिथे नागरिक, विद्यार्थी व ई-व्ही प्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

मोतीबाग रेल्वे कॉलनीतील प्राचीन शिवमंदिरात आगमनानंतर रॅलीतील पाहुण्यांचे दुपट्टा व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. महा ई-व्ही रॅलीच्या पुढील प्रवासासाठी नियोग थेरपिस्ट डॉ. प्रवीण डबली यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीला रवाना केले.

या प्रसंगी रॅलीच्या प्रमुख संघात इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ इलेक्ट्रिक व्हेइकल असोसिएशन्सचे चेअरमन डॉ. शैलेन्द्र सरोज, डॉ. राजीव मिश्रा (प्रेसिडेंट), श्रीनिवास कुमार येपोंडू (ग्लोबल वाइस प्रेसिडेंट), रामेंद्र दीक्षित, राहुल, सुमित तसेच प्राचीन शिवमंदिर तर्फे प्रकाश राव (गुंडू), शेख परवेज, पी. सत्याराव, पी. विजयकुमार, पवन टेंभूर्णे, बादल टेंभूर्णे, रिंकू श्रीवास, अविनाश, गणेश श्रीवास आणि शिवमंदिर समितीचे सदस्य उपस्थित होते. मुख्य अतिथी म्हणून बोलताना डॉ. प्रवीण डबली म्हणाले की, नागपूरला भारत महा ई-व्ही रॅलीचे स्वागत करण्याचा अभिमान आहे. हे आयोजन शहराला हरित गतिशीलतेचे अग्रगण्य केंद्र बनविण्यास प्रेरणा देईल आणि भारताच्या नेट-झिरो संकल्पनेला बळकट करेल.

रॅलीच्या नागपूर मुक्कामात अनेक महत्त्वाचे कार्यक्रम झाले. रॅली पथकाने आरएसएस मुख्यालयात पदाधिकाऱ्यांची भेट घेतली तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या कार्यालयात भेट देऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला. संघाने जीरो माईल, भारताचे भौगोलिक केंद्र, येथे भेट देऊन शहराच्या ऐतिहासिक ओळखीला वंदन केले. नागपूरचे हे स्वागत रॅलीसाठी एक मैलाचा दगड ठरले आणि शहराला हरित क्रांतीच्या राष्ट्रीय अभियानाशी अधिक दृढतेने जोडले.

विदित असो की, देशव्यापी सर्वात मोठी इलेक्ट्रिक वाहन जनजागृती यात्रा भारत महा ई-व्ही रॅली सध्या सुरु आहे. २१,००० किलोमीटर आणि १०० दिवस चालणाऱ्या या प्रवासाचे आयोजन इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ इलेक्ट्रिक व्हेइकल असोसिएशन्सच्या वतीने करण्यात येत आहे. भारताला शाश्वत व स्वच्छ गतिशीलतेकडे नेणे हे या रॅलीचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

## विशेष ग्रामसभेला गावकऱ्यांची गर्दी

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २७ :

खसाळा गावात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान आणि विशेष ग्रामसभा मोठ्या उत्साहात पार पडली. या ग्रामसभेला गावकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी करून आपल्या विषय सादर केले. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, सरपंच जयश्री इंगोले, तहसीलदार जगदाळे, गटविकास अधिकारी येवले आणि विस्तार अधिकारी गावंडे आदी उपस्थित होते.

ग्रामसभेत सुरुवातीला कार्यकारी अधिकारी महामुनी यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला आणि गावातील विकासकामांची माहिती घेतली. त्यांच्या हस्ते स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ झाला तसेच वृक्ष लागवडही करण्यात आली. गावकऱ्यांनी यावेळी स्वच्छतेची शपथ घेतली. ग्रामसभेत सामाजिक उपक्रमांतर्गत वृद्धांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. महिलांच्या बचत गटाच्या उद्योगाचा शुभारंभही या वेळी झाला.

## मोक्षधाम घाटावर स्वच्छता मोहिमेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

नागपूर येथील केंद्रीय संचार ब्यूरो (सीबीसी) क्षेत्रीय कार्यालयाने, नागपूर महानगरपालिकेच्या सहकार्याने देशभरातील "स्वच्छता ही सेवा" मोहिमेचा भाग म्हणून शहरातील मोक्षधाम घाट परिसरात एका विशेष स्वच्छता मोहिमेचे यशस्वी आयोजन केले होते. एक दिवस एक घंटा एक साथ या उपक्रमांतर्गत ही मोहीम आयोजित करण्यात आली होती.



"स्वच्छता ही सेवा आहे" हा संदेश अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचवणे तसेच सार्वजनिक ठिकाणी सफाई आणि स्वच्छता राखण्यासाठी सामूहिक सामुदायिक जबाबदारीला प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. शहरातील महत्त्वाच्या ठिकाणांपैकी एक असलेला मोक्षधाम घाटासारख्या ठिकाणी स्वच्छ आणि आनंददायी वातावरणाची गरज अधोरेखित करण्याच्या उद्देशाने हे स्थळ मोहिमेसाठी निवडण्यात आले होते.

सीबीसी नागपूरच्या अधिकारी आणि कर्मचारी, महापालिका कर्मचारी आणि स्वयंसेवक यांनी या मोहिमेत सक्रीय सहभाग घेतला. या पथकाने मोक्षघाट परिसरात साफसफाई, कचरा संकलन आणि प्लास्टिक आणि इतर जैवविघटनशील नसलेल्या वस्तू गोळा करण्याचे काम हाती घेतले. घाटाचा परिसर साफ, स्वच्छ तसेच वापरण्यास सोयीस्कर बनवण्याकडे विशेष लक्ष देण्यात आले.

# 'थ्री इडियट्स'चा 'हीरो' आता 'व्हिलन'?

स्वतंत्र राज्याचा दर्जा आणि सहाव्या अनुसूचीत समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी लडाखची राजधानी लेहमध्ये उडालेला भडका तूर्त शमला आहे. गुरुवारी लेहमध्ये संचारबंदीदरम्यान शांतता होती. बुधवारी पोलिस आणि सुरक्षा दलासमवेतच्या हिंसक चकमकीत ४ तरुणांचा मृत्यू झाला. ८० जण जखमी झाले. त्यात ४० पोलिस कर्मचारी आहेत.

---

लडाखचे लेफ्टनंट गव्हर्नर कविंदर गुप्ता म्हणाले, जखमींमध्ये काही नेपाळ-काश्मीरच्या डोडामधील आहेत. लडाखमध्ये तणाव निर्मितीच्या हेतूने ही नियोजनबद्धरीत्या हिंसा असल्याचा संशय आहे. गुरुवारच्या उच्चस्तरीय बैठकीत यावर गंभीर चर्चा झाली. जखमींमध्ये तीन नेपाळी, काश्मिरी आहेत. हिंसेचा तपास परदेशी कटाच्या बाजूनेही केला जात आहे

गृह मंत्रालयाने लेह हिंसेसाठी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना जबाबदार धरले. वांगचुक यांच्या विधानांनी तरुण भडकले असा आरोप केला. गुरुवारी मंत्रालयाने वांगचुक यांची संस्था स्टुडंट्स एज्युकेशनल अँड कल्चरल मूव्हमेंट ऑफ लडाखचा (एसईसीएमओएल) विदेशी निधीचा परवाना रद्द केला.

परदेशी अनुदान वा दानासाठी एनजीओंना परदेशी योगदान (नियमन) कायद्यानुसार नोंदणी करावी लागते. मंत्रालयाच्या निर्देशानुसार सीबीआय टीम परदेशी निधीची चौकशी करत होती. त्यात संस्थेने निधीचा गैरवापर केल्याचे आढळले. यावर वांगचुक यांनी म्हटले की, ज्या रकमेची तपासणी होत आहे ती संयुक्त राष्ट्र, स्वित्झर्लंडचे एक जागतिक विद्यापीठ आणि एका इटालियन संघटनेला दिलेल्या ज्ञानाच्या ऐवजाच्या रूपात मिळाली होती.

गुरुवारी मृतदेह त्यांच्या कुटुंबियांना सोपवण्यात आले. व्हिडिओ फुटेजमधून हिंसाचारात सहभागी असलेल्यांचे चेहरे ओळखल्यानंतर पोलिसांनी आतापर्यंत ६० जणांना अटक केली आहे. त्यांची चौकशी सुरू आहे.

दरम्यान, वांगचुक यांनी आरोप केला की, केंद्र सरकार लडाखच्या मूळ समस्येपासून लक्ष विचलित करण्यासाठी हिंसेचा आरोप करत आहे. सरकार नागरिक सुरक्षा कायद्याअंतर्गत मला अटक करून तुरुंगात पाठवण्याची तयारी करत आहे. मला व काँग्रेसला जबाबदार धरले जात आहे. त्यातून काही निष्पन्न होणार नाही. उलट स्थिती बिघडू शकते.

बुधवारी लडाखची राजधानी लेह आग, धूर, दगडफेक आणि गोळ्यांच्या आवाजाने दणाणली. यात चार जणांचा मृत्यू झाला आणि ८० हून अधिक लोक जखमी झाले. गेल्या ३६ वर्षांतील लडाखमधील हा सर्वात हिंसक दिवस होता. केंद्र सरकारने सोनम वांगचुक यांना हिंसाचारासाठी जबाबदार धरले आणि म्हटले की त्यांनी नेपाळच्या जेन-झी निदर्शनांचा उल्लेख करून लोकांना भडकावले.

लडाखमध्ये बुधवारी झालेला हिंसाचार ही अचानक घडलेली घटना नाही. ही भूमिका अनेक वर्षांपासून आखली जात होती. ५ ऑगस्ट २०१९ रोजी जम्मू आणि काश्मीरमधून कलम ३७० हटवल्यानंतर लडाखला केंद्रशासित प्रदेश बनवण्यात आले. सोनम वांगचूक आणि त्यांच्या समर्थकांची मागणी आहे की लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा देण्यात यावा. या मागणीसाठी वांगचुक यांनी यापूर्वीही अनेक वेळा उपोषण केले आहे, परंतु त्याचे कोणतेही परिणाम दिसून आले नाहीत.

सोनम वांगचुक आणि त्यांच्यासह १५ जणांनी १० सप्टेंबर रोजी ३५ दिवसांचे उपोषण पुकारले होते. हा संप लेह एपेक्स बॉडी आणि कारगिल डेमोक्रॅटिक अलायन्स यांनी पुकारला होता.

वांगचुक म्हणाले की जर ते ३५ दिवस जगले तर पुढचा टप्पा ६ आठवड्यांचे उपोषण असेल. पण जर केंद्र सरकारने



यादरम्यान चर्चा सुरू केली तर उपोषण मोडले जाईल.

दरम्यान, संपाच्या १४ व्या दिवशी म्हणजे २३ सप्टेंबर रोजी सोनम लेरिंग अंगचुक आणि ६० वर्षीय ताशी डोलमानी यांच्यासोबत संपावर असलेले ७२ वर्षीय वृद्ध आजारी पडले आणि त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले. यानंतर परिस्थिती तणावपूर्ण बनली.

एलएबी संघटनेच्या युवा शाखेचे कार्यकर्ते संतप्त झाले. त्यांनी २४ सप्टेंबर रोजी लडाख बंदची हाक दिली. गर्दी जमवण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करण्यात आला. लोकांना लेह हिल कौन्सिलमध्ये पोहोचण्याचे आवाहन केले.

लेह हिल कौन्सिलसमोर आंदोलकांना रोखण्यासाठी बॅरिकेड्स लावण्यात आले होते. आंदोलक पुढे सरकताच पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या सोडल्या, परंतु जमावाने पोलिसांचे वाहनही जाळले आणि तोडफोड केली. भाजप कार्यालय आणि सीआरपीएफचे वाहन पेटवून देण्यात आले. या हिंसाचारात चार जणांचा मृत्यू झाला आणि ८० हून अधिक लोक जखमी झाले. लेहमध्ये कर्फ्यू लागू करण्यात आला आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे.

या हिंसाचाराच्या कारणांबद्दल सोनम वांगचुक म्हणतात, 'या आंदोलनात मोठ्या संख्येने तरुण सहभागी होते. तरुणांचा संयम सुटत होता. त्यांना वाटले की गेल्या काही दिवसांपासून लोक उपोषणावर आहेत आणि सरकारने ६ ऑक्टोबर रोजी चर्चेसाठी सांगितले होते. ते थांबत आहेत. अशा परिस्थितीत लोक संतप्त झाले, पण पोलिसांनी थोडा धीर धरायला हवा होता. अशा ठिकाणी गोळी मारणे टाळता येते, ज्यामुळे जीवितहानी होऊ शकते.

हिंसाचारानंतर, सोनम वांगचुक यांनी त्यांचे १५ दिवसांचे उपोषण संपवले, परंतु गृह मंत्रालयाने या हिंसाचारासाठी सोनम वांगचुक यांना जबाबदार धरले आहे. निवेदनात म्हटले आहे की, 'सोनम वांगचुक यांनी चिथावणीखोर विधानांनी जमावाला भडकावले आणि जेव्हा हिंसाचार सुरू झाला तेव्हा उपोषण संपवले आणि रुग्णवाहिकेतून त्यांच्या गावी गेले.

लडाखचे उपराज्यपाल कविंद्र गुप्ता म्हणतात की परिस्थिती जाणूनबुजून चुकीच्या दिशेने गेली आहे आणि यामागे एक कट असू शकतो. काँग्रेस नेत्यांनी हिंसाचार भडकावला की इतरांनी हिंसाचार भडकावला. सोनम वांगचुक हे लडाखमध्ये 'अरब स्प्रिंग-शैली'चे निदर्शने करण्याची इच्छा बऱ्याच काळापासून व्यक्त करत आहेत. त्यांनी त्यांच्या वैयक्तिक मुद्द्यांशी संबंधित कोणतेही चुकीचे कृत्य लपविण्यासाठी या व्यासपीठाचा वापर केला आहे का, जे आता पुढे येत आहे.

**निदर्शकांच्या ४ मुख्य मागण्या:**

लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा देण्यात यावा. सहाव्या अनुसूची अंतर्गत संवैधानिक संरक्षण दिले पाहिजे.

कारगिल आणि लेहसाठी स्वतंत्र लोकसभा बैठका घ्याव्यात.

सरकारी नोकऱ्यांमध्ये स्थानिक लोकांना भरती करावे.

गृह मंत्रालयाला सादर केलेल्या मसुद्यात LAB आणि KDA ने म्हटले आहे की लडाख चीन आणि पाकिस्तानच्या सीमेवर आहे. ते जोडलेले आहे आणि धोरणात्मक दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे. मिझोराम, त्रिपुरा, सिक्कीम सारख्या ईशान्येकडील राज्यांना सहाव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट करून पूर्ण केले आहे. त्यांचे हक्क देखील कलम 371 अंतर्गत संरक्षित आहेत. लडाखमधील लोकांचे हक्क देखील संरक्षित केले पाहिजेत.

१६ जानेवारी २०२३ रोजी, LAB आणि KDA लडाखबाबतच्या त्यांच्या मागण्यांचा पहिला मसुदा केंद्रीय सभागृहात सादर करतील. तो मंत्रालयाकडे पाठवला जाईल. २३ जानेवारी २०२३ रोजी सोनम वांगचुक यांनी १३ मिनिटांच्या व्हिडिओमध्ये पंतप्रधान मोदींना आवाहन केले की, 'सरकार या मागणीकडे का लक्ष देत नाही याचे लडाख येथील लोक आश्चर्यचकित आहेत.

एक काळ असा होता जेव्हा मी पंतप्रधान मोदींचा समर्थक होतो. मी कलम ३७० हटवण्याच्या सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले होते, परंतु लडाखला केंद्रशासित प्रदेश बनवल्यानंतर आम्हाला वाईट वाटले. अनेक प्रकारे त्याचा परिणाम होत आहे. आम्ही फक्त जम्मू आणि काश्मीरमध्येच चांगले होतो.

२६ जानेवारी २०२३ रोजी, सोनम यांनी लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा या मागणीसाठी १८,००० फूट उंचीवर चढाई केली. खारदुंगला खोऱ्यात ५ दिवस उपोषण करण्याचा प्रयत्न केला. येथील तापमान -४० अंशांपर्यंत राहते. तथापि, अधिकाऱ्यांनी त्यांना घरातच नजरकैदेत ठेवले.

सोनम म्हणाले, 'एलजी साहेब ही युक्ती अवलंबत आहेत. तुम्ही शांत लडाखमध्ये अतिरेकीपणाची बीजे पेरण्यासाठी कठोर परिश्रम करत आहात. येथे तरुणांना बेरोजगार ठेवून त्यांच्यावर अत्याचार केले जात आहेत, परंतु आम्ही हे होऊ देणार नाही. तुमच्या नजरकैदेला मी घाबरत नाही.'

१८ जून २०२३ रोजी वांगचुक यांनी लेहमधील एनडीएस स्टेडियममध्ये पुन्हा उपोषण सुरू केले आणि २६ जून रोजी ते संपले. २०२४ पासून या आंदोलनाला गती मिळू लागली. LAB ने ३ फेब्रुवारी २०२४ रोजी 'लेह चलो' ची हाक दिली होती, तर KDA ने कारगिल बंदची हाक दिली होती. सोनम यांनी ६ मार्चपासून लेहना शहीद पार्क येथे २१ दिवसांचे उपोषण केले.

सप्टेंबर २०२४ मध्ये, सोनम यांनी १३० लोकांसह लेह ते दिल्ली सुमारे एक हजार किमीची 'दिल्ली चलो पदयात्रा' काढली. ३० सप्टेंबर रोजी दिल्ली पोलिसांनी त्यांना दिल्लीतील सिंघू सीमेवर ताब्यात घेतले. काही विरोधी नेत्यांनी त्यांना दिल्लीत भेट दिली.

५ ऑक्टोबर २०२४ रोजी सोनम यांनी दिल्लीतील लडाख भवन येथे उपोषण सुरू केले. या काळात स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया सारख्या संघटनांनी त्यांना पाठिंबा दिला. २१ ऑक्टोबर २०२४ रोजी गृह मंत्रालयाने डिसेंबरमध्ये त्यांच्याशी चर्चा करण्याचे आश्वासन दिले.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात भाजपने लडाखसाठी योजना आखली आहे. त्यांच्या निवडणूक आश्वासनात मागण्यांचा समावेश केला होता. त्यात लडाखला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा मिळेल, लडाखची भोटी भाषा आठव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट केली जाईल. लडाख भारतीय संविधानाच्या सहाव्या अनुसूची अंतर्गत आणले जाईल, असे म्हटले होते.

२०२० च्या लडाख हिल कौन्सिल निवडणुकीसाठी भाजपने जाहीरनाम्यातही ही आश्वासने दिली होती. जर सरकारला हवे असेल तर ते संविधान संशोधन विधेयकाद्वारे लडाखमध्ये पूर्ण राज्यत्वाच्या तरतुदी लागू करू शकते. तथापि, आतापर्यंत सरकारने या संदर्भात कोणतेही पाऊल उचललेले नाही.

८ मार्च २०२४ रोजी एलएबी आणि केडीए, नेत्यांसोबत झालेल्या बैठकीत अमित शहा यांनी लडाखचा सहाव्या अनुसूचीत समावेश करण्याची मागणी नाकारली. २७ मे रोजी केंद्र सरकारने लडाख आरक्षण सुधारणा नियमावलीची अधिसूचना जारी केली.परंतु लडाखला राज्याचा दर्जा देण्याबाबत एकमत झाले नाही. आता लडाख हे लहान राज्य नेपाळच्या वाटेवर जावू लागले आहे की काय? शंका निर्माण झाली आहे.

■ ■ ■

# क्रांतीचा आवाज : शहीद-ए-आझम भगतसिंग

*सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल मे है*
*देखना है जोर कितना बाजू-ए-कातिल मे है*



भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात आपल्या विचारांनी, शौर्याने आणि बलिदानाने ज्यांनी सशस्त्र क्रांतीची ज्योत पेटवली त्या शहीद-ए-आझम भगतसिंग यांचा जन्म २८ सप्टेंबर १९०७ रोजी पंजाब प्रांतातील ल्यालपूर (आताचे पाकिस्तान) जिल्ह्यातील बंगा गावात झाला.

स्वातंत्र्यसंग्रामात उतरण्याची प्रेरणा त्यांना बालवयात त्यांच्या घरातूनच मिळाली. भगतसिंग यांचे वडील किशनसिंग, काका अजीतसिंग आणि स्वर्णसिंग हे सर्व त्यावेळी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय होते. ब्रिटिशांच्या कॉलोनियल ॲक्ट विरोधात आंदोलन केल्यामुळे त्यांना जेल मध्ये टाकण्यात आले. त्यामुळे भगतसिंग यांच्या मनात देशभक्तीची बीजे खोलवर रुजली होती. बालवयापासूनच भगतसिंग यांनी ब्रिटिश साम्राज्याचे अन्याय आपल्या डोळ्यांनी पाहिले.

जालियनवाला बाग हत्याकांडाने त्यांच्या मनावर क्रांतीचा खोल ठसा उमटवला. लहानपणी त्यांनी शाळेत मातीच्या कुंडीत एक रोपटे लावून त्या मातीला मुक्त भारताची माती असे नाव दिले होते. शिक्षणादरम्यान त्यांनी इतिहास, समाजवाद, तत्त्वज्ञान व राजकारण यांचा गाढ अभ्यास केला.

भगतसिंग यांनी हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन मध्ये प्रवेश करून चंद्रशेखर आझाद व इतर तरुण क्रांतिकारकांच्या सोबतीने सशस्त्र क्रांतीच्या माध्यमातून स्वातंत्र्य मिळवण्याचा संकल्प केला. १९२८ मध्ये लाला लाजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी त्यांनी आपले साथीदार राजगुरू व सुखदेव यांच्यासह सॉंडर्स या ब्रिटिश पोलिस अधिकाऱ्याची हत्या केली.

१९२९ मध्ये त्यांनी बटुकेश्वर दत्त यांच्यासह दिल्लीतील केंद्रीय विधानसभेत बॉम्ब टाकून इंकलाब जिंदाबाद चा जयघोष केला. हा बॉम्ब हल्ला जीवघेणा नव्हता. ब्रिटिश सरकारच्या कानावर सशस्त्र भारतीय क्रांतिकारकांचा आवाज पोहोचवणे हा त्यांचा उद्देश्य होता.

भगतसिंग हे केवळ क्रांतिकारक नव्हते तर एक विचारवंतही होते. त्यांनी समाजवाद, साम्यवाद व शोषणमुक्त समाज या संकल्पना अभ्यासल्या आणि लोकांसमोर मांडल्या. त्यांचे सुप्रसिद्ध पुस्तक मी नास्तिक का आहे, हा त्यांच्या तर्कशक्तीचा आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाचा पुरावा आहे. स्वातंत्र्य केवळ परकीय सत्तेपासून नव्हे तर अंधश्रद्धा, जातिवाद आणि आर्थिक शोषणापासूनही असावे असे ते मानत.

२३ मार्च १९३१ रोजी लाहोर तुरुंगात भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. तत्पूर्वी चंद्रशेखर आझाद यांचा देखील मृत्यू झाला होता. या चौघांच्या बलिदानाने संपूर्ण देशाला धक्का बसला. पण त्यामुळे स्वातंत्र्यलढ्याला अधिक नवे बळ मिळाले.

भगतसिंग हे फक्त एक क्रांतिकारी व्यक्तिमत्त्व नाही, तर ते आजही देशाच्या तरुणांसाठी एक प्रेरणादायी आदर्श व्यक्तिमत्व आहेत. देशासाठी जगण्याची व मरायला तयार होण्याची शिकवण, समाजातील विषमता दूर करण्याची धडपड आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची ताकद हे सर्व त्यांच्या विचारांतून आपण आजही घेऊ शकतो.

भगतसिंग यांचे संपूर्ण जीवन म्हणजे क्रांतीची शाळा आहे. त्यांनी स्वातंत्र्यासाठी केवळ शस्त्र उचलले नाही तर विचारांचे शस्त्र वापरले. त्यांच्या बलिदानाने भारतीय स्वातंत्र्यलढा अधिक तीव्र झाला आणि लाखो नवीन तरुण क्रांतिकारकांना प्रेरणा मिळाली.

भगतसिंग यांचे नाव देशाच्या इतिहासात कायमअमर झाले. म्हणूनच त्यांना शहीद-ए-आझम म्हणून सन्मानित केले जाते. असे भारताचे सुपुत्र, थोर क्रांतिकारक शहिद भगतसिंग यांना त्यांच्या जयंतीनिमित्त त्रिवार अभिवादन.

■ ■ ■



**सुमेघ रामचंद्र वानरे**
**(शिक्षक)**
**नॅशनल मिलिटरी स्कूल, अकोला.**
**९१३००२१३८७**

# दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या लतादीदी

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांची आज जयंती. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती.

लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव जगातील आठवे आश्चर्य ठरले.

आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती.

लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकारांची रांग लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आरडी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली.



त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले.

जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक पुरस्कार दिले.

१९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम. एस. सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या.

त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला.

कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली.

लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही.

आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर आज हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे.

दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

■ ■ ■



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

# संस्कृतीचे जतन : एक अनुभव

बेंगलोरमध्ये मला एक आगळावेगळा अनुभव आला. मुलीला बसस्टॉपवर सोडून परतताना एका मंदिरात दर्शनासाठी गेले. मंदिर छोटे आणि रस्त्याच्या कडेलाच होते. सकाळची वेळ होती, पूजा सुरू होती आणि वातावरण अतिशय प्रसन्न होते.

मी सेवकांना विचारले, आत जाऊ का नमस्कारासाठी? त्यांनी होकार दिला. पण लगेचच एका महिला सेविकेने सांगितले, साडी नेसल्याशिवाय प्रवेश नाही. मी ओढणीसकट ड्रेसमध्ये असूनही त्यांनी ठामपणे सांगितले, उद्यापासून फक्त साडी नेसूनच या.

क्षणभर आश्चर्य वाटले; परंतु लगेचच एक महत्त्वाची जाणीव झाली, येथील महिला स्वतः आपल्या परंपरेचे आणि वस्त्रसंहितेचे काटेकोर पालन करतात. संस्कृतीचे जतन ही केवळ मोठ्यांची जबाबदारी नसून सामान्य भक्तही त्याला गांभीर्याने घेतात, हे पाहून आनंद झाला. याच्या उलट महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी वस्त्रसंहिता लागू झाल्याची घोषणा झाली असली तरी प्रत्यक्षात तिचे पालन होताना क्वचितच दिसते. आधुनिकतेच्या नावाखाली संस्कृतीकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती वाढताना जाणवते.

खऱ्या अर्थाने संस्कृती टिकवायची असेल, तर ती आपल्याला स्वतःहून पाळावी लागेल. मंदिरात जाताना शुचिर्भूत वस्त्रांचा आग्रह धरणे हा सुद्धा परंपरेचा भाग आहे.

आधुनिकतेसोबत परंपरेचा अभिमान जपला, तरच पुढील पिढीला खरी संस्कृतीचा वारसा देता येईल आणि मंदिरातील चैतन्य ग्रहण करता येईल.



**वाचक लिहितात**

■ **सौ. रमा देशमुख नागपूर.**

# श्रीजी ऑरनॅमेनट्स या सराफा कंपनीचा इन्कमटॅक्सवाल्यांनी भांडाफोड कसा केला?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**



**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना.**

आज आपण श्रीजी ऑरनॅमेनट्स या सराफा कंपनीचा इन्कमटॅक्सवाल्यांनी भांडाफोड कसा केला, या बद्दल माहिती बघणार आहोत. करदाते computer द्वारे व्यवहार करतात, व नंतर ते delete करतात, तरी इन्कमटॅक्स अधिकारी त्यांना धरू शकतात, हे श्रीजी कंपनीवरून आपल्याला बघायला मिळेल.

**प्रश्न** - श्रीजी ऑरनॅमेनट्स या कंपनी च्या भांडाफोड मध्ये डिजिटल सर्च एंड ब्रेक डाऊन झाला होता, म्हणजे नेमके काय झाले होते, त्या बद्दल संक्षिप्त माहिती द्यावी.

■ श्रीजी ऑनमिंट्स ही कंपनी सराफा कंपनी होती. यांचा धंदा सोनं-चांदी खरेदी, विक्रीचा होता. गुजरात राज्याच्या अहमदाबाद डायरेक्टोरेट च्या राजकोट युनिटने मे २०१३ मध्ये श्रीजी कंपनीवर धाड टाकली. या सर्चमध्ये कंपनीने अकाउंट मध्ये न दाखवलेले फॉरेन व्यवहार होते. दोन भारताबाहेरील अकाउंट सुद्धा होते यात फॉरेनच्या बँकेत होते ते भारतीय इन्कमटॅक्स विभागापासून चोरून ठेवले होते.

इतकेच नाही तर फॉरेन बँकेशी व्यवहार करून ते अकाउंट डिलीट करण्यात आलेले होते. त्यात standard bank, London यांचाही दोन नंबरचे अकाउंट होते. यात इन्कमटॅक्स विभागाने फॉरेन्सिक ॲनालिसिस केले व त्यात श्रीजी कंपनीचा भांडाफोड झाला. यात खालील महत्त्वाची माहिती इन्कम टॅक्स वाल्यांना मिळाली, ती अशी होती Standard bank, london ला $ 1,02,43,185.62 इतक्या रकमेचे ई-मेल करण्यात आले होते.

हे ई-मेल कंपनीने attachment स्वरूपात पाठवले होते, त्याची भारतीय चलनामध्ये 55,09,57,395 रूपात इतकी राशी होती. हा मेल 03/05/2013 ला लंडनला पाठवण्यात आला होता. तसाच हाताने लिहून पाठवलेला एक लाख डॉलर National bank of RAS Al Khaimah Dubai (U.A.E) इथून Standard bank यांना पाठवलेले स्टेटमेंट मिळाले, यावरून फॉरेन्सिक विश्लेषण मध्ये कंपनी धरली गेली. अशामुळे कंपनीचा ब्रेक डाऊन झाला असे म्हटले गेले.

वरील प्रकरण माझे नाही म्हणून सुरुवातीला कंपनीने आपले हात चक्क वर केले व आम्हाला काही माहिती नाही असा पवित्रा घेतला, या सर्व फाईल कंपनीने इन्कमटॅक्स अधिकारी यायच्या पूर्वीच डिलीट ही करून टाकल्या होत्या परंतु forensic bank audit नंतर सापडलेल्या Trail च्या आधारापुढे शेवटी त्यांना मान्य करण्यास इन्कमटॅक्स वाल्यांनी भाग पाडले.

याकरिता इन्कमटॅक्स विभागाने आंतरराष्ट्रीय अंतर्गत 12/08/2014 रोजी वड, UAE आणि Singapore येथील टॅक्स अधिकाऱ्याशी Contact केले व या सर्व देशांच्या अधिकाऱ्यांनी ताबडतोब सहकार्य केले. नंतर इन्कम टॅक्स विभागाने श्रीजी कंपनीवर मिळालेल्या पुराव्या आधारे खटला दाखल केला व या कंपनीचे नाव SIT तथा सुप्रीम कोर्ट यांना ही वर्ग करण्यात आले.

इन्कमटॅक्स विभागाने जर मनात घेतले तर डिजिटल सर्च मध्ये सुद्धा जेथे Computer चे Attchment व्यवहार जे कंपनीने डिलीट केलेले होते तेही फॉरेन्सिक ॲनालिसिस प्रक्रियेद्वारे पुन्हा प्राप्त करून कंपनीला रंगे हात धरले व असे कोणालाही धरू शकतात.

पुढच्या आठवड्यात डिजिटल म्हणजे काय? इन्कमटॅक्स अधिकारी computer मागु शकतात का? ते पासवर्ड मागु शकतात का? करदाता पासवर्ड देणे नाकारू शकतो का ? या computer system मध्ये Calculater येतात का? इन्कमटॅक्स अधिकारी computer जप्त करून घेऊन जाऊ शकतात का ? Holl marking म्हणजे काय ?

वाचकांनी इन्कमटॅक्स संबधीचे प्रश्न 9422218428 या नंबरवर व्हॉटसॲप करावे, ही नम्र सूचना.

■ ■ ■

**अशोकायन**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

## देणगी की खंडणी?

**समाज असो कोणताही**
**उत्सवप्रिय आहे भारी**
**गृप करूनी फिरती**
**देणगीसाठी घरोघरी ..!**

**वर्गणी मागण्याचे टोनिंग**
**जाणवते जरा रांगडे**
**असे भासवती जणू**
**सक्तिने द्यावेच लागेल गडे ..!**

**आम आदमी संभ्रमात -**
**ही देणगी आहे की खंडणी**
**शोषल प्रेशर , शब्दछला पुढे**
**पंगा घेईल कसा कुणी ?**

**त्यामुळेच की काय**
**डीजे वाजे कर्कश**
**नको ती गाणे वाजती**
**सुप्त ज्वालामुखी घुसमुसतो**
**हीच का समाज प्रबोधन निती ?**

# शालिनीताई मेघे हॉस्पिटलने ग्रामीण मानसिक आरोग्य कार्यक्रम सुरू केला

**नागपूर, २७ सप्टेंबर :** नागपूरमधील वानाडोंगरी येथील दत्ता मेघे मेडिकल कॉलेजशी संलग्न असलेले १०२०बेड्सचे मल्टी-सुपर-स्पेशालिटी शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर रुग्ण-केंद्रित सामाजिक आणि सामुदायिक सेवा देण्यात सातत्याने आघाडीवर आहे. फिरते आरोग्य दवाखाने, व्यसनमुक्ती केंद्रे आणि महाआरोग्य शिबिरे आणि इतर विविध आरोग्य मोहिमांद्वारे, हॉस्पिटलने मध्य भारतातील ग्रामीण लोकांवर सकारात्मक परिणाम केला आहे आणि आवश्यक आरोग्य सुविधा हॉस्पिटलच्या बाहेरही पोहोचवल्या आहेत.

ग्रामीण भागांमध्ये सहसा मानसिक आरोग्याची योग्य सोय नसते, त्यामुळे तिथे राहणाऱ्या लोकांना आवश्यक मदत मिळवणे कठीण ठरते.

या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलत, नागपूरचे सिव्हिल सर्जन आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी शालिनीताई मेघे हॉस्पिटलला हिंगणा तालुक्यातील ग्रामीण भागात मानसिक आरोग्य सेवांचा विस्तार करण्याची परवानगी दिली आहे. या कार्यक्रमाअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रांद्वारे मानसिक आरोग्य सल्ला आणि काउन्सेलिंग सेवा पुरवली जाणार आहे. या सेवा दर महिन्याला ठरलेल्या वेळापत्रकानुसार रायपूर येथे महिन्याच्या पहिल्या बुधवारी, अडेगाव येथे दुसऱ्या बुधवारी, टाकळघाट येथे तिसऱ्या बुधवारी आणि कन्होलीबारा येथे तिसऱ्या शुक्रवारी, सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत उपलब्ध असतील. या कार्यक्रमामुळे लोकांना सेवा सहज उपलब्ध होतीलच, शिवाय सातत्यपूर्ण काळजी देखील मिळेल.

या उपक्रमाची गरज अधोरेखित करत, शालिनीताई मेघे हॉस्पिटल मधील डेप्युटी डायरेक्टर कम्युनिटी सर्व्हिसेस डॉ. नरेश गिल यांनी सांगितले की, मानसिक आरोग्याशी संबंधित समस्या आता ग्रामीण भागातही वाढत आहेत. या समस्यांमध्ये सोशल मीडिया, जीवनशैलीतील बदल आणि विविध प्रकारच्या व्यसनांचा प्रभाव मोठा आहे. त्यांनी सांगितले की अशा सेवा मानसिक आणि मानसिक आरोग्याच्या समस्या लवकर ओळखण्यासाठी, योग्य वेळेवर हस्तक्षेप करण्यासाठी आणि दीर्घकालीन व्यवस्थापनासाठी अत्यंत आवश्यक आहेत. ग्रामीण भागात लोकांच्या मनात गैरसमजुती आणि मदत घेण्याबाबत जागरूकतेचा अभाव असल्यामुळे या समस्या बऱ्याच वेळा लक्षात येत नाहीत.

हिंगणा तालुक्याचे आरोग्य अधिकारी यांनी देखील नागरिकांना या सेवांचा सक्रियपणे लाभ घेण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की मानसिक आरोग्यालाही शारीरिक आरोग्यासारखेच महत्त्व दिले पाहिजे. उपचारातील दरी कमी करून आणि तज्ञ सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देत, या कार्यक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील लोकांसाठी विश्वासार्ह मानसिक आरोग्य सहाय्याचा मार्ग तयार करणे आहे.

शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे चीफ मेडिकल सुपरिटेंडंट डॉ. वसंत गावंडे यांनी सांगितले की, या सेवा शालिनीमाई मेघे हॉस्पिटलच्या सायकेट्री विभागातील डॉ. अपूर्वा जोशी यांच्या मार्फत, विभागप्रमुख डॉ. पी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दिल्या जातील. या कार्यक्रमात वैद्यकीय उपचारांसोबतच (जसे की चिंता, नैराश्य, आत्महत्येची प्रवृत्ती आणि व्यसनाशी संबंधित समस्या) वैयक्तिक आणि कौटुंबिक काउन्सेलिंग देखील दिली जाईल. या सेवांमुळे व्यक्ती आणि कुटुंबांना भावनिक, वर्तनात्मक आणि नातेसंबंधातील अडचणी हाताळण्यासाठी मार्गदर्शन मिळेल आणि एकूणच आरोग्य व चांगले जीवनमान साध्य होईल.

डीएमआयएचईआर (ऑफ कॅम्पस) चे डायरेक्टर डॉ. अनुप मरार यांनी सांगितले की हा उपक्रम ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. ग्रामीण लोकांना लांबचे अंतर, खर्च आणि स्थानिक सोयी-सुविधांचा अभाव यामुळे तज्ज्ञ मानसिक आरोग्य सेवा सहज उपलब्ध होत नाहीत. अशा सेवा थेट त्यांच्या दारात पोहोचवून, शालिनीमाई मेघे हॉस्पिटलने सर्व समाजघटकांना समावेशक आणि सर्वांगीण आरोग्य सेवा देण्याच्या आपल्या बांधिलकीची पुन्हा एकदा जाणीव करून दिली आहे.

हिंगणा येथील आमदार समीर मेघे यांनी सांगितले की, पीएचसीद्वारे शालिनीताई मेघे हॉस्पिटल ने सुरू केलेला हा मानसिक आरोग्य सहाय्य कार्यक्रम हिंगणा तालुक्यातील ग्रामीण भागासाठी वरदान ठरेल. तसेच तृतीयस्तरीय आरोग्य संस्था आपल्या तज्ज्ञ सेवा गरजू भागांपर्यंत कशा पोहोचवू शकतात याचे हे एक उत्तम उदाहरण ठरेल.

# ओप्पो ने रेनो १४ ५जी दिवाळी एडिशन केली लाँच



**नागपूर, २७ सप्टेंबर :** रेनो १४ मालिकेला मिळालेल्या उदंड प्रतिसादावर आधारित, ओप्पो रेनो १४ ५जी दिवाळी एडिशन सादर करून आपल्या लाइनअपमध्ये उत्सवाची चमक आणत आहे. केवळ भारतासाठी डिझाइन केलेली ही विशेष आवृत्ती दोन वैशिष्ट्ये पहिल्यांदा एकत्र आणते: एक सखोल सांस्कृतिक रचना जी सौंदर्यपूर्वक मंडल, मोर आणि उत्सवाचे स्वरूप ह्याचा मिलाप करते, आणि दुसरी खासियत म्हणजे भारतात प्रथम उष्णता-संवेदनशील रंग बदलणारे तंत्रज्ञान*! हा नवोन्मेष असा एक अनोखा अनुभव निर्माण करतो जो जादुई तर आहेच, पण तितकाच अर्थपूर्ण देखील आहे जो की दिवाळीचे चैतन्य आणि अंध:कारावर उजेडाचा विजय, ह्याचे प्रतीक ठरतो. रेनो १४ ५जी दिवाळी एडिशन आता ८जीबी + २५६जीबी व्हेरियंटमध्ये ३९,९९९ मध्ये उपलब्ध आहे, परंतु विशेष सणाच्या ऑफर म्हणून, हा फोन मेनलाइन रिटेल आउटलेट्स, ओप्पो ई-स्टोअर, फ्लिपकार्ट आणि ॲमेझॉन वरून ३६,९९९ पेक्षा कमी किंमतीत खरेदी केले जाऊ शकतो.

ओप्पो मोबाईल फोन खरेदी करणाऱ्या ग्राहकांनाबक्षीस जिंकण्याची संधी मिळू शकते: १० मेगा विजेते: १० लाख रोख पारितोषिक, दररोज १ विजेता: १ लाख रोख पारितोषिक, कोणतेही ओप्पो उत्पादन: फीड एक्स ८, रेनो १४, ओप्पो एफ ३१ प्रो, ओप्पो एनको बड्स ३ प्रो, ३ महिन्यांची अतिरिक्त वॉरंटी आणि ५००० रिवॉर्ड पॉइंट्स.

लॉन्च बद्दल बोलताना गोल्डी पटनायक, हेड पीआर आणि कम्युनिकेशन्स, ओप्पो इंडिया, म्हणाले, दिवाळी हा प्रकाश, आनंद आणि एकत्र येण्याचा काळ आहे आणि रेनो १४ ५ जी दिवाळी एडिशनच्या सहाय्याने आम्हाला सणाची भावना खऱ्या अर्थाने प्रतिबिंबित करणारे काहीतरी बनवायचे आहे. ही विशेष आवृत्ती भारताच्या सांस्कृतिक समृद्धीपासून – जसे की पवित्र मंडल असो किंवा रुबाबदार मोर – यांच्यापासून प्रेरणा घेते. रेनो १४ ५ जी इंडस्ट्रीच्या पहिल्या उष्मा-संवेदनशील रंग बदलणाऱ्या डिझाइनच्या जादूशी जोडतो, ऋतूप्रमाणेच एक उत्सवी उपकरण तयार करतो. हा केवळ एक स्मार्टफोन नाही; तर दिवाळीचा आनंद आणि उत्साह प्रतिबिंबित करण्यासाठी डिझाइन केलेली ही एक सणाची आठवण आहे.

## नागपूरमध्ये रोबोटिक कार्डियाक सर्जरीचा विकास: हृदय सेवेमध्ये एका नव्या युगाची सुरुवात



**नागपूर, २७ सप्टेंबर :** कार्डियाक सर्जरीमध्ये रुग्णाला बरे होण्यासाठी लागणारा जास्त वेळ, मोठे छेद आणि प्रचंड शारीरिक वेदना या गोष्टी ठरलेल्या असायच्या. पण आज, नागपूर वैद्यकीय क्षेत्रात एका मोठ्या बदलाचा साक्षीदार होत आहे, तो बदल म्हणजे रोबोटिक-असिस्टेड कार्डियाक सर्जरी. ही एक मिनिमली इन्व्हेसिव्ह (कमीत कमी छेद असलेली) प्रक्रिया आहे, जी या प्रदेशातील हृदय सेवेला एक नवी दिशा देत आहे. या पद्धतीमुळे रुग्णांच्या आरोग्यात मोठे बदल घडत आहेत, ज्यामुळे ते लवकर बरे होत आहेत, त्यांना कमी वेदना होत आहेत आणि शस्त्रक्रियेचे अधिक अचूक परिणाम मिळत आहेत.

रोबोटिक कार्डियाक सर्जरीमध्ये लहान छेदांद्वारे रोबोटिक आर्म्स (यंत्रमानवाचे हात) शरीरात घातले जातात आणि सर्जन त्यांना मार्गदर्शन करतात. या प्रणालीमध्ये हृदयाचे मोठे (मॅग्निफाइड), हाय-डेफिनिशन ३डी दृश्य दिसते, ज्यामुळे सर्जन झडपांची दुरुस्ती आणि कोरोनरी बायपाससारख्या नाजूक प्रक्रिया अधिक अचूकतेने करू शकतात.

रोबोटिक्स आणि मिनिमली इन्व्हेसिव्ह कार्डियाक सर्जन डॉ. सौरभ वार्ष्णेय यातील फरक स्पष्ट करतात: रोबोटिक कार्डियाक सर्जरी म्हणजे अचूकता आणि रुग्णाचे आराम. या तंत्रज्ञानामुळे, आम्ही छातीचा मोठा भाग उघडणे टाळू शकतो आणि त्याऐवजी की-होल (अत्यंत लहान) छेदांद्वारे काम करतो. याचा परिणाम म्हणजे शरीराला कमी इजा, कमी रक्तस्राव आणि लवकर रिकव्हरी. नागपूरमधील रुग्ण आता पारंपरिक शस्त्रक्रियेच्या तुलनेत खूप लवकर त्यांच्या सामान्य जीवनात परत येऊ शकत आहेत.

नागपूरमध्ये रोबोटिक कार्डियाक सर्जरीचा अवलंब करणे हा एक अत्यंत महत्त्वाचा क्षण आहे. मध्य भारतातील रुग्णांना अशा प्रगत आरोग्यसेवेसाठी अनेकदा मोठ्या महानगरांमध्ये प्रवास करावा लागत होता. आता, हे तंत्रज्ञान स्थानिक पातळीवर उपलब्ध झाल्यामुळे, त्यांना जागतिक दर्जाच्या हृदय सेवेसाठी नागपूरबाहेर जाण्याची गरज नाही. यामुळे केवळ वेळेवर उपचार मिळत नाहीत, तर शहराबाहेर प्रवास करण्याचा आर्थिक आणि भावनिक भारही कमी होतो. डॉक्टरांसाठी, हे तंत्रज्ञान शरीराच्या सर्वात नाजूक अवयवावर काम करताना अतुलनीय कौशल्य आणि नियंत्रण प्रदान करते१५. सर्जन्ससाठी, रोबोटिक प्लॅटफॉर्म मानवी शरीरातील सर्वात गुंतागुंतीच्या अवयवावर एकावर काम करताना कौशल्य, दृष्टी आणि अचूकता वाढवतात.

रोबोटिक कार्डियाक सर्जरी आता केवळ एक मर्यादित पर्याय राहिलेला नाही; जगभरात हजारो यशस्वी शस्त्रक्रिया पार पडल्यामुळे ही हृदय सेवेतील एक विश्वसनीय प्रगती बनली आहे. भारतात याचा वाढता अवलंब हे सुनिश्चित करतो की रुग्णांना अशा उच्च-स्तरीय तंत्रज्ञानासाठी परदेशात किंवा मोठ्या शहरांमध्ये प्रवास करण्याची गरज नाही१८. नागपूरमध्ये याचा उत्साहाने स्वीकार झाल्यामुळे, या शहराने प्रगत आणि रुग्ण-स्नेही कार्डियाक सेवेचे केंद्र म्हणून भारताच्या नकाशावर आपले स्थान पक्के केले आहे.

तज्ज्ञांच्या मते, ही केवळ एक तांत्रिक प्रगती नाही; तर नागपूरसाठी आरोग्यसेवेतील एक मोठा मैलाचा दगड आहे. तंत्रज्ञान आणि शस्त्रक्रिया कौशल्याचा मिलाफ करून, ही पद्धत हृदयरोग्यांसाठी अचूकता, सुरक्षितता आणि जलद रिकव्हरीचा एक नवीन मापदंड प्रस्थापित करते.

## एसजीएम कॅन्सर हॉस्पिटलने गुंतागुंतीच्या ऑर्बिटल रीकन्स्ट्रक्शनद्वारे दृष्टी व चेहऱ्याची सममिती पुनर्स्थापित केली



**गोंदिया, २७ सप्टेंबर :** प्रिसिजन सर्जरीच्या क्षेत्रात एक ऐतिहासिक यश संपादन करत, एसजीएम कॅन्सर हॉस्पिटल (एसजीएमएसएच) येथील मॅक्सिलोफेशियल सर्जरी टीमने २८ वर्षीय अपघातग्रस्त रुग्णाची दृष्टी आणि चेहऱ्याची सममिती एका अत्यंत गुंतागुंतीच्या ऑर्बिटल फ्लोर रीकन्स्ट्रक्शनद्वारे यशस्वीरीत्या पुनर्स्थापित केली. ही शस्त्रक्रिया रुग्णासाठी विशेष तयार केलेल्या सीटीडी-सीएएम टायटॅनियम इम्प्लांटच्या साहाय्याने करण्यात आली, जे रुग्णाच्या निरोगी डोळ्याच्या ऑर्बिटप्रमाणे डिझाइन करण्यात आले होते. रुग्णाचा गंभीर रस्ते अपघात झाला होता.

तरुण रुग्णाला ऑर्बिटल फ्लोर ब्लोआउट फ्रॅक्चर झाला होता, ज्यामुळे डोळा खोल गेला (एनोफ्थाल्मोस) व डोळे दुहेरी दिसणे (डिप्लोपिया) ही समस्या निर्माण झाली होती. ही अवस्था कार्यात्मक तसेच सौंदर्यदृष्ट्या मोठे आव्हान होती, ज्यासाठी अत्यंत नाजूक व जोखमीची शस्त्रक्रिया आवश्यक होती.

सर्जिकल टीमने डिजिटल प्लॅनिंग व अत्याधुनिक इमेजिंग तंत्रज्ञानाचा वापर करून प्रभावित ऑर्बिटसाठी सीएडी-सीएएम आधारित कस्टम मेष तयार केले. हे इम्प्लांट-लेस ट्रान्सकंजक्टिव्हल पद्धतीने बसवण्यात आले, ज्यामुळे चेहऱ्याचे सौंदर्य अबाधित राहिले आणि अतिरिक्त ट्रॉमा टळला.

डॉ. नितीन भोला, वरिष्ठ मॅक्सिलोफेशियल सर्जन, एसजीएमएसएच म्हणाले, हे जणू रेशमी धागे व काचांच्या गोळ्यांच्या पेटीत काम केल्यासारखे होते प्रत्येक हालचालीत अत्यंत अचूकतेची गरज होती. पण आमच्या टीमचे कौशल्य आणि काटेकोर प्री-ऑपरेटिव्ह प्लॅनिंग यामुळे ही शस्त्रक्रिया पूर्ण यशस्वी झाली. ही नेहमीची फ्रॅक्चर रिपेअर नव्हती. किंचितही चूक झाली असती तर कायमस्वरूपी आंधळेपणा, कॉर्नियाचे नुकसान किंवा ऑर्बिटल हॅमरेज होऊ शकले असते.

या शस्त्रक्रियेची गुंतागुंत या कारणामुळे अधिक होती की फ्रॅक्चरचा भाग महत्त्वाच्या संरचनांच्या ऑप्टिक नर्व्ह, एक्स्ट्राऑक्युलर स्नायू आणि ग्लोब (आयबॉल) अगदी जवळ होता. यासाठी सूक्ष्म पातळीवर अचूकता आणि नाजूक हाताळणी आवश्यक होती.

परिणाम विलक्षण ठरले. शस्त्रक्रियेनंतर केवळ एका आठवड्यात रुग्णाच्या डोळ्यांची असमानता पूर्णतः दुरुस्त झाली व डबल व्हिजन नाहीसे झाले. पोस्ट-ऑपरेटिव्ह सीटी स्कॅनमध्ये इम्प्लांट अचूक बसल्याचे व ऑर्बिटल व्हॉल्यूम पूर्णपणे पुनर्स्थापित झाल्याचे दिसून आले. हे प्रकरण दाखवते की रुग्ण-विशिष्ट, तंत्रज्ञानावर आधारित उपाय व तज्ज्ञ सर्जनांचे कौशल्य यांचा संगम कसा जटिल चेहऱ्याच्या दुखापतींमध्ये जीवनपरिवर्तनकारी ठरू शकतो.

एसजीएम कॅन्सर हॉस्पिटल वैयक्तिक पुनर्निर्माण शस्त्रक्रियेत सातत्याने अग्रेसर असून, अत्याधुनिक तंत्रज्ञान व शल्यविशेषज्ञता यांच्या साहाय्याने रुग्णांचे केवळ रूपच नव्हे, तर दृष्टी व जीवनमानही पुनर्स्थापित करत आहे.

## शेव्हेलियर दे ल' ऑर्ड्रे देस आर्ट्स एट देस लेट्रेसया फ्रेंच पुरस्काराने श्रीमती संगीता जिंदाल सन्मानित



**मुंबई, २७ सप्टेंबर :** भारतातील फ्रान्सचे राजदूत महामहिम थिएरी माथू यांनी जेएसडब्ल्यू फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती संगीता जिंदाल यांना फ्रान्सच्या सर्वात प्रतिष्ठित सन्मानांपैकी एक असलेल्या शेव्हेलियर दे ल' ऑर्ड्रे देस आर्ट्स एट देस लेट्रेसचे (नाईट ऑफ द ऑर्डर ऑफ आर्ट्स अँड लेटर्स) सन्मान चिन्ह आज प्रदान केले. श्रीमती जिंदाल यांच्या मुंबईतील निवासस्थानी हा सन्मान त्यांना देण्यात आला. भारतातील कला, संस्कृती आणि वारसा संवर्धनातील अपवादात्मक योगदान तसेच भारत-फ्रेंच सांस्कृतिक संबंधांना चालना देण्याच्या जिंदाल यांच्या प्रयत्नांसाठी हा पुरस्कार देण्यात आला.

जेएसडब्ल्यू फाउंडेशनच्या प्रमुख असलेल्या श्रीमती जिंदाल यांच्यासाठी संस्कृतीला सर्वोच्च महत्त्व आहे. त्यांच्या प्रत्येक ध्येयाच्या केंद्रस्थानी सांस्कृतिक वारसा आहेच. फ्रान्ससोबत त्यांनी अनेक नवीन गतिमान भागीदारी तयार केल्या आहेत. हंपी आर्ट लॅब्समधील कलाकारांच्या निवासस्थानांद्वारे, त्यांनी भारत आणि फ्रेंच कलाकारांमध्ये परस्पर संवादासाठी उत्तम जागा निर्माण केल्या आहेत. पॅरिस ऑलिंपिक दरम्यान कला आणि खेळ यांच्यातील संवाद अधोरेखित करण्यासाठी २०२४ मध्ये त्यांनी फ्रान्ससोबत सहकार्य केले. तर या वर्षाच्या अखेरीस, त्या पॅरिसमधील मोबिलियर नॅशनल येथे टेक्सटाइल मॅटर्स प्रदर्शनात भाग घेतील.

पुरस्कार प्रदान करताना राजदूत थिएरी माथू म्हणाले: त्यांची आवड, दूरदृष्टी आणि उदार दृष्टिकोनाद्वारे, श्रीमती जिंदाल यांनी भारताचा सांस्कृतिक दृष्टिकोन खोलवर आत्मसात केला आहे. तसेच आपल्या दोन्ही देशांना एकमेकांच्या जवळ आणले आहे. हा सन्मान म्हणजे त्यांच्या कामगिरीबद्दल आणि सांस्कृतिक पूल बांधण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेबद्दल फ्रान्सला वाटणारी कृतज्ञता आणि कौतुक दर्शवते. या दोन देशांमधील अतिशय फलदायी सहकार्य आणि संवादाची ही केवळ सुरुवात याची मला खात्री आहे.

कृतज्ञतेने हा पुरस्कार स्वीकारताना श्रीमती संगीता जिंदाल म्हणाल्या: फ्रान्सकडून झालेल्या या गौरवामुळे मला खूप आनंद झाला आहे. दोन्ही देशांमध्ये अर्थपूर्ण सांस्कृतिक पूल बांधताना भारताच्या वारशाचे रक्षण करण्याच्या माझ्या वचनबद्धतेला यामुळे प्रोत्साहन मिळाले आहे. ज्यांच्यासोबत काम करण्याचा मला बहुमान मिळाला असे अनेक कलाकार, कारागीर, संरक्षक आणि संस्था यांच्याप्रती कृतज्ञ राहून मी हा सन्मान स्वीकारते आहे. वारसा हा पिढ्यांना जोडणारा एक दुवा आहे आणि हा वारसाच भविष्याला प्रेरणा देत राहील, यासाठी मी कायम कार्यरत राहीन.

## मीडियाटेक डायमेन्सिटी ९५०० : ही फ्लॅगशिप चिपसेट पुढील पिढीतील मोबाईल उपकरणांसाठी उत्कृष्ट कार्यक्षमता


**मुंबई, २७ सप्टेंबर :** स्मार्टफोन सिस्टम-ऑन-चिप क्षेत्रातील जागतिक आघाडीचा नाविन्यपूर्ण निर्माता मीडियाटेक यांनी आपली आजवरची सर्वात प्रगत मोबाईल प्लॅटफॉर्म मालिका मीडियाटेक डायमेन्सिटी ९५०० सादर केली आहे. ऑन-डिव्हाइस एआय, कन्सोल-स्तरीय गेमिंग आणि ऊर्जा कार्यक्षमतेत नवे मापदंड प्रस्थापित करत, मीडियाटेक डायमेन्सिटी ९५०० ही फ्लॅगशिप फाईव्ह जी स्मार्टफोन्सच्या पुढील लाटेला अधिक सामर्थ्य देण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे.

मीडियाटेक डायमेन्सिटी ९५०० मध्ये तिसऱ्या पिढीचे ऑल बिग कोअर सीपीयू डिझाइन अवलंबले आहे. यात ४.२१ गीगाहर्ट्झ अल्ट्रा कोअर, तीन प्रीमियम कोअर्स आणि चार परफॉर्मन्स कोअर्सचा समावेश असून, फोर-लेन यूएफएस ४.१ स्टोरेजची जोड आहे. या डिझाइनमुळे मागील पिढीच्या तुलनेत सिंगल-कोअर कार्यक्षमतेत २९ टक्क्यांपर्यंत आणि मल्टी-कोअर कार्यक्षमतेत १६ टक्क्यांपर्यंत वाढ मिळते. तसेच अल्ट्रा-कोअर शिखर कार्यक्षमतेदरम्यान ५५ टक्क्यांपर्यंत कमी ऊर्जा वापरतो, ज्यामुळे वापरकर्त्यांना अधिक बॅटरी आयुष्य आणि जास्त उत्पादकता साध्य होते.

यावेळी मीडियाटेकचे कॉर्पोरेट वरिष्ठ उपाध्यक्ष व वायरलेस कम्युनिकेशन्स व्यवसाय विभागाचे जनरल मॅनेजर जेसी सू यांनी सांगितले की, एआय दैनंदिन जीवनाचा भाग बनत असताना ग्राहकांना अशी उपकरणे हवी आहेत जी अधिक स्मार्ट, जलद आणि वैयक्तिक वाटतील, परंतु त्यासाठी बॅटरी आयुष्याची आहुती द्यावी लागू नये. मीडियाटेक डायमेन्सिटी ९५०० हेच प्रदान करते. हे ऑन-डिव्हाइस एआयमधील क्रांतिकारी क्षमता, उच्च दर्जाची कार्यक्षमता व ऊर्जा कार्यक्षमता आणि प्रीमियम अनुभवांचा संपूर्ण संच उपलब्ध करून देते, जो आमचे भागीदार जगभरातील वापरकर्त्यांपर्यंत पोहोचवू शकतात. या प्लॅटफॉर्मच्या नवीन कॅशे आणि मेमरी आर्किटेक्चरमध्ये उद्योगातील पहिली ४-चॅनेल यूएफएस ४.१ ची साथ देण्यात आली असून, यामुळे वाचन/लेखन गती दुप्पट होते आणि मोठ्या एआय मॉडेल्सची लोडिंग ४०% वेगाने होते.

याशिवाय, या प्लॅटफॉर्मच्या एआय-संचालित संवाद तंत्रज्ञानामुळे ५जी मध्ये १०% आणि वाय-फाय परिस्थितीत २०% कमी ऊर्जा वापर होते, तर ५सीसी कॅरिअर ॲग्रीगेशन बँडविड्थ १५% ने वाढवते. तसेच, एआय पोझिशनिंग व नेटवर्क निवड तंत्रज्ञान स्पर्धकांच्या तुलनेत २०% अधिक अचूकता आणि ५०% कमी नेटवर्क विलंब देते. जागतिक स्तरावर स्मार्टफोन सिस्टम-ऑन-चिपचा सर्वात मोठा पुरवठादार असलेल्या मीडियाटेकने नवोपक्रम आणि सहकार्याद्वारे उद्योगातील परिवर्तन चालू ठेवले आहे. मीडियाटेक डायमेन्सिटी ९५०० ही प्रगत तंत्रज्ञान, उत्पादन विकास आणि इकोसिस्टम भागीदारीमध्ये वर्षानुवर्षांची गुंतवणूक याचे फलित आहे. मीडियाटेक अग्रगण्य गेम स्टुडिओ, उपकरण निर्माता आणि सॉफ्टवेअर भागीदारांसोबत जवळून काम करते, ज्यामुळे जगभरातील ग्राहकांना अत्युत्तम मोबाइल अनुभव प्रदान केला जातो. मीडियाटेक डायमेन्सिटी ९५०० द्वारा समर्थित फ्लॅगशिप स्मार्टफोन्स २०२५ च्या चौथ्या तिमाहीत बाजारात येण्याची अपेक्षा आहे. मीडियाटेक डायमेन्सिटी पोर्टफोलियोबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी, कृपया भेट द्या: https://i.mediatek.com/mediatek-5g.

## शब्दकोडे क्रमांक २२२६



**आडवे शब्द :-**
१) *** *** *** *** धम्मक लाडू, एक बालगीत
१०) पुष्परस
१२) अरण्य
१३) डोंगराचा तुटलेला भाग
१४) फुगणे, फोपावणे
१६) चुलता(हिं.)
१७) काव्य करणारा
१८) सौम्य धोरण
२०) एक अधिक एक चतुर्थांश
२१) खण, कप्पा
२३) धरणी
२५) पंख
२७) वरपांगी
२९) शरीरात सर्व भागात रक्त फिरणे
३२) कट्टा
३३) नेत्र
३५) शोध, माग
३६) च्या सह
३८) कलावंत
४०) मित्र
४१) गदळ, घाण
४३) मान्यता
४४) हालचालीवर ठेवलेली नजर
४५) आवाजांचा गोंधळ
४८) सदन
५०) चंद्र
५१) चादर
५२) रावणाला ठार मारणारा
५४) छोटी लढाई
५५) छाया
५७) शेवटच्या श्वासाचा आवाज
६०) च्या जवळ
६१) माराची उमटलेली खूण
६२) अनेकांच्या हाती सत्ता अव्यस्थित कारभार
६७) पोळी भाजण्याचे पात्र
६९) रेशमी धोतर
७०) अटीच्या भाषेतील दोन शब्द
७२) सदोदित
७३) मला टोचणारे दु:ख
७४) प्रज्वलित, तापलेले
७५) नमन, वंदन

**उभे शब्द:-**
२) अतिशयोक्ती करणे (वा.प्र.)
३) विद्यापीठातील विभागप्रमुख (इं.)
४) विद्यापीठाची पदवी प्राप्त झालेला
५) अंकुर
६) हिंदीत गूळ
७) हत्तीचे ओरडणे
८) तक्तपोशी, कडीपाट,
९) मोड
१०) एक सुगंधी वनस्पती
११) कोथिंबीरीचे बीज
१५) रेशीमाचे जाडसर कापड
१६) एक समसंख्या
१९) मन, मनातील विचार
२२) स्त्री, बाई
२४) नदीचा काठ
२५) अट, शर्त
२६) पातळसर
२८) छाती
३०) किरात
३१) उसाचे गुऱ्हाळ
३२) लहान बाळाचे चुंबन
३३) डोके
३४) पुष्पगुच्छ
३५) हद्दपार
३७) एकाग्र नजर
३८) भयंकर
३९) कावीळ, हळद्या रोग
४०) युद्ध भूमी
४२) छोटी लढाई
४६) मोठी कळशी
४७) डोक्यावर मारलेली हलकीशी चापट
४८) पक्का, भरपूर
४९) फजिती
५०) आठवड्यातील पहिला कामाचा दिवस
५२) श्रीरामाचे एक नाव
५३) असह्य वेदना
५६) खेकसणारा, तोंडाळ
५८) जननी
५९) धन्यवादाचा एक शब्द
६२) ढग
६३) सूर्याचे एक नाव
६४) नोकर
६५) चांदी
६६) रत्न
६८) दिवस
६९) सत्वांश
७१) दारूचा एक प्रकार

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## उत्कंठावर्धक महासंगम विशेष भागात सोनी सबवरील इत्ती सी खुशी आणि पुष्पा इम्पॉसिबलचा संगम

**मुंबई, २७ सप्टेंबर :** नवरात्रीच्या उत्सवी वातावरणात सोनी सब आपल्या प्रेक्षकांचे रंजन करण्यासाठी पुष्पा इम्पॉसिबल आणि इत्ती सी खुशी या दोन मालिकांना एकत्र आणून एक खास महासंगम सप्ताह सादर करत आहे. या महासंगमात पुष्पा (करुणा पांडे) आणि अन्विता (सुंबुल तौकीर खान) या दोन जबरदस्त महिला एकत्र येतील. त्या दोघी आपापल्या जीवनाचा कायापालट करणाऱ्या सत्यांचा सामना करत आहेत, ज्या सत्यामुळे त्यांचे जग हादरू शकते.

कथानक असे आहे की, आपला मुलगा अश्विन (समृद्ध बावा) सतत बंगळूरला जात असतो याबद्दल साशंक झालेली पुष्पा त्याचा शोध घेत-घेत खोताची वाडी या पत्त्यावर पोहोचते. पुष्पाचा संशय आणखी बळावतो, जेव्हा अश्विनच्या खिशात तिला कॅन्सरच्या औषधांचे प्रिस्क्रिप्शन सापडते. आपला मुलगा त्याचा मोठा आजार आपल्यापासून लपवत असल्याची तिला शंका येते. याचा शोध घेताना जे सत्य तिच्या समोर येते, ते तिला हादरवून सोडते. अश्विन कॅन्सरशी झुंज देणाऱ्या आपल्या पूर्वीच्या प्रेयसीसोबत दुहेरी आयुष्य जगत असल्याचे तिला समजते. दरम्यान, मालमत्ता कर न भरल्यामुळे अन्विताचे घर सील करण्यात येते आणि त्यामुळे तिचे जीवन अधांतरी झाले आहे. खोताची वाडी या ठिकाणी पुष्पा आणि अन्विता समोरासमोर येतात. अन्विताचा संघर्ष पाहून हेलावून गेलेली पुष्पा तिची बापोद्राशी (जयेश भारभाया) ओळख करून देते. अन्विताला त्याची मदत होईल अशी आशा तिला वाटते. तिचा हा आपलेपणा पाहून अन्विता भारावून जाते.

दुसरीकडे, अन्विताच्या व्यक्तिगत जीवनात आणखी एक वादळ आले आहे. संजय (ऋषी सक्सेना) एक पुरावा ठेवून विराट (रजत वर्मा)साठी एक सापळा रचतो आणि विराटचे सत्य उघडकीस आणण्यासाठी अन्विताला उद्युक्त करायचे ठरवतो. या गोंधळात, जेव्हा दिया अन्विताला एका डान्स स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रेरित करते तेव्हा आशेचा एक किरण दिसतो. बक्षीसाची रक्कम मिळाली, तर मालमत्ता कर भरता येईल अशी अन्विताला आशा वाटते. पण एक समस्या ही आहे की, स्पर्धा पार्टनर डान्सची आहे. संजयच्या सापळ्यातून वाचण्यासाठी विराट अचानक अदृश्य होतो त्यामुळे अन्विताला पुष्पासोबत जोडी बनवण्याखेरीज काहीच पर्याय राहात नाही.

अन्विता स्पर्धा जिंकून आपले घर वाचवू शकेल का? विराट संजयने रचलेल्या सापळ्यातून निसटू शकेल का? आणि पुष्पा अश्विनबद्दलचे सत्य स्वीकारू शकेल का?

या तीन-दिवसीय महासंगमात भरपूर नाट्य, सत्याचे खुलासे आणि भावनिक चढ-उतार असणार आहेत आणि पुष्पा व अन्विता या दोन सशक्त महिला लपलेल्या सत्याचा सामना करण्यास आणि संघर्षावर मात करण्यास सिद्ध आहेत.

## राशीभविष्य

**मेष :** सामाजिक कार्यात सहभागी व्हाल. तुम्ही तुमचे वर्तन सुधारण्याचा प्रयत्न कराल. तुमच्या काही कामांमध्ये जास्त वेळ लागेल, ज्यामुळे तुम्हाला ऑफिसमध्ये उशिरापर्यंत थांबावे लागू शकते.

**वृषभ :** संध्याकाळपर्यंत तुम्हाला चांगली बातमी मिळेल, ज्यामुळे घरात आनंदाचे वातावरण निर्माण होईल. तुमच्या प्रियकराशी तुमचे नाते आणखी गोड होईल. आजचा दिवस उत्तम जाईल.

**मिथुन :** आज सगळी कामं वेळच्या वेळी करा, यश मिळेल. नोकरीच्या शोधात असलेल्यांना नोकरीशी संबंधित बातम्या मिळतील. व्यवसायात कुटुंब आणि मित्रांकडून तुम्हाला पाठिंबा मिळेल.

**कर्क :** ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स आणि कापड उद्योगात गुंतलेल्यांना त्यांचा व्यवसाय वाढवावा लागू शकतो. तुमच्या कठोर परिश्रमाचे फळ तुम्हाला मिळेल. तब्येत थोडी बिघडू शकते. तणाव टाळा.

**सिंह :** जवळच्या मित्रांकडून तुम्हाला पाठिंबा मिळेल. मालमत्ता खरेदी किंवा विक्रीसाठी हा काळ विशेषत: अनुकूल राहणार नाही. या बाबतीत सावधगिरी बाळगा. तुम्हाला पालकांच्या आरोग्याची काळजी असेल.

**कन्या :** ऑफिसमध्ये जास्त कामाचा ताण असल्याने तुमच्या जोडीदारासोबत बाहेर जाण्याचे नियोजन रद्द होऊ शकते. तुमच्या व्यक्तिमत्त्वात सुधारणा करण्यासाठी देखील आजचा दिवस चांगला आहे.

**तुळ :** आजचा दिवस तुमच्या कुटुंबासाठी नवीन आनंद घेऊन येईल, हसतखेळत दिवस जाईल. तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत जास्त वेळ घालवाल. निर्णय घेणे तुमच्यासाठी थोडे कठीण जाईल.

**वृश्चिक :** आजचा दिवस आत्मविश्वासाने भरलेला असेल. तुम्ही अनेक कौटुंबिक जबाबदाजया चांगल्या प्रकारे पार पाडाल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला सहकाजयाकडून काही कामात मदत मिळेल.

**धनु :** आज, तुमच्या कामाच्या वातावरणात बदल होण्याची चिन्हे तुम्हाला मिळतील. स्वत:वर पूर्ण विश्वास ठेवा. तुमच्या शारीरिक आरोग्यापेक्षा तुमच्या मानसिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करा.

**मकर :** व्यवसायाच्या दृष्टिकोनातून, आज तुम्हाला अपेक्षेपेक्षा जास्त आर्थिक फायदा होईल. जर तुम्ही आज नोकरी बदलण्याचा निर्णय घेतला तर ते काळजीपूर्वक करा.

**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. तुमची मुले तुमच्यासाठी चांगली बातमी घेऊन येतील, ज्यामुळे कुटुंबातील सर्वांना आनंद होईल. आज तुम्ही निरोगी असाल, दिवस चांगला जाईल.

**मीन :** आजची सुरुवात काही चांगल्या बातमीने होईल, ज्यामुळे तुमचा उत्साह आणि उत्साह वाढेल. तुमच्या नोकरांना कामात बरे वाटू शकते. सत्तेत असलेल्यांना एखाद्या महत्त्वाच्या मोहिमेची सूत्रे सोपवता येतील.

# 'सौर ऊर्जा' आणि 'उत्तम वीज सेवा' ग्राहकांच्या दारी

## महत्त्वाच्या प्रकल्पांना युद्ध पातळीवर पूर्ण करण्याचे कार्यकारी संचालकांचे निर्देश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

महावितरणच्या वीज वितरण प्रणालीमध्ये आमुलाग्र सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि वितरण प्रणालीतील तांत्रिक व वाणिज्यिक हानी कमी करण्याच्या उद्देशाने, कृषी व गैर-कृषी वाहिन्यांचे विलगीकरण तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत उपकेंद्र सक्षमीकरणाच्या कामांना 'मिशन मोड'वर गती देण्याचे निर्देश महावितरणचे कार्यकारी संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांनी शनिवारी दिले. मुख्यालयाने निश्चित केलेल्या विहित वेळापत्रकानुसार ही सर्व कामे तातडीने आणि सर्वोच्च गुणवत्ता मानकांचे पालन करून पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले.



नागपूर परिमंडलात सुरू असलेल्या या महत्त्वपूर्ण तांत्रिक प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे यांनी पुढे स्पष्ट केले की, कृषी व गैर-कृषी वाहिन्यांच्या विलगीकरणामुळे थेट वीज ग्राहकांना तांत्रिक व गुणात्मक फायदे मिळतील. विलगीकरण पूर्ण झाल्यावर गैर-कृषी ग्राहकांना स्वतंत्र वाहिनीद्वारे वीजपुरवठा मिळेल. यामुळे वितरण प्रणालीवरील ताण कमी होऊन तांत्रिक हानी लक्षणीयरीत्या कमी होईल. हानी कमी झाल्यास, त्याचा अप्रत्यक्ष लाभ दीर्घकाळात वीज दराच्या स्थैर्यासाठी उपयुक्त ठरेल. वाहिनी विलगीकरणामुळे एकूण वीज पुरवठा खंडित वेळेत मोठी घट होईल.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत उपकेंद्र सक्षमीकरणाची कामे वेळेत पूर्ण करण्यावर रेशमे यांनी भर दिला. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर शेतकऱ्यांना दिवसाच्या वेळेत सौर ऊर्जेवर आधारित वीजपुरवठा मिळेल.

यामुळे त्यांची शेतीची कार्यक्षमता वाढेल आणि रात्रीच्या वेळी सिंचनासाठी शेतात जाण्याचा धोका सुरक्षिततेच्या दृष्टीने पूर्णपणे टळेल. कामाच्या अंमलबजावणीतील स्थानिक अडचणी एजन्सीजला येत असल्यास, त्या तातडीने सोडवण्यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सकारात्मक समन्वय ठेवावा, असे स्पष्ट निर्देश रेशमे यांनी दिले.

महावितरणतर्फे राबविण्यात येत असलेल्या 'सेवा पर्वा'मध्ये प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीवर विशेष लक्ष देण्यात आले. ही योजना विकेंद्रित वीज निर्मितीस प्रोत्साहन देते. या योजनेतंर्गत ग्राहकांचे वीज बिल शून्य होण्यास मदत होते , त्यामुळे अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष ग्राहक भेटी घेऊन या 'मायक्रो-लेव्हल सोलर इंटिग्रेशन' योजनेत अधिकाधिक ग्राहकांना सहभागी करून घेण्याचे आवाहन कार्यकारी संचालक यांनी यावेळी केले.

या बैठकीला नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, नागपूर शहर मंडलचे अधीक्षक अभियंता अमित परांजपे, नागपूर ग्रामिण मंडलचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे, वर्धा मंडलच्या अधीक्षक अभियंता स्मिता पारखी, पायाभूत आराखडा विभागाचे अधीक्षक अभियंता मंगेश वैद्य यांच्यासह नागपूर जिल्ह्यातील सर्व कार्यकारी अभियंता आणि वर्धा व नागपूर जिल्ह्यात कार्यरत असलेल्या एजन्सीजचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# राज्यात महा भारतीय वसतिगृहे स्थापन करा : प्रा डॉ.अंबादास मोहिते

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

आपला भारत देश एक कल्याणकारी राष्ट्र असल्यामुळे संविधानाला अभिप्रेत सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायावर आधारित समाजव्यवस्था उभारत असतांना समाजात असलेल्या विषमता दूर करण्यासाठी आणि अनुसूचित जाती-जमाती आणि इतर दुर्बल घटकाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी विशेष काळजी घेण्याच्या दृष्टीने अनेक योजना आणि उपक्रम राबविले जातात.

आपल्या महाराष्ट्र राज्याने सुद्धा लोककल्याणकारी राज्य म्हणून जनतेचे जीवनमान उंचावण्याकरिता धोरण राबवत असतांना राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांच्या शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीसाठी पुढील प्रमाणे विशेष तरतुदी केलेल्या आहेत. अनुसूचित जाती घटकांसाठी बार्टी (बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था), मराठा, कुणबी, मागास घटकांसाठी सारथी (छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था), माळी, कुंभार, तांबे, लोहार, सोनार, इ. वंचित घटकांसाठी महाज्योती (महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था) आदिवासी समाजासाठी टीआरटी (आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था) मुस्लिम, जैन, बौद्ध, ख्रिश्चन, ज्यू, शीख आणि पारशी अल्पसंख्यांक समाजासाठी एमआरटी (अल्पसंख्यांक संशोधन व प्रशिक्षण संस्था) उपरोक्त सर्व संस्थांचे ध्येय जवळपास समान म्हणजे त्या- त्या समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक सक्षमीकरण करणे आणि त्यासाठी संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक प्रोत्साहन, शैक्षणिक संशोधन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, प्रशिक्षण, कौशल्य विकास व रोजगारोन्मुख कार्यक्रम इत्यादी उपक्रम राबविणे.

तसेच आदिवासी विभागातर्फे आदिवासी विद्यार्थ्यांकरिता आश्रम शाळा व वसतिगृह, सामाजिक न्याय विभागातर्फे अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांसाठी आश्रम शाळा व वसतिगृह, इतर बहुजन कल्याण विभागातर्फे विमुक्त जाती जमाती करिता आश्रम शाळा आणि बहुजन विद्यार्थ्यांकरिता वसतिगृह आदी योजना राबविल्या जातात.

वरील संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि आश्रम शाळा व वसतिगृह योजना समाजातील मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांच्या हिताच्या आणि प्रगतीच्या आहेत, वंचित समुदायांच्या विकासासाठी आहेत या बद्दल दुमत वा शंका असण्याचे काही कारण नाही. धर्म आणि जातीनुसार वेगवेगळ्या शासकीय संशोधन व प्रशिक्षण संस्था, वसतिगृह यामुळे सामाजिक सलोखा ढासळण्याची शक्यता वाढते.

# आभा नगरी झोपडपट्टी येथे दुषित पाणी पुरवठा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

प्रभाग 29 बेसा पावर हाऊस च्या मागील आभा नगरी झोपडपट्टी येथील 30 ते 35 नागरिकांनी अनुसूचित जाती मोर्चा दक्षिण नागपूर अध्यक्ष बंटी पैसाडेली यांना घरी जाऊन असी तक्रार केली की या भागा मध्ये 2 वर्षापासून नळाला कमी दाबाने पाणी येतो आणि नेहमी टँकरने पाणी पुरवठा करण्यात येते. तसेच 15 ते 20 दिवसात नळाला अचानक गडरेचे पाणी व लाल किडे येत असतात. नुकताच 16 ते 18 लोकांना नळ कनेक्शन मिळाले असुन त्या नळाला एक बुंद पाणी नाही असी तक्रार स्थानिक नागरिकांनी अनुसूचित जाती मोर्चा दक्षिण नागपूर अध्यक्ष बंटी पैसाडेली यांना केली असता समस्याची जानीव घेऊन त्वरित संबंधित अधिकारी हनुमान नगर झोनचे झेडम आकाश बागडे यांना त्वरित समस्याची जानीव करून दिली. मौका चौकशी करून झोपडपट्टीतील नागरिकांच्या समस्यांचे निराकरण आठ दिवसाच्या आतमध्ये करून देईल, अशी हमी बागडे साहेबांनी दिली असतात काही तांत्रिक अडचणी पावसामुळे आज दिनांक 24/9/2025 रोजी ते नवीन 16ते 18



कनेक्शन व झोपडपट्टीत नळाला पाणी सुरु झाले आणि त्यांच्या समस्या चे निराकरण करण्यात आले.

# कोराडी मंदिरात भाविकांना साबुदाणा खिचडी वाटप

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

26 सप्टेंबरला कोराडी कॉलनी गेट नंबर दोन वर सुरक्षा रक्षक उत्सव मंडळ तर्फे नवरात्रोत्सवानिमित्त कोराडी मंदिरात येणाऱ्या भाविकांना साबुदाणा व केळी प्रसाद म्हणून वितरीत करण्यात आले. कार्यक्रमाला राठोड वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) वरिष्ठ सुरक्षा अधिकारी सती वाले, वरिष्ठ सुरक्षा अधिकारी पाटील, वरिष्ठ सुरक्षा अधिकारी मुंडे, सुरक्षा अधिकारी येसनकर, भांडारकर, बागडे सावरमेंढूवाचे सरपंच केने, सहाय्यक सुरक्षा अधिकारी फुलसुंगे, रहांगडाले गजभिये, बोरकर व सर्व सुरक्षारक्षक हजर होते.

# फेगड येथे जनावरांना लसीकरण

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. २७ :

पावसाळ्यात जनावरांमध्ये सर्वाधिक फैलावणारा आणि अत्यंत संसर्गजन्य मानला जाणारा तोंडखुरी व पायखुरी हा विषाणूजन्य रोग थांबवण्यासाठी फेगड गावात पशुवैद्यकीय विभाग व ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने जनावरांचे मोफत लसीकरण करण्यात आले.

मोहिमेदरम्यान गावातील शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. लसीकरणाबरोबरच जनावरांची काळजी घेण्याचे उपाय, रोगाची प्राथमिक लक्षणे कशी ओळखावी याबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



पशुधन विकास अधिकारी डॉ. अविरत सवाईमूल यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. प्रत्यक्ष मोहिमेचे कामकाज पशुधन पर्यवेक्षक रुपेश खोडणकर यांनी केले. तसेच गावातील सरपंच आशीष पाल यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाला पाठिंबा दर्शविला. मोहिमेत शेकडो जनावरांचे यशस्वी लसीकरण झाले असून गावातील पशुपालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या मोहिमेमुळे फेगड गावात पशुसंवर्धनाबाबत जनजागृती झाली असून शेतकऱ्यांच्या दृष्टीने हे उपक्रम एक मोठा दिलासा ठरला आहे.

# प्रत्यक्ष भेटीपेक्षा जनतेची कामे वेळेवर झाली पाहिजे : आ. समीर मेघे

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २७ :

नेत्यांशी दररोज भेट झाली नाही तरी जनतेची समस्या सोडवून त्यांची कामे वेळेवर झाली पाहिजे. लाभाच्या योजना त्यांच्या पर्यंत पोहचल्या पाहिजे याची काळजी घेत असल्याचे विधान आमदार समीर मेघे यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत "सेवा पंधरवाडा"नुसार तालुक्यातील ३२३ अतिक्रमण असलेल्या लाभार्थ्यांना नियमाकुल करून पट्टे वाटप व विविध योजनेच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र व शासकीय मदत देण्यासाठी आमदार समीर मेघे यांच्या अध्यक्षतेखाली आज तहसील कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी वंदना



सवरंगपते,जिल्हा परिषदेचे माजी विरोधीपक्ष नेते अतिष उमरे,माजी जि. प.सभापती उज्वला बोढारे, संजय गांधी निराधार कमिटीचे तालुका अध्यक्ष नरेंद्र वाघ,तहसीलदार सचिन कुमावत, गटविकास अधिकारी संदीप गोळशलवार, नायब तहसीलदार सुजाता गावंडे, नितीन गोहणे, सर्वेश मेश्राम, रंजना मडावी,माजी जि.प. सदस्य धनराज आष्टनकर, सनियंत्रण समिती अध्यक्ष विकास दाभेकर,गजेंद्र खोबे, विशाल भोसले, प्रवीण खाडे,हिंगण्याच्या नगराध्यक्ष लता गौतम,सरपंच उमेश आंबटकर,सरपंच प्रमोद डाखळे,सुचिता चामाटे,वीरश्री चानपुरकर,विनोद उमरेडकर आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला शासनाचीआर्थिक मदत,गुमगाव येथील कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या बालिकेच्या कुटुंबातील सदस्यांना मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत, अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेल्या गावकऱ्यांना आर्थिक मदतीचे धनादेश व १९ गावातील ३२३ अतिक्रमण धारकांना मालकी पट्टे यावेळी वाटप करण्यात आले.

प्रास्ताविक भाषणात तहसीलदार कुमावत यांनी मागील सहा महिन्यात मोठ्या प्रमाणात मालकी पट्टे वाटप झाले असून लवकरच उर्वरित सर्वांना पट्टे मिळणार असल्याचे सांगितले. तसेच तालुक्यात आधी ४२७ पांधण रस्ते असल्याच्या नोंदी होत्या मात्र महसूल विभाग व पंचायत समिती, ग्राम पंचायत स्तरावर प्रत्यक्ष ग्रामसभा व सर्वेक्षण सुरु केल्यानंतर याची संख्या अडीच पट वाढून आता ११२७ झाल्या.

या पांधण रस्त्याच्या विकास झाल्यावर प्रत्येक शेतकऱ्याला शेतात जाण्यासाठी अडचण होणार नाही असे सांगितले. संचालन नायब तहसीलदार सुजाता गावंडे तर आभार नायब तहसीलदार नितीन गोहणे मानले.

# कृउबा समिती भिवापूरची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. २७ :

कृषी उत्पन्न बाजार समिती, भिवापूरची वार्षिक सर्वसाधारण सभा व कृषी मेळाव्याचे आयोजन शुक्रवार 26 सप्टेंबर करण्यात आले होते. कृषी उत्पन्न बाजार समिती मार्केट यार्ड मधील आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानि खासदार श्यामकुमार बर्वे उपस्थित होते. अतिथी म्हणून आमदार संजय मेश्राम, माजी ऊर्जा राज्यमंत्री राजेंद्र मुळक, सभापती बालु इंगोले, उपसभापती चंद्रशेखर ढाकुणकर, सचिव रामकृष्ण गोंगल यांची उपस्थिती होती. कृषी मार्गदर्शनात शासकीय कृषी विस्तार अधिकारी यांनी कृषी विभागाच्या योजना विषयी तसेच पिकाविषयी माहिती देण्यात



आली. यावेळी आमदार संजय मेश्राम, माजी राज्यमंत्री राजेंद्र मुळक यांनी शेतकऱ्याच्या कृषी मालास योग्य भाव मिळण्याची गरज असल्याचे सांगितले. अध्यक्षीय भाषणात खा. श्यामकुमार बर्वे यांनी सतत पडणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन, पराठी, मिरचीचे पिके धोक्यात आल्यामुळे शेतकरीवर्ग आर्थिक अडचणीत असल्याचे सांगून योग्य नुकसान भरपाई मिळण्या बाबत पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# कन्हान येथे फार्मासिस्ट दिवस उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. २७ :

कन्हान केमिस्ट द्वारे फार्मासिस्ट दिवस शीतला माता मंदिर परिसरात गुरुवार ला उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमात अध्यक्ष पवन भिमनवार, जेष्ठ सदस्य राजेंद्र हटवार, राजेंद्र पोटभरे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये ऑनलाईन दवाई विक्री आणि अनैतिक डिस्काउंट चा निषेध करण्यात आला. कार्यक्रमात विविध प्रकारची जनजागृती करुन ऑनलाइन औषधं खरेदी करणे टाळा, तुमचे प्राण वाचवा, ऑनलाइन खरेदी केलेल्या औषधाचा दर्जा संशयास्पद आहे, तुमचा विश्वास असलेला फार्मासिस्ट हा खरा आरोग्य संरक्षक असतो. कोणतीही सवलत चांगल्या आरोग्यापेक्षा चांगली नाही, रोह्याची सुरक्षितता ही तुमची ओळखीची केमिस्ट आहे. सवलतीच्या मोहात पडू नका, सवलतींचा मोह थांबवा, आरोग्याशी संबंधित सर्व गोष्टींची काळजी घ्या, खोट्या जाहिराती टाळा, तुमच्या परिचित केमिस्टकडून खरी औषधे खरेदी करा, वर्षानुवर्षे सेवा देणाऱ्यांकडूनच औषधे खरेदी करा, सवलतीकडे लक्ष देऊ नका; बनावट औषधांपासून सावध रहा, असे आव्हाहन नागरिकांना केले आहे. या प्रसंगी शितल भिमनवार, कविता चव्हाण, शुभांगी ढोबळे, दीपक तिवारी, महेश मंगतानी, प्रकाश ढोबळे, शशीकांत पोहकर, केशव महल्ले, हर्षल वैद्य, योगेश ईखार, रौनक चौकसे, रोशन किरपान, उमेश ठाकरे उपस्थित होते.

---

**जाहीर नोटीस**
**कोर्ट विद्यमान,अध्यक्ष अपघात दावा न्यायाधिकरण, गडचिरोली येथील श्री. विनायक रा. जोशी साहेब यांच्या न्यायालयात**

एम.ए.सी.पी.क्र. २६/२०२५ निशाणी:१६

पेशी तारीख : ०६/११/२०२५

निला शंकर गावडे - अर्जदार
- विरुध्द -
सयद इमरान सयद गयासुद्दीन - गैरअर्जदार
वगैरे

सयद इमरान सयद गयासुद्दीन, वय- [illegible], धंदा- ट्रान्सपोर्ट, र. प्लाट नं. १९८०, गोरखेडी, ता. कळमेश्वर, जि. नागपूर- ४४१५०१

ज्याअर्थी अर्जदार निला शंकर गावडे यांनी दिनांक १०/०६/२०२५ रोजी आपल्या विरुध्द या न्यायालयात मोटर अपघात दावा दाखल केला आहे. सदर दाव्याच्या संबंधात आपले म्हणणे मांडण्यासाठी दिनांक ०६ माहे नोव्हेंबर, २०२५ रोजी मध्यान्हपूर्व ११.०० वाजता या न्यायालयात आपण जातीने किंवा [illegible] सर्व महत्वाच्या प्रश्नाची उत्तरे देवू शकेल असा [illegible] वकिलामार्फत हजर [illegible] याद्वारे बोलाविण्यात येत आहे. तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास तुमच्या [illegible] होण्यास पात्र ठरेल.

आज दिनांक १९ माहे सप्टेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सहाय्यक अधिक्षक
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, गडचिरोली.

---

**कोर्ट विद्यमान श्री. रमेश कोळपे तहसीलदार, रामटेक यांचे न्यायालय**

प्र.क्र. /एम.आर.सी.-/८९/२०२५
मौजा ता. रामटेक
जिल्हा नागपूर

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी भाऊराव दादो मेश्राम रा. भोजापूर ता. रामटेक, जि. नागपूर मो. ९६६९६३३३०२ यांनी वडील नामे दादो धावण मेश्राम यांचा मृत्यू दिनांक ०६.०८.२००३ रोजी मौजा भोजापूर, ता. रामटेक येथे राहत्या घरी झाला असून मृत्युची नोंद ग्रामपंचायत, भोजापूर येथे केली नाही त्याबाबत ग्राम पंचायत, भोजापूर यांचे प्रकाश्चे दिनांक १८.०६.२०२५ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे दादो धावण मेश्राम यांचा मृत्यु दिनांक ०६.०८.२००३ बाबत ग्रामपंचायत भोजापूर येथे नोंद घेणे बाबत आदेश पारित करणेकरिता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहिरनाम्याद्वारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद दादो धावण मेश्राम यांचा मृत्यु दिनांक ०६.०८.२००३ बाबत ग्रामपंचायत, भोजापूर येथे घेण्यात इतर कुणाचेही काही हरकती आक्षेप असल्यास उजर तक्रार असल्यास आपण दिनांक १७/१०/२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरूपात सक्षम पुराव्यासह या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजित तारखेनंतर निकालेल्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांना नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक २६/०९/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

स्थळ : रामटेक
दिनांक : २६/०९/२०२५

(रमेश कोळपे)
तहसीलदार, रामटेक

---

**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६१९८५

क.ली./प्रत्तु-२/तह.नाग (शहर)/कावि-५८२/२०२५ दिनांक : २२/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. निघत परवीन तबरेश अन्वर शेख रा. सतरंजी पुरा, नागपूर यांचा अर्ज दिनांक १२/०९/२०२५

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार निघत परवीन तबरेश अन्वर शेख रा. सतरंजी पुरा, नागपूर यांनी स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार निघत परवीन तबरेश यांचा जन्म दिनांक १२/०६/१९९१ रोजी सतरंजीपुरा, नागपूर येथे राहत्या घरी झालेला आहे. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता**

---

**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६१९८५

क.ली./प्रत्तु-२/तह.नाग (शहर)/कावि-५८५/२०२५ दिनांक : २२/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. राहुल हीराचंद्र सेलोकर रा. प्लॉट नं. ५१, श्याम नगर, पारडी, नागपूर यांचा अर्ज दिनांक १२/०९/२०२५

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार राहुल हीराचंद्र सेलोकर रा. प्लॉट नं. ५१, श्याम नगर, पारडी, नागपूर यांनी स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार राहुल हीराचंद्र सेलोकर यांचा जन्म दिनांक ०२/११/१९९३ रोजी राहत्या घरी प्लॉट नं. ५१, श्याम नगर, पारडी, नागपूर येथे झाला. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता**

---

**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६१९८५

क.ली./प्रत्तु-२/तह.नाग (शहर)/कावि-५८३/२०२५ दिनांक : २२/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. सुष्टी महेश येरवार रा. १३२ नाईकनगर, एन.आय.टी. गार्डन हनुमान मंदीर नागपूर यांचा अर्ज दिनांक १२/०९/२०२५

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार सुष्टी महेश येरवार रा. १३२ नाईकनगर, एन.आय.टी. गार्डन हनुमान मंदीर नागपूर यांनी स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार सुष्टी महेश येरवार यांचा जन्म दिनांक ०५/०३/२००३ रोजी राहत्या घरी नाईकनगर, एन.आय.टी. गार्डन, नागपूर येथे झाला. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता**

---

**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६१९८५

क.ली./प्रत्तु-२/तह.नाग (शहर)/कावि-५८४/२०२५ दिनांक : २२/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. धनश्री मुकेश मोरे रा. प्लॉट नं. २७, गैरी नगर, भरतवाडा, नागपूर यांचा अर्ज दिनांक १२/०९/२०२५

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार धनश्री मुकेश मोरे रा. प्लॉट नं. २७, गैरी नगर, भरतवाडा, नागपूर यांनी मुलीच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार नाविण्या मुकेश मोरे यांचा जन्म दिनांक ०२/१०/२००८ रोजी डागा हॉस्पीटल, नागपूर येथे झाला. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता**

---

**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६१९८५

क.ली./प्रत्तु-२/तह.नाग (शहर)/कावि-५८१/२०२५ दिनांक : २२/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. यश नितीन तवले रा. दुबे नगर, हुडकेश्वर रोड, नागपूर यांचा अर्ज दिनांक १२/०९/२०२५

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार यश नितीन तवले रा. दुबे नगर, हुडकेश्वर रोड, नागपूर यांनी स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यश नितीन तवले रा. दुबे यांचा जन्म दिनांक १९/१०/२००७ रोजी दुबे नगर, हुडकेश्वर रोड, नागपूर येथे झाला. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता**

---

**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६१९८५

क.स.म.अ./तह.नाग/(शहर)/कावि-७४०८/२०२५ दिनांक : २४/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. प्रकाश कस्तुरचंद सोनी, रा. १०५, प्रभाकुंज, ओसवाल भवन, भाजीमंडी, इतवारी, नागपूर यांचा अर्ज प्राप्त दि. ०५/०८/२०२५

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार प्रकाश कस्तुरचंद सोनी, रा. १०५, प्रभाकुंज, ओसवाल भवन, भाजीमंडी, इतवारी, नागपूर यांनी त्यांच्या आईच्या मृत्यूची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू सोनी निर्मलाबेन कस्तुरभाई पदमी यांचा मृत्यु दिनांक ०६/०३/२००८ रोजी त्यांच्या राहते घरी इतवारी, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्युचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित मृत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता**

RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकःश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३



# भक्तिमार्ग

## नवरात्रोत्सवाची प्रेरणा

**आसुरांचा संहार करण्यासाठी सज्ज झालेल्या महाकालीचं सामर्थ्य वाढवण्यासाठी सर्व देवतांनी आपापल्या तेजाचे अंश तिला अर्पण केले, असा उल्लेख दुर्गासप्तशतीमध्ये आहे. या पार्श्वभूमीवर शांती, अहिंसा आणि विश्वबंधुत्वाचं ब्रीद मिरवताना दुष्टांनी लादलेलं युद्ध अपरिहार्यपणे, देशाच्या किंवा तुमच्या-आमच्या दाराशी ठाकलं आहे. अशा स्थितीत शुंभ-निशुंभांना, महिषासुरांना संपवायची ऊर्जा या नवरात्रोत्सवातून मिळावी, हीच अपेक्षा.**

समाजाची निर्मिती झाली तेव्हापासूनच चांगल्या आणि वाईट प्रवृत्ती नांदताना पहायला मिळतात. त्यात वेळोवेळी दुष्ट प्रवृत्ती वरचढ होत असल्याचंही पहायला मिळतं. या प्रवृत्तींचा वेळीच नाश करणं गरजेचं असतं. अर्थात, चांगल्या-वाईट प्रवृत्तीतील या संघर्षात अंतिमत: सत्याचाच विजय होत असतो परंतु त्यासाठी युध्द अटळ ठरतं. त्यात असुरी शक्तींचा प्रभाव वाढतो तेव्हा त्यांचा नाश करणं सामान्यांच्या आवाक्यात राहत नाही. अशा वेळी ईश्वरालाच अवतार घ्यावा लागतो. वेळो-वेळी घेतलेल्या अशा अनेक अवतारांच्या कथा आपल्याकडे प्रचलित आहेत. सध्याच्या काळातही समाजात असुरी शक्ती अधूनमधून डोकं वर काढत असताना पहायला मिळत आहेत. त्यांच्यापासून समाजाचं संरक्षण करणं आणि अशा शक्तींचा वेळीच नायनाट करणं ही काळाची गरज आहे. त्यासाठीची प्रेरणा, शक्ती मिळण्याच्या दृष्टीनेही नवरात्रोत्सवाचं मोठं महत्त्व आहे.

खरं तर शक्तीमुळेच संपूर्ण ब्रम्हांडाची उत्पत्ती झाली. या आदिशक्तीची आराधना करण्यासाठी नऊ दिवसांचा काळ अर्थात नवरात्राचा उत्सव महत्त्वपूर्ण ठरतो. नवरात्रात ब्रम्हांडातील सर्व शक्ती जागृत होतात. याच शक्तीने नऊ दिवस अविरत युद्ध करून दैत्यांचा संहार केला. या नऊ दिवसांच्या युद्धकाळाच्या स्मृतिरुप समारंभालाच आपण “नवरात्र” म्हणतो. वाढत्या सामर्थ्याबरोबर येणारा अहंकार आणि वाढत्या अहंकारातून येणारा उन्मतपणा हे आसुरी वृत्तीचं मूळ आहे. रावण काय, दुर्योधन काय आणि शुंभ-निशुंभ काय, वृत्तीच्या दृष्टीने पाहिलं तर सर्वांची जातकुळी एकच! मग दशग्रंथी, परमशिवभक्त, संगीत, तपस्वी रावण परदारापहरणाला सज्ज होतो. एकछत्री साम्राज्य लाभलेला दुर्योधन सख्ख्या चुलत भावांना पाच गावांची जहागिरीही नाकारतो, श्रीकृष्णासारख्या विश्वसख्याचा शांतिप्रस्ताव धुडकावून लावतो. वेळोवेळी उफाळून येणाऱ्या अशा असुरी वृत्तींचं दमन करण्यासाठी दैवी शक्ती पुढे सरसावणे ही मानवी इतिहासातली एक अपरिहार्य प्रक्रिया आहे. अशा घटनांची स्मृती नरकचतुर्दशी, त्रिपुरी पौर्णिमा आणि नवरात्र यासारख्या उत्सवांनी जतन करुन ठेवलेली आपण पाहतो. गतकालीन घटनांची आठवण म्हणून काही सण-व्रते-उत्सव समाजात रुढ होतात तेव्हा त्यातील खरं मर्म पुष्कळदा डोळ्याआड होतं आणि उत्सवी रुप किंवा कर्मकांड टिकून राहतं. “नवरात्र” उत्सवाचंही तसंच झालं आहे. धार्मिकदृष्ट्या कुळाचार म्हणून घरोघरी आश्विन शुद्ध प्रतिपदेला घटस्थापना होते. मातीच्या सपाट ढिगावर गहू पेरुन त्यावर मातीचा घट आणि त्याच्यावर ताम्हनात देवीची प्रतिमा स्थापन करायची, नऊ दिवस रोज सर्व उपचारांनी पूजा करायची, वरच्या बाजूला रोज नवी पुष्पमाला बांधायची, आरती करायची हा पूजेचा भाग झाला. याशिवाय कुमारीपूजन, ब्राह्मण सुवासिनी भोजन असे लौकिक उपक्रम, उपवास, अखंडदीप यासारखे नेमधर्म आणि सप्तशतीपाठासारखे उपक्रम अशा स्वरुपात सामान्यत: घरोघरचं नवरात्र पार पडतं. देवीच्या मंदिरांमध्येही नवरात्रोत्सव मोठ्या श्रध्देने आणि भक्तीभावाने साजरा केला जातो. अनेक मंडळही नवरात्रोत्सव साजरा करतात. त्यासाठी मंडपात देवीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते. त्या ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई केली जाते. रोज देवीची विधिवत पूजा, विविध धार्मिक कार्यक्रम, जागर याद्वारे हा उत्सव साजरा केला जातो. सामाजिकदृष्ट्या नवरात्राचं स्वरुप उत्सवाचं आहे. विविध प्रांतात तिथल्या पारंपरिक पद्धतीने हा उत्सव साजरा होतो.

नवरात्रोत्सव विशेष

या उत्सवाचा कालावधी सामान्यत: सगळीकडे सारखाच, म्हणजे आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंतचा असतो. काही भागात त्याची सुरूवात लवकर म्हणजे भाद्रपद वद्य नवमीपासूनही होते. बंगालमध्ये दुर्गापूजेला फार महत्त्व आहे. नेपाळ, आसाममध्ये आणि एकंदरीत उत्तर भारतामध्ये नवरात्रोत्सव हा दुर्गोत्सव म्हणूनच उत्साहाने साजरा होतो. यात क्वचित पशुबली हा प्रकारही आढळतो. सुदैवाने अशा अमानुष प्रथा आता लोप पावत चालल्या आहेत. आपल्याकडे पशुवधाऐवजी कोहळा कापण्याची प्रथा ही समाजधुरिणांच्या डोळस



चातुर्याची साक्ष देणारी आहे. गणेशोत्सवाप्रमाणेच दुर्गोत्सवानेही आता अनेक ठिकाणी सार्वजनिक रुप धारण केलं आहे. त्यानिमित्त काही कार्यक्रम योजले जातात. पण सर्व उत्सवांचं “जल्लोषा”कडे झुकणे ही थोडी चिंतेची बाब आहे हे नाकारता येणार नाही. स्थानिक नेतृत्व सुजाण आणि सुबुद्ध होण्यावर कितीतरी चांगल्या गोष्टी अवलंबून असतात आणि विधायक नेतृत्व नेहमी कठीण गोष्ट असते. कुठल्याही चांगल्या गोष्टीसाठी माणसं एकत्र येणे ही प्राथमिक गरज आहे. माणसं जमण्यासाठी काही तरी आकर्षण असावं लागतं. पण ते गुणात्मक असावं. कुठेही काही कार्यक्रम असला की, त्याच्या मागे-पुढे तासन्तास कर्कश्श ध्वनिमुद्रिका लावून ठेवणे ही काही गुणात्मकता नव्हे. माणसांच्या अभिरुचीला वळण लावणे हे खरं तर अशा उपक्रमांचं कार्य असतं. त्याच्याऐवजी अशांतता, ध्वनिप्रदूषण यांचीच निर्मिती त्यातून होऊ लागली तर कठीण परिस्थिती निर्माण होईल. म्हणून सद्भावना जोपासणारे, विचाराला चालना देणारे, अभ्यास करायला लावणारे, परिश्रमावर आधारलेली स्पर्धा असलेले उपक्रम या उत्सवात योजले जायला हवेत. जबर वर्गण्या वसूल करुन अमाप उधळपट्टी करणे हा अशा उत्सवांचा स्थायीभाव होऊ पाहतो आहे. हे बरं नव्हे ! त्या ऐवजी अशा उत्सवांच्या निमित्ताने सामूहिक पठण-वाचन, पाठांतर चातुर्य, चापल्य, कलाविष्कार यावर आधारित स्पर्धा असे अनेक उपक्रम योजता येण्यासारखे आहेत.

युगमान बदलतं तसं युद्धाचं स्वरुपही बदलतं. पण “परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम्” हा परमेश्वरी अवतारकार्याचा गाभा कायम राहतो. सत् विरुद्ध “दुष्कृत” लोक पाकिस्तानसारख्या शत्रुराष्ट्राच्या रुपाने सीमेवर उभे असतील, अतिरेकी दहशतवाद्यांच्या रुपाने घुसखोरी आणि अत्याचार करत असतील, टोळीयुद्धात सामाजिक जीवनात अशांतता माजवत असतील तर त्यांच्या पातळीवर त्यांचं पारिपत्य करण्यासाठी सत्प्रवृत्ती समर्थ आणि संघटित होण्याची गरज आहे. राष्ट्र म्हणून शत्रूंशी आणि समाज म्हणून समाजकंटकांशी लढत देणे अपरिहार्य आहे. “चांगलं” काय या विषयीच्या कल्पना बालपणापासून मनावर ठसायला हव्यात. “वाईटा” विषयीची चीड मनात रुजायला हवी. देवादिकांच्या वीरपुरुषांच्या पराक्रमगाथा त्यासाठी आहेत. असुरांचा संहार करण्यासाठी सज्ज झालेल्या महाकालीचं सामर्थ्य वाढवण्यासाठी सर्व देवतांनी आपापल्या तेजाचे अंश तिला अर्पण केले असा उल्लेख दुर्गासप्तशतीमध्ये आहे. समाजाच्या सर्व घटकांनी आपापली शक्ती-बुद्धी वाईट गोष्टींचं निर्दालन करण्यासाठी सुजाण नेतृत्वाला अर्पण करणे अपेक्षित आहे. बेफिकीरपणे किंवा चिंताक्रांत होऊन, सुरु असलेले अनर्थ पहात बसणे मुळीच क्षम्य नाही. शांती, अहिंसेचे आणि विश्वबंधुत्वाचं ब्रीद मिरवत असतानासुद्धा दुष्टांनी लादलेलं युद्ध अपरिहार्यपणे, देशाच्या काय किंवा तुमच्या-आमच्या काय, दाराशी ठाकलेलंच आहे. अशा परिस्थितीत शुंभ-निशुंभांना आणि महिषासुरांना संपवायची ऊर्जा या नवरात्रोत्सवातून मिळावी, हीच अपेक्षा.

## नवरात्रींचा उपवास करताना...

नवरात्रींमध्ये अनेकजण उपवास करतात. उपवासामुळे शरीराची शुद्धी होते तसंच आत्मिक समाधानही मिळतं. उपवास करताना काही नियमांचं पालन केलं तर या काळात शारीरिक व्याधी किंवा पीडांचा सामना करावा लागणार नाही. नवरात्रींमध्ये उपवास करताना कशाची काळजी घ्यावी याविषयी...

❋ उपवास म्हणजे दिवसभर उपाशी राहणं नव्हे. दिवसभर स्वत:ला उपाशी ठेवण्यापेक्षा थोड्या थोड्या वेळाने थोडं खावं. दिवसभरात फळं किंवा उपवासाचे आरोग्यदायी पदार्थ खाता येतील. अर्थात एका वेळी खाल्ल्या जाणाऱ्या पदार्थांचं प्रमाण कमी ठेवा. सूर्यास्तानंतर भरपूर खाऊ नका. एका वेळी थोडंच खा.

❋ या काळात अनेकजण निर्जळी उपवास करतात पण निर्जळी



उपवास नसेल तर दिवसभरात भरपूर पाणी प्या. नारळपाणी, फळांचे रस, लिंबू पाणी हे पर्यायही आहेत.

❋ उपवासाच्या काळात तळलेले पदार्थ टाळा. तळलेले पदार्थ उपाशीपोटी खाऊ नका. यामुळे ॲसिडिटी होण्याची शक्यता असते.

उपवास

❋ उपवासाला फक्त बटाटाच खायला हवा असं नाही. उपवासाला चालणारे इतर पदार्थही तुम्ही खाऊ शकता. दुधी, रताळं, सुरण, पनीर यांच्यापासून चविष्ट पदार्थ बनवता येतील. साबुदाण्याचा पर्यायही आहे.

❋ कुट्टूच्या पीठापासून बनवलेल्या पुऱ्या, पोळ्या तुम्ही खाऊ शकता. या पिठापासून भजीही करता येतील.

❋ दिवसभर काम करून घरी आल्यावर वऱ्याचे तांदूळ खाता येतील. वऱ्याचे तांदूळ आणि दाण्याची आमटी हा पर्यायही आहे. याचा पुलावही बनवता येईल.

❋ मधल्या वेळच्या खाण्यासाठी तुम्ही मखाण्याचा पर्याय निवडू शकता. मखाण्यांमध्ये अनेक पोषक घटक असतात.

❋ या काळात गोड पदार्थांचा मोह टाळा. साखरेऐवजी गूळ किंवा मधाचा पर्याय निवडा.

योग्य पद्धतीने उपवास केला तर शरीर आणि मन दोन्ही निरोगी राहू शकेल.

## देवी दुर्गेविषयी...

शारदीय नवरात्रींचा हा काळ म्हणजे आनंद आणि उत्साहाचा माहोल. या दिवसात आदिशक्तीचा जागर केला जातो. अनेक घरांमध्ये घट बसवले जातात. देवीमातेची आराधना केली जाते. देशभरात आदिशक्तीच्या पूजनाचा प्रचंड उत्साह असतो. नवरात्रींच्या या पावन पर्वाच्या निमित्ताने देवी दुर्गेबद्दल जाणून घेऊया.

❋ दुर्गा ही आदिपराशक्ती मानली जाते. महिषासुराच्या मर्दनानंतर देवी पार्वतीने दुर्गा हे नाव धारण केलं, असा उल्लेख स्कंद पुराणात आढळतो.

❋ देवी दुर्गेला आठ ते दहा हात असतात. म्हणूनच देवीला दशभुजा किंवा अष्टभुजा असं म्हटलं जातं. देवीच्या अष्टभुजा म्हणजे आठ दिशांचं प्रतिक मानलं जातं. याचाच अर्थ देवी दुर्गा आठही दिशांनी आपल्या भक्तांचं संरक्षण करते.

❋ देवी दुर्गेला शक्तीस्वरूप मानलं जातं. पण या ब्रह्मांडाच्या रक्षणासाठी तिला पुरूष देवतांची मदतही महत्त्वाची वाटते.

❋ सिंह हे देवी दुर्गेचं वाहन मानलं जातं. हा सिंह म्हणजे अमर्याद शक्तीचं प्रतिक



आहे. सिंहावर बसलेली दुर्गा याच अमर्याद शक्तीचं प्रतिनिधित्त्व करते. एवढंच नाही, तर ती आपल्या भक्तांचं रक्षण आणि दुर्जनांचा नाश करण्यासाठी या शक्तीचा वापर करते.

❋ देवीच्या हातात त्रिशूळ असतं. हे त्रिशूळ म्हणजे सत्त्व, रज आणि तम या गुणांचं प्रतिक मानलं जातं. मानवी आयुष्यातल्या या तीन गुणांचा समतोल साधला गेला की आनंद आणि समाधान लाभतं.

❋ दुर्गा ही शिवाची अर्धांगी आहे. शक्तीशिवाय शिव अपूर्ण मानला जातो. शक्ती या ब्रह्मांडाची माता आहे तर शिव हा पिता आहे.

❋ देवी दुर्गेला त्र्यंबके असंही म्हटलं जातं. देवीला तीन डोळे असल्याचं मानलं जातं. हे तीन डोळे म्हणजे अग्नी, सूर्य आणि चंद्र यांचं प्रतिक मानलं जातं.

सण-उत्सव

❋ दुर्गादेवीच्या हातात तलवार, बाण, चक्र, गदा अशी विविध आयुधं असतात. शत्रुला मात देण्यासाठी एकाच अस्त्राचा वापर केला जात नाही हे यातून प्रतित केलं जातं. परिस्थितीनुसार शत्रुवर वेगवेगळ्या अस्त्रांनी प्रहार करायला हवा, हे दुर्गेच्या रूपातून सुचवण्यात आलं आहे.

❋ हिंदू धर्मात देवीची विविध रूपं आहेत. ही सगळी रूपं आदिशक्तीचं प्रतिक आहेत. त्यामुळे कोणत्याही रूपाची आराधना केली तरी आपली भक्ती आदिशक्तीपर्यंत पोहोचते.

## श्रवणभक्ती निरूपण

दासबोधातल्या चौथ्या दशकात समर्थांनी नवविधाभक्तीचं वर्णन केलं आहे. पहिल्या समासात ते श्रवणभक्ती निरूपण करतात. समर्थ म्हणतात, नवविधा भजन बोलिलें। तेचिं पुढे प्रांजळ केले। श्रोती अवधान दिधले। पाहिजे आता॥६॥



प्रथम भजन ऐसे जाण। हरिकथा पुराणश्रवण। नाना अध्यात्म निरूपण ऐकत जावे॥७॥

कर्ममार्ग उपासना मार्ग। ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग। योगमार्ग, वैराग्यमार्ग ऐकत जावे॥८॥

नवविधा भजनांचे प्रकार शास्त्रांमध्ये सांगितले आहेत. तेच प्रांजळपणे सांगत आहे. श्रोत्यांनी ते लक्ष देऊन ऐकायला हवं. नवविधा भजनांपैकी प्रथम भजन काय आहे ते जाणून घ्या. हरीकथा ऐकाव्यात, पुराणश्रवण करावं तसंच ना ना प्रकारे अध्यात्म निरूपण केलं जातं. तेही ऐकून घ्यावं. कर्ममार्ग, उपासनामार्ग, ज्ञानमार्ग, सिद्धांतमार्ग, योगमार्ग, वैराग्यमार्ग यापैकी प्रत्येकाचं श्रवण करायला हवं.

दासबोधातून...

नाना व्रतांचे महिमे, नाना तीर्थांचे महिमे। नाना दानांचे महिमे ऐकत जावे॥९॥

नाना माहात्मे नाना स्थाने। नाना मंत्र नाना साधने। नाना तपें पुरश्चरणे। ऐकत जावी।

दुधाहारी निराहारी। फळाहारी पर्णाहारी। तृणाहारी नानाहारी। कैसे ते ऐकावे।

नाना व्रतांचे, नाना तीर्थांचे, नाना दानांचे महात्म्य ऐकत जावे. नाना महात्म्ये, नाना स्थाने, नाना मंत्र, नाना साधने, नाना तपे, पुरश्चरणे याबाबतचे वर्णन ऐकत जावे. दुग्धाहारी, निराहारी, फलाहारी, पर्णाहारी, तृणाहारी असे विविध आहार घेणारे लोक आपल्या आसपास असतात. त्यांच्याबाबतही ऐकत जावे. श्रवणातून केल्या जाणाऱ्या या भक्तीचे वर्णन निश्चितच फलदायी आहे.

## उपदेश चिमणीचा...

आपल्या आसपास घडणारी छोटी घटना किंवा एखादा छोटा प्रसंग, फारशी महत्त्वाची न वाटणारी व्यक्ती ज्ञानामृत पाजून जाते पण मिळालेला उपदेश किंवा ज्ञान अंगिकारलं तरच त्याचे लाभ होतात. एका चिमणीने राजाला आयुष्याचं सार सांगितलं. चिमणीने केलेला उपदेश राजाने अंगिकारला नाही. यामुळे त्याचं नुकसान झालं.राजाच्या महालाच्या आवारात सुंदर अशी बाग होती. या बागेत द्राक्ष्यांचा भला मोठा वेल होता. या वेलीवरची गोड, सुमधूर द्राक्षं चिमणी खात असे तर आंबट, कच्ची द्राक्षं खाली पाडून टाकत असे. यामुळे राजा खूप वैतागला होता. अनेक प्रयत्न करूनही चिमणी हाती लागली नाही. यामुळे राजाला खूप राग आला. चिमणीला पकडण्यासाठी तो स्वत: बागेत लपून बसला. द्राक्ष खायला आलेल्या चिमणीला राजाने पडकलं. तो तिला मारणार इतक्यात ती म्हणली की, राजा मला मारू नको. मी तुला ज्ञानाच्या चार गोष्टी सांगणार आहे. राजा म्हणाला, लवकर सांग. चिमणी सांगू लागली, राजा, हाती आलेल्या शत्रुला कधीही मोकळं सोडू नको, अशक्य गोष्टींवर विश्वास ठेऊ नकोस. तिसरी गोष्ट म्हणजे भूतकाळात घडलेल्या घटनांबाबत पश्चाताप करू नकोस. आता चौथी गोष्टही लवकर सांगून टाक, असं राजा तिला म्हणाला. यावर ती म्हणाली की, तू माझा गळा आवळला आहेस. मला श्वास घ्यायला त्रास होत आहे. थोडं मोकळं सोड. मग सांगते. राजाने आपला हात ढिला केला. चिमणीने संधी साधली. उडून ती एका फांदीवर बसली आणि म्हणाली, माझ्या पोटात दोन हिरे आहेत. हे ऐकल्यावर चिमणीला सोडल्याबद्दल राजाला पश्चाताप झाला. चिमणी पुढे म्हणाली, हे राजा, उपदेश ऐकल्याने किंवा वाचल्याने त्याचा लाभ मिळत नाही तर तो अंगिकारावा लागतो. मी तुझी शत्रू, तरी तू मला सोडलं. माझ्या पोटात हिरे असल्याची अशक्य गोष्ट मी तुला सांगितली. तू त्यावर विश्वास ठेवला आणि भूतकाळात झालेल्या चुकीचा तुला पश्चाताप झाला. त्यामुळे उपदेश ऐकून सोडून देण्यापेक्षा त्याचा अंगिकार केला तर आयुष्यात अनेक लाभ होतात.



भक्ती बोध

## दर्शन हिंगलाज देवीचं...

पाकव्याप्त काश्मीरमधल्या बलुचिस्तान प्रांतात हिंदूंची अनेक मंदिरं आहेत. या मंदिरांपैकी एक मंदिर हिंगलाज देवीचं आहे. हिंगलाज देवी आदिशक्तीच्या ५१ शक्तीपीठांपैकी एक मानली जाते. त्यामुळे या स्थानाला खूप महत्त्व आहे. हिंदूधर्मीयांसाठी हे अत्यंत पवित्र स्थान आहे. सोबतच इस्लामधर्मीयही या स्थानाला मानतात. हे ठिकाण कराचीपासून ६० किलोमीटर अंतरावर आहे. “नानी का मंदिर” म्हणून हे स्थान ओळखलं जातं. मुस्लीमधर्मीय या स्थानाला “नानी का हज” असं म्हणतात. हिंदूसोबतच मुस्लीमही मंदिरात दर्शनासाठी येतात. श्रद्धा आणि भक्तीभावाने नतमस्तक होतात.



हिंगलाज देवीचं दर्शन केल्याने पूर्वजन्मीची सगळी पापं नष्ट होतात असं मानलं जातं. या मातेचं दर्शन केल्यानंतर गेल्या जन्मातल्या पापांची शिक्षा या जन्मात भोगावी लागत नाही. त्यामुळेही भाविक मोठ्या संख्येने या स्थानी येतात. रामानेही या स्थानाचं दर्शन घेतलं होतं, असं म्हटलं जातं. रावणाचा वध केल्यानंतर रामाला ब्रह्महत्येचं पातक लागलं होतं. या पापांपासून मुक्त होण्यासाठी रामाने या ठिकाणी यज्ञ केला होता. वैष्णोदेवीप्रमाणे हिंगलाज माताही एका गुहेत विराजमान आहे. हिंगलाजमध्ये सतीमातेचं डोकं पडलं होतं. त्याच स्थानी हे मंदिर बांधण्यात आलं आहे. नवरात्रात या ठिकाणी विशेष उत्सवाचं आयोजन केलं जातं. भारत आणि पाकिस्तानमधले भाविक इथे दर्शनासाठी एकत्र येतात. नऊ दिवस हा उत्सव साजरा केला जातो.

तीर्थक्षेत्र

## मंत्र देवीचे...

मंत्रांचं महत्त्व आपण जाणतो. हिंदू धर्मातल्या विविध मंत्रांमध्ये प्रचंड शक्ती असते. या मंत्रांचं योग्य पद्धतीने उच्चारण होणं गरजेचं आहे. मंत्रजागरणामुळे वातावरणात सकारात्मक लहरी निर्माण होतात. या लहरींमुळे भक्तांना मानसिक शांतता आणि समाधान लाभतं. देवीच्या लाभदायी मंत्रांविषयी...

❋ देवी मंत्रांना सिद्धी मंत्र असंही म्हटलं जातं. भक्ती आणि श्रद्धेने देवी मंत्रांचं पठण केल्यास सकारात्मक परिणाम होतात. या मंत्रांमुळे समस्यांचं निराकरण होतं. नवरात्रात देवीच्या विविध रूपांची आराधना होते. देवीच्या प्रत्येक रूपाचा ठराविक मंत्र आहे.

मंत्रजागर

❋ देवी दुर्गेची कृपा प्राप्त करायची असेल तर दूम या मंत्राचा उच्चार करायला हवा. या मंत्राच्या उच्चारामुळे भाविकांच्या सगळ्या इच्छा पूर्ण होतात.

❋ देवी महालक्ष्मीला प्रसन्न करून घेण्यासाठी श्रीम या मंत्राचा जप करता येईल.

❋ ज्ञान प्राप्त करण्यासाठी तसंच परीक्षेमध्ये यश मिळवण्यासाठी देवी सरस्वतीची आराधना करायला हवी. यासाठी एम किंवा अयेम या मंत्राचा जप करायला हवा.

❋ कालीमातेची कृपा प्राप्त करायची असेल तर क्रिम हा मंत्र जपायला हवा.

❋ देवी बगलामुखीची कृपा प्राप्त करायची असेल तर ल्हिम किंवा ऱ्हिम या मंत्राचा जागर करायला हवा.

❋ देवी धूमवतीच्या कृपेसाठी धूम या शब्दाचं उच्चारण करायला हवं.

❋ भुवनेश्वरी मातेची कृपा प्राप्त




करण्यासाठी ऱ्हिम या मंत्राचा जप करायला हवा.

❋ तारादेवीची कृपा प्राप्त करण्यासाठी त्रिम या मंत्राचा उच्चार करायला हवा.

❋ “या देवी सर्वभूतेषु शक्ती रूपेण संस्थिता नमस्तस्यै, नमस्तस्यै, नमस्तस्यै नमो नम:” हा देवीचा मुख्य मंत्र आहे. या मंत्राच्या जपाने भक्तांच्या सगळ्या इच्छा पूर्ण होतात. आपल्या इच्छेप्रमाणे मंत्राचा जप करता येईल. म्हणजे धनप्राप्तीची इच्छा असेल तर या देवी सर्वभूतेषु लक्ष्मी रूपेण संस्थिता असं म्हणता येईल.

❋ यापैकी कोणत्याही मंत्राचा जाप १०८ वेळा करता येईल. आंघोळ केल्यानंतर आणि काहीही खाण्याआधी तुम्ही मंत्राचा जाप करू शकता.

❋ मंत्र म्हणताना पूर्व दिशेला तोंड करून बसणं योग्य ठरतं. १०८ वेळा जाप केल्यास तो सिद्ध मंत्र मानला जातो. मंत्र म्हणताना दिवा लावता येईल. देवीला फुलं अर्पण करून मंत्रपठणाला सुरुवात करता येईल.

## आणीबाणीमध्ये स्वयंसेवकाकडून
# कारागृहात प्रार्थना

■ महासागर प्रतिनिधी

काँग्रेस राजवटीत पंतप्रधानपदी इंदिरा गांधी असतांना लागलेल्या आणीबाणीवर (इमरजेंसी) सत्ताधारी भाजपकडून एकही टिका करण्याची संधी सोडली जात नाही. त्यातच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी आणीबाणीमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकाद्वारे कारागृहातील प्रार्थनेबाबत एक किस्सा सांगितला.



संघ प्रार्थना ध्वनिचित्रफीत लोकार्पण सोहळा शनिवारी नागपुरातील डॉ. हेडगेवार स्मृती भवन, रेशीमबाग येथे संपन्न झाला. त्यानिमित्त झालेल्या कार्यक्रमात मोहन भागवत पुढे म्हणाले, संघाची प्रार्थना हा संघाचा सामूहिक संकल्प आहे. स्वयंसेवक रोज त्याची आठवण करतात. व्यक्तिगत संकल्प स्वयंसेवकाच्या व्यक्तिगत प्रतिज्ञात तर आम्ही सर्व मिळून काय करायचे ठरवले ते संघाच्या प्रार्थनेत आहे. प्रार्थनेमध्ये नमस्ते सदा वत्सले मातृभूमी आणि शेवट भारत माता की जय.. आहे. त्यात पहिला नमस्कार भारत मातेला आणि नंतर ईश्वराला नमस्कार आहे.

प्रार्थनेत भारत मातेला काहीही मागितले नाही. फक्त तिच्या करता जे द्यायचं त्याचा उच्चार आहे. जे मागायचे ते परमेश्वराला मागितले आहे. १९३९ पासून आज पर्यंत स्वयंसेवक रोज शाखेवर प्रार्थना म्हणतात. इतक्या वर्षाच्या या साधनेतून या प्रार्थनेला मंत्राचा सामर्थ्य लाभले आहे. प्रार्थनेमुळे स्वयंसेवक पक्का कसा होतो ते रोज प्रार्थना करणाऱ्या स्वयंसेवकाला माहित आहे. त्यामुळे ही प्रार्थना करण्याची धडपड स्वयंसेवकात दिसते.

आणीबाणीमध्ये पुष्कळ लोकांचा पोलिसांनी पकडले. त्यात काही संघ शाखेतील नियमित तर काही अनियमितही होते. नियमित असलेल्यापैकी एक पॅरोलवर बाहेर आला होता. मी तिथे संघ प्रचारक असल्याने त्याला जाऊन भेटलो. त्यांना काळजीच काही कारण नव्हते. त्यांनी मला सांगितले हल्ली रोज शाखेत जायला मिळत नव्हते. परंतु कारागृहात रोज प्रार्थना करायला मिळते. ही प्रार्थना लोकांपर्यंत पोहचावी म्हणून आजचा उपक्रम असल्याचेही मोहन भागवत यांनी सांगितले.

प्रार्थनेचा पहिला रूप हा भाव आहे. नंतर शब्द ठरले, त्यातून अर्थ निघाला आणि मग त्या अथार्तून पुन्हा भाव स्पष्ट झाला. सुरुवातीला मराठी आणि हिंदी प्रार्थना होत्या. पण अखिल भारतात चालणारी भाषा संस्कृत असल्याने प्रार्थनेची संस्कृत रचना करण्याचा विचार झाला. त्या वेळी चर्चा झाली की आपण मराठी- हिंदी प्रार्थना कोणत्या भावाने करतो.

तो भाव शब्दबद्ध करण्याची आवश्यकता होती. यासाठी भिडे मास्तरांकडे निरोप गेला. भिडे मास्तर हे संघाचे स्वयंसेवक आणि संस्कृत पंडित होते. त्यांनी त्या भावाला शब्दबद्ध केले आणि त्यामुळे प्रार्थना संस्कृतमध्ये रचली गेल्याचेही भागवत म्हणाले. पश्चिम बंगालचे उदाहरन सांगत त्यांनी प्रार्थना ही मने जोडणारी असल्याचे सांगितले.

# काँग्रेसचे आमदार ठाकरे मंत्री गडकरी यांच्या भेटीला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

काँग्रेसचे पश्चिम नागपूरचे आमदार व नागपूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष विकास ठाकरे यांनी आज केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली.



आमदार विकास ठाकरे यांनी नितीन गडकरी यांची भेट घेऊन उत्तराखंडमधील राष्ट्रीय महामार्गांच्या दुरवस्थेबाबत सविस्तर चर्चा केली. काँग्रेस पक्षाच्या संघटन सृजन अभियान अंतर्गत अखिल भारतीय काँग्रेस समितीने (एआयसीसी) त्यांची उत्तराखंडसाठी निरीक्षक म्हणून नियुक्ती केली होती.

या दौऱ्यात त्यांनी कोटद्वार, लैंसडाऊन आणि यमकेश्वर या विधानसभा मतदारसंघांमध्ये बैठकांना आणि नागरिक संवाद कार्यक्रमांना उपस्थिती लावली.

या संवादांतून स्थानिक जनतेने राष्ट्रीय महामार्गांच्या अत्यंत खराब स्थितीबाबत आणि दोन प्रमुख रस्त्यांच्या रखडलेल्या कामांबाबत नाराजी व्यक्त केली. लालढांग - चिल्लरखाल मार्ग व रामनगर - कांडी मार्ग या दोन्ही रस्त्यांचे काम अनेक वर्षांपासून अपूर्ण असून, त्यामुळे स्थानिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे, असे ठाकरे यांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर, आमदार ठाकरे यांनी थेट नितीन गडकरी यांची भेट घेऊन या समस्येवर चर्चा केली आणि निवेदन सादर केले. त्यांनी दोन्ही रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी करत, या प्रकल्पांवर आवश्यक ती कार्यवाही तात्काळ सुरू करावी, अशी विनंती केली.

केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री गडकरी यांनीही निवेदन गांभीर्याने घेतले असून संबंधित विभागांकडून माहिती घेऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले असल्याची माहिती ठाकरे यांनी दिली.

या भेटीत विकास ठाकरे यांनी सामान्य जनतेच्या समस्या थेट केंद्र सरकारपुढे मांडण्याची भूमिका घेतली असून, यामुळे उत्तराखंडमधील रस्ते प्रश्नांवर तोडगा निघण्याची आशा व्यक्त केली जात आहे. काँग्रेसने आपल्या संघटन सृजन अभियानांतर्गत जनतेच्या मुद्द्यांवर सक्रियपणे काम करत असल्याचे या भेटीतून अधोरेखित झाले आहे.

## संघाच्या शताब्दी वर्षाचे काँग्रेस नेत्यांना निमंत्रण

### राऊत, ठाकरेंनी निमंत्रण स्वीकारले : विचारांचा दाखला देत उपस्थितीस नकार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्ष साजरे करीत आहे. शंभरावे वर्षे सर्वांच्या स्मरणात राहावे यासाठी यंदाचा विजयादशमी सोहळाही तेवढाच संस्मरणीय व्हावा यासाठी प्रयत्न केले जात आहे. प्रमुख पाहुणे म्हणून माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्यात सर्वांनी सहभागी व्हावे म्हणून, काँग्रेसचे आमदार विकास ठाकरे, उत्तर नागपूरचे आमदार व माजी मंत्री नितीन राऊत, ज्येष्ठ काँग्रेस नेते विलास मुत्तेमवार, सतीश चतुर्वेदी यांनाही संघाच्यावतीने त्यांच्या घरी जाऊन निमंत्रण देण्यात आले. नितीन राऊत यांनी संघाचे निमंत्रण स्वीकारले. मात्र भिन्न विचारधारेमुळे उपस्थित राहता येणार नाही असे सांगून त्यांनी नम्रपणे आपला नकार कळविला.

स्थापनादिनानिमित्त दरवर्षी संघाच्यावतीने रेशीमबाग मैदानावर विजयादशमी सोहळा साजरा केला जातो. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांना प्रमुख अतिथी म्हणून बोलावले जाते.

यंदाचा शताब्दी सोहळा असल्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रमुख पदाधिका?यांवर शहरातील प्रतिष्ठित नागरिकांना निमंत्रण देण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. शहर काँग्रेसचे अध्यक्ष आणि आमदार विकास ठाकरे यांच्या घरी जाऊन निमंत्रण देण्यात आले. ठाकरे यांना अनेक वर्षांपासून निमंत्रण दिले जात आहे. त्यांच्यासोबत नितीन राऊत यांनाही संघाचे प्रमुख अधिकाऱ्यांनी सोहळ्याला उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले.

राऊत यांनी त्यांचे निमंत्रण स्वीकारले. सोहळ्याला शुभेच्छा दिल्या. मात्र काँग्रेसची विचारधारा वेगळी असल्याने या सोहळ्याला उपस्थित राहाता येणार नाही असे सांगून त्यांनी नम्रपणे आपला नकार कळवला.

# मोठ्या पुलाचे भिजत घोंगडे

■ महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. २७ :

तालुक्यातील तारसा येथे सांड नदीच्या पुलावरून पावसाचे पाणी वाहत असल्याने नागरिकांना आपला जीव धोक्यात टाकून जीर्ण झालेल्या या लहान पुलावरून मार्गक्रमण करावो लागते. शासनाने नवीन पुलाच्या बांधकामासाठी कोट्यवधी रूपये खर्च केले. परंतु काम अजूनही अपूर्णास्थेत आहे. नागरिकांनी किती दिवस त्रास सहन करावा? असा प्रश्न विचारला जात आहे.

तारसा हे गावं रामटेक. कन्हान. नागपूरला जोडल्या गेले आहे. येथून वाहणारी सांड नदी ही वैनगंगा नदीला जाऊन मिळाली आहे. तारसा हे गाव मोठे असल्याने रोज हजारो नागरिक ये जा करतात. हा पूल जीर्ण झाला असला तरी पर्यायी व्यवस्था नसल्याने जड वाहने याच जीर्ण पुलावरून जातात. मात्र, पुलाची दुरवस्था पाहता अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

कन्हान ते अरोली मार्गाचे सिमेंटीकरणाचे काम सुरू असून, तत्पूर्वी नवीन पूल बनवणे आवश्यक होते. परंतु पुलाचे काम पूर्ण झाल्याचे दिसत असले तरी स्लॅब पडणे बाकी आहे. हा मार्ग अत्यंत वर्दळीचा असून अनेक गावे जोडली गेली आहेत. थोडा जरी पाऊस आला की ह्या लहान पुलावरून पाणी वाहते. त्यामुळे, शाळेत जाणारे विद्यार्थी, शेतकरी. मजूर, शिक्षक, व्यापारी यांना बराच त्रास होतो. नवीन पुलाचे काम तात्काळ पूर्ण करून जुन्या पुलावरून जड वाहतूक बंद करावी येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना दिलाला द्यावा, अशी मागणी करीत नागरिकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.



पुलावर पाणी असल्याने शाळेतील मुलांना सुद्धा दर दोन दिवसाआड शाळेला सुट्टी मारावी लागते. शेतकरी सुद्धा शेतात जाताना जीव मुठीत धरून जातात. या पुलामुळे गावाचा संपर्क तुटून जातो, दळणवळण व्यवस्था ठप्प पडते. यामुळे तारसावासी आंदोलन करणार आहोत. पुलाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराला ग्रामपंचायतने अनेक पत्र दिले, पण त्याची दखल घेण्यात आली नाही.

**जनार्धन येळणे**
**ग्रामपंचायत सदस्य तारसा.**

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पंजाबच्या धर्तीवर मदत करा



■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २७ :

विदर्भातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांवर एका मागून एक संकट येत आहे. पिकाला हमीभाव मिळत नाही, अशात आता येलो मोझॅक या रोगामुळे हातात आलेलं पीक देखील उद्धवस्त झाले आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पंजाबच्या धर्तीवर सरकारने मदत करावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी केली.

कळंब तालुक्यातील बेलोना गावातील शेतात वडेट्टीवार यांनी पाहणी केली. येलो मोझॅकमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून काढणीचा खर्चही परवडणारा नाही, अस वडेट्टीवार म्हणाले. एकीकडे अतिवृष्टी, दुसरीकडे रोगाचा प्रादुर्भाव सरकार शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करत आहे. पंजाबच्या धर्तीवर शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ५० हजार रुपये तात्काळ मदत देणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

शेतकरी उद्धवस्त झाला असताना शासन त्यांच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याची टीका त्यांनी केली. वडेट्टीवार यांनी कृषिमंत्र्यांना पत्र लिहून शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी केली आहे. या पाहणी दौऱ्यात माजी आमदार वजाहत मिर्झा, अनिल गायकवाड, अरविंद वाढोणकर, कौस्तुभ शिर्के, आशिष महले, सरपंच सुखदेव चावरे उपस्थित होते.




एकापाठोपाठ एक धक्के देणाऱ्या अमेरिकेच्या अध्यक्षांनी एच१बी व्हिसाचे शुल्क प्रचंड वाढवल्यामुळे निर्माण झालेली स्थिती काहींना संकटासमान भासत आहे. मात्र दीर्घकालीन दृष्टीने पाहता त्यातून सकारात्मक परिणामांची मालिका दिसून येते. वस्तुत: यामुळे भारताला स्थानिक स्तरावर अधिक कौशल्यविकास आणि रोजगारनिर्मिती करण्याची संधी मिळेल. हे आणि यासारखे लाभ उठवण्याची हीच वेळ आहे. याविषयी...

# संकट नाही, ही तो संधी!

दखल

डॉ. दीपक शिकारपूर

नुकतेच अमेरिकेने एच–१बी व्हिसा धोरणात मोठा बदल करून त्यावरील शुल्क प्रचंड वाढवले. भारतात या निर्णयाचा परिणाम त्वरित जाणवू लागला, कारण अमेरिकेत माहिती–तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर सेवा आणि इतर उच्च कौशल्याधारित क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या भारतीयांचा वाटा मोठा आहे. ताज्या शुल्कवाढीमुळे कंपन्यांच्या खर्चात भर पडणार असून त्यांच्या परदेशी कार्यपद्धतीवर परिणाम होणार यात शंका नाही. सुरुवातीला या बदलामुळे उद्योगक्षेत्रात चता पसरली, परंतु नंतर धोरणातील सविस्तर बाबी स्पष्ट झाल्यानंतर थोडासा दिलासा मिळाला. अर्थात असे असले तरी अमेरिकेने उचललेले हे पाऊल भारतासाठी कितपत योग्य आहे, याविषयी चर्चा होणे गरजेचे आहे. या निर्णयामुळे भारतासमोर काही अडचणी तात्काळ उभ्या राहतील, हे सर्वप्रथम मान्य करावे लागेल. परंतु दीर्घकालीन दृष्टीने पाहता त्यातून सकारात्मक परिणामांची मालिका दिसून येते. सर्वप्रथम, भारताला स्थानिक स्तरावर अधिक कौशल्यविकास आणि रोजगारनिर्मिती करण्याची संधी मिळेल. कंपन्यांना कुशल कर्मचाऱ्यांकडून वाजवी दरामध्ये सेवा उपलब्ध झाल्यास तसेच त्यांना प्रशिक्षण देण्यात परदेशात पाठवण्याचा खर्च वाचल्यास उच्च दर्जाच्या सेवा, संशोधन आणि उत्पादन विकासावर भर देता येईल. अर्थातच हे साधण्यासाठी सर्वप्रथम त्यांना आपल्याकडे त्यांचा कौशल्यविकास, तंत्रस्नेह वाढवणारे वातावरण निर्माण करावे लागेल. पण एकदा यात पाऊल पुढे टाकले तर आपल्या देशातच गुणवत्तापूर्ण रोजगार तयार होतील.

पुढचा मुद्दा 'ब्रेन ड्रेन' कमी होऊन 'ब्रेन गेन'ची संकल्पना बळकट करण्याचा आहे. अमेरिकेच्या ताज्या निर्णयामुळे परदेशात दीर्घकाळ राहणारे भारतीय युवक भारतात परतण्याची शक्यता वाढेल वा नव्याने अमेरिकेत जाण्याचे नियोजन करणारे तो विचार मागे टाकतील असे गृहीत धरल्यास अशांचे कौशल्य, अनुभव आणि नेटवर्किंगचा फायदा देशातील उद्योगांना मिळेल. त्यामुळे भारताचे जागतिक स्तरावरचे बळ वृद्धिगत होण्यास मदत होईल. या बदलामुळे भारतातील स्टार्ट अप इकोसिस्टीमला नवा वेग मिळण्याची शक्यताही नाकारता येत नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, क्लाउड कॉम्प्युटग, क्वांटम टेक्नॉलॉजी अशा नव्या क्षेत्रांमध्ये गुंतवणूक वाढेल. जागतिक दर्जाच्या उपाययोजना विकसित करण्याची क्षमता भारतातील तरुणांमध्ये आधीच आहे. त्यामुळे ही परिस्थिती त्यांना अधिक प्रोत्साहन देईल, असे वाटते. खेरीज एच–१बी संदर्भातील ताज्या निर्णयामुळे कंपन्यांना अमेरिकेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहण्याऐवजी इतर बाजारपेठांचा शोध घ्यावा लागेल. युरोप, आशिया–पॅसिफिक, आफ्रिका अशा प्रदेशांमध्ये भारतीय कंपन्या नव्या संधी शोधू लागल्यास जागतिक व्यवसाय विस्तार अधिक सुदृढ होईल. हे भारताच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी आणि वैविध्यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरेल. सरकारी पातळीवरदेखील या परिस्थितीतून शिकण्यासारखे बरेच काही आहे. शिक्षण आणि प्रशिक्षण व्यवस्थेत अधिक गुंतवणूक करून कौशल्याधारित अभ्यासक्रम, संशोधन संस्था आणि नवोन्मेषी प्रयोगशाळा उभारणे आता आवश्यक ठरणार आहे. हे उपाय भारतातील युवकांना जागतिक स्पर्धेसाठी अधिक सज्ज करतील.

अमेरिकेने एच–१ बी व्हिसाची फी एक लाख डॉलर्स (सुमारे ८८ लाख रुपये) केल्याचा भारतीय आयटी उद्योगावर आणि कर्मचाऱ्यांवर मोठा आणि दीर्घकालीन परिणाम कसा होईल हे विस्ताराने जाणून घेताना हे विशेषत्वाने लक्षात घ्यावे लागेल की, अमेरिकेतच जाऊन नोकरी करणे आणि तिथेच राहणे असे



स्वप्न पाहणाऱ्यांना वा या ध्येयानिशी जगणाऱ्यांना आता पुनर्विचार करावा लागेल. कारण याआधी एच–१बी अंतर्गत दर वर्षी परदेशी सल्लागार ६० हजार डॉलर (५२ लाख रुपये) किमान पगारावर अमेरिकेत येत होते, तेव्हा स्थानिक कर्मचाऱ्यांचा सरासरी पगार १ लाख डॉलर (८८ लाख रुपये) होता. मात्र आता परिस्थिती बदलली आहे. महत्त्वाचे म्हणजे या निर्णयाचे परिणाम अमेरिकेवरदेखील होणार आहेत. अनेक स्थलांतरित (भारतीय, इस्रायली, दक्षिण आशियातील) अमेरिकेतील प्रमुख उद्योगांसाठीच काम करत असत आणि त्यांच्या प्रतिभेचा चांगला फायदा होत असे. आता दीर्घकालीन दृष्टीने अशा उद्योगांना तोटा सहन करावा लागू शकतो. त्यामुळे त्यांची इनोव्हेशनवरील पकड सैल होईल आणि यामुळे अमेरिकेच्या संरक्षणवादाला प्रोत्साहन मिळेल. एच–१बी व्हिसा हा अमेरिकेतील कंपन्यांना विशेषीकृत कामांसाठी परदेशी कामगारांना तात्पुरत्या स्वरूपात कामावर ठेवण्याची परवानगी देणारा एक महत्त्वाचा व्हिसा आहे. भारतीय आयटी कंपन्यांसाठी विशेषतः टीसीएस, इन्फोसिस, विप्रो यांसारख्या कंपन्यांसाठी हा व्हिसा अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण या कंपन्या मोठ्या प्रमाणात भारतीय कर्मचाऱ्यांना अमेरिकेतील प्रोजेक्ट्सवर पाठवतात.

गेल्या काही वर्षांपासून ७० टक्क्यांपेक्षा जास्त एच–१बी व्हिसा भारतीयांना मिळाले आहेत. स्वाभाविकच या बदललेल्या धोरणामुळे आयटी कंपन्यांवर आर्थिक ताण वाढणार हे स्पष्ट आहे. यामुळे आधी उल्लेख केल्याप्रमाणे कंपन्या अमेरिकेत नवीन कर्मचारी पाठवण्याचे प्रमाण कमी करतील कवा अमेरिकेतील प्रोजेक्ट्ससाठी स्थानिक कर्मचाऱ्यांनाच प्राधान्य देतील. व्हिसा फी वाढल्यामुळे भारतीय आयटी कंपन्यांना अमेरिकेत नवीन प्रोजेक्ट्स मिळवणे कवा जुने प्रोजेक्ट्स कायम ठेवणे कठीण होईल. यामुळे अमेरिकेत काम करण्याची संधी शोधणाऱ्या भारतीय आयटी कर्मचाऱ्यांच्या रोजगारावर थेट परिणाम होईल. अमेरिकेतील संधी कमी झाल्यास भारतीय आयटी कर्मचारी कॅनडा, यूके, जर्मनी, जपान यासारख्या इतर देशांकडे स्थलांतर करू शकतात. व्हिसा धोरणे अधिक सोपी केली असल्यामुळे या देशांमध्ये संधी अधिक आहेत. भारतीय त्याचा लाभ घेऊ शकतील. आज अनेक भारतीय आयटी कंपन्यांचा व्यवसाय अमेरिकेवर अवलंबून आहे. मात्र बदलत्या परिस्थितीमध्ये आता त्यांना व्यवसाय मॉडेलमध्ये बदल करावा लागेल. त्यांना अमेरिकेत 'ऑफशोर' डिलिव्हरी सेंटर वाढवावी लागतील कवा स्थानिक कर्मचाऱ्यांची भरती करावी लागेल. अर्थात कुठलेही संकट नवीन संधी निर्माण करत असते. म्हणूनच भारतातील युवा पिढीने आणि उद्योगाने याकडे समस्या म्हणून न बघता संधी म्हणून पाहिले पाहिजे.

पूर्वेकडील देश (जपान, कोरिया, तैवान) आत्तापर्यंत आपण दुर्लक्षित करत होतो. तिथे संधी असूनही फायदा घेत नव्हतो. पण आता हे धोरण बदलावे लागेल. मुख्य म्हणजे आज आपला देशही प्रगत होत आहे. इथे शिक्षण आणि करिअर अजिबात अनाकर्षक नाही. आपण आपल्या देशात शिकून इथेच उत्कृष्ट करिअर करू शकतो. अनेक जागतिक उद्योग भारतात जीसीसी (ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स) निर्माण करत आहेत. फक्त महाराष्ट्रातच अशी ७०० हून अधिक केंद्रे विकसित झाली आहेत. यामध्ये आणखी एक मोठा घटक आहे तो वेळेच्या फरकाचा. भारत आणि इतर अनेक देशांमधील वेळेच्या फरकामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या कामकाजाचे चक्र चोवीस तास चालू ठेवू शकतात. उदाहरणार्थ, अमेरिकेतील कार्यालयाचे काम संपल्यावर भारतातील टीम ते काम पुढे नेऊ शकते आणि दुसऱ्या दिवशी सकाळी अमेरिकेतील टीमला काम तयार मिळते. यामुळे कामाची गती वाढते आणि वेळेची बचत होते. ग्राहक सेवा, आयटी सपोर्ट यासारख्या कार्यांसाठी हे विशेष महत्त्वाचे आहे, कारण, तिथे सतत उपलब्धता आवश्यक असते. वेळेच्या फरकामुळे कंपन्या वेगवेगळ्या टाइम झोनमधील कर्मचाऱ्यांच्या कौशल्यांचा आणि वेळेचा पुरेपूर वापर करू शकतात. एका ठिकाणच्या टीमचे काम संपल्यावर ते दुसऱ्या ठिकाणच्या टीमला सोपवले जाऊ शकते. यामुळे प्रकल्पांवर सतत काम सुरू राहून लवकर पूर्ण होते. हा लाभही लक्षात घ्यायला हवा.

जीसीसीमध्ये करिअर करण्याचे अनेक फायदे आहेत. इथे जागतिक स्तरावर काम करण्याची संधी मिळत असल्यामुळे विविध संस्कृती आणि कार्यशैलींची माहिती मिळते. नवीनतम तंत्रज्ञान आणि पद्धतींवर काम करण्याची संधी मिळाल्याने कौशल्यांचा विकास होतो. सामान्यतः जीसीसी चांगले वेतन आणि इतर आकर्षक फायदे देतात. विविध भूमिका आणि जबाबदाऱ्यांमध्ये काम करण्याची संधी मिळाल्याने करिअरमध्ये प्रगतीची शक्यता वाढते. जगभरातील सहकाऱ्यांशी आणि उद्योगातील लोकांशी संपर्क येत असल्यामुळे व्यावसायिक संबंध वाढतात. थोडक्यात, ही भारतात राहून जागतिक करिअर घडवण्याची एक उत्कृष्ट संधी आहे. तुम्ही योग्य कौशल्ये (उदा परदेशी भाषा, संवाद इत्यादी कौशल्य) विकसित केल्यास आणि योग्य नेटवर्किंग केल्यास देशाबरोबरच विदेशात काम करण्याचे दारही उघडू शकते. बहुतेक जीसीसीमध्ये ग्लोबल टीम्ससोबत संवाद आणि समन्वय असतो. त्यामुळे वेगवेगळ्या देशांमधील कामाच्या पद्धती, संस्कृती आणि लीडरशिप स्टाईल समजतात. हे आंतरराष्ट्रीय करिअरसाठी अत्यंत उपयुक्त आहे. तेव्हा अमेरिकेचा नाद सोडून अन्य देशांकडे आणि मुख्यत: देशामधील संधींचा शोध घ्यावा हे उत्तम.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत)

नेपाळमध्ये सरकारच्या विरोधात युवाशक्तीने उठाव केला, हिंसाचार झाला, युवकांच्या प्रक्षोभापुढे प्रशासन हतबल झाले आणि सरकारला राजीनामा द्यावा लागला. नेपाळअगोदर श्रीलंका आणि बांगलादेशमध्येही युवाशक्तीच्या आक्रोशापुढे सत्तांतर झाले. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या मते देशातील युवक, विद्यार्थी, जनरेशन झी संविधानाचे रक्षण करेल. यातून त्यांना नेमके काय अभिप्रेत आहे? भारतात असे बंड घडू शकते का?

# परिस्थितीची जाग की आंदोलनाची हाक?



दृष्टीक्षेप

डॉ. सुकृत खांडेकर, ज्येष्ठ पत्रकार

आपल्या देशात कोणता मुद्दा कधी मूळ धरेल आणि पाहता पाहता चर्चेचा, आंदोलनांचा विषय बनेल किंवा बनवला जाईल, हे सांगता येत नाही. मात्र असे विषय देशभरात गाजत आणि मतमतांतरे समोर आणत राहतात. बरेचदा ही चर्चा अनावश्यक असते तर बरेचदा ती काळाच्या कसोटीवर खरी उतरण्याची गरज असते. अशीच एक चर्चा अलिकडे देशभरात ऐकायला मिळाली. ज्या वेगाने हा विषय समोर आला, त्याच वेगाने तो शमलाही. मात्र त्याचा विचार करण्याची गरज जाणवली. नेपाळमधे सरकारच्या विरोधात जनरेशन झेड (युवाशक्ती)ने उठाव केला, हिंसाचार झाला, युवकांच्या प्रक्षोभापुढे प्रशासन हतबल झाले, सरकारला राजीनामा देऊन पळ काढावा लागला. नेपाळच्या अगोदर श्रीलंका आणि बांगलादेशमध्येही युवाशक्तीच्या आक्रोशापुढे सत्तांतर झाले. या पार्श्वभूमीवर भारतात असे काही घडू शकते का, असा मुद्दा अनेक धुरिणांच्या चर्चेत आला. हे घडत असतानाच काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलेल्या एका ट्वीटमळे अनेकांचा डोळे विस्फारले. राहुल गांधी म्हणतात, देशातील युवक, विद्यार्थी, 'जनरेशन झी' संविधानाचे रक्षण करेल. लोकशाही वाचवतील आणि मतांची चोरीही रोखतील. मी त्यांच्याबरोबर आहे. काहीसे अनावश्यक आणि अस्वस्थता निर्माण करणारे हे ट्विट पुढे आल्यानंतर राजकीय आणि अन्य व्यासपिठांवर याबाबत प्रश्न विचारले गेले.

नेपाळमध्ये युवकांनी रस्त्यावर येऊन केलेल्या आंदोलनाचा उल्लेख राहुल गांधी यांनी केला नसला तरी त्यांचे ट्वीट वाचताना नेपाळमधील युवकांचा संघर्ष डोळ्यापुढे आला. राहुल गांधी यांनी असे ट्वीट करून युवकांच्या मनात असंतोष खदखदतो आहे, असा इशारा सरकारला दिला आहे का, असा प्रश्न पडला. गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमध्ये व्होटचोरी कशी झाली, याचे पुरावे देत राहुल गांधींनी गेले काही दिवस निवडणूक आयोगाची व सरकारची झोप उडवली. व्होट चोरीला निवडणूक आयोग संरक्षण देत आहे असा त्यांनी जाहीर आरोप केला. देशातील युवकांची ताकद आपल्या पाठिशी आहे असे काँग्रेस पक्ष सांगत आहे तर देशात काँग्रेसला नेपाळप्रमाणे आंदोलन घडवायचे असल्याचा आरोप भाजपा करत आहे. त्यातच सॅम पित्रोदा यांनी पाकिस्तानात आपल्याला घरासारखे वाटते असे म्हणत भाजपाला आयते कोलित दिले.

या महिन्याच्या प्रारंभी नेपाळमध्ये हजारो युवकांनी रस्त्यावर येऊन सरकारविरोधात संघर्ष केला. हिंसाचार, जाळपोळ केली. सरकारी इमारती, राष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्र्यांची निवासस्थाने पेटवली, न्यायालयाच्या इमारतीला आग लावली, मंत्र्याना पळता भुई थोडी केली, पाठलाग करून मंत्र्यांना लाथा घातल्या, हे सर्व आश्चर्यकारक होते. पोलीस गोळीबारात पंचावन्न तरूणांचा बळी गेला. नेपाळ सरकारने फेसबुक, एक्स, युट्युब, इंस्टाग्राम आदी सोशल मिडियावर बंदी घातल्याचे निमित्त होऊन युवकांची माथी भडकली आणि ते रस्त्यावर उतरले. सोशल मिडिया केवळ टाइमपासचे माध्यम नाही, तर शिक्षण, रोजगार व जागतिक घडामोडींची वेगवान माहिती मिळवण्याचे साधन आहे असा दावा केला जात आहे. आजकाल तर रिल्स हे कमाईचे साधन बनले आहे. देश–विदेशात लक्षावधी लोक व्हिडिओ कॉलवरून संवाद साधत असतात. सोशल मिडिया हे परस्परांशी संवादाचे प्रभावी साधन आहे. या व्यासपिठावरुन जगभरात किती अब्ज रुपयांचा ऑनलाइन बिझनेस होत असेल हे सांगणेही कठीण आहे. मग नेपाळ सरकारने युवाशक्तीच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम का केले? नेपाळमधील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतातील युवक संविधानाचे रक्षण करतील आणि मतांची चोरी रोखतील असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे म्हणूनच त्यांना भारतात नेपाळप्रमाणे आंदोलन होऊ शकते असे सुचवायचे आहे का, असा प्रश्न पडला.

राहुल गांधी यांनी बिहारमध्ये व्होट अधिकार यात्रा काढली, राजदचे नेते आणि लालूप्रसाद यादव यांचे पुत्र तेजस्वी यादव यांनीही राहुल यांना तेथे साथ दिली. कर्नाटक आणि महाराष्ट्रात एकेका मतदारसंघात सहा– सहा हजाराहून अधिक मतांची कशी चोरी झाली त्याची आकडेवारी त्यांनी दिली. बिहार यात्रेत दिलेली घोषणा 'व्होट चोर– गद्दी छोड' ही देशात घरोघरी पोचली. या घोषणेनंतर भाजपाचे केंद्रातील व राज्याराज्यातील प्रवक्ते, नेते व मुख्यमंत्री राहुल खोटे बोलतात म्हणून एक सुरात तुटून पडले. राहुल गांधींनी आपल्या पत्रकार परिषदांमधे केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तांवर मतचोरांचे संरक्षक असल्याचा आरोप केला. आपल्याकडे मतचोरीचे भरपूर पुरावे आहेत असे सांगत त्यांनी दिल्लीमध्ये सादरीकरण केले. राहुल गांधी आता शांत बसायला तयार नाहीत. आपला देश आणि संविधान हे महत्वाचे आहे, असे ते वारंवार सांगत आहेत. 'भारत जोडो' यात्रेत युवकांनी न्यायासाठी झटले पाहिजे अशी भाषा राहुल गांधी वापरत होते. आता पुन्हा ते युवाशक्तीला आवाहन करताना दिसत आहेत. भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी एक्सवर म्हटले आहे की, जनरेशन झेड घराणेशाहीच्या विरोधात आहे. पं. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी आता राहुल आणि प्रियांका या घराणेशाहीला 'जनरेशन झेड' कशी मान्यता देईल? जेन झी भ्रष्टाचाराच्या विरोधात आहे. युपीए सरकारमधील घोटाळे कसे विसरता येतील ? राहुल यांचे विदेश दौरे व सॅम पित्रोदा यांना मिळणारा विदेशी पैसा याची या पार्श्वभूमीवर चौकशी व्हायला हवी.

नेपाळमधील युवा क्रांती सरकारमधील घराणेशाहीविरोधात होती. काँग्रेसची भारतात ओळखच घराणेशाही आणि घोटाळे अशी आहे, असे भाजपा खासदार प्रदीप भांडारी यांनी म्हटले आहे. माजी खासदार सुब्रत पाठक यांनी तर कहरच केला आहे. ते म्हणतात, भारतात नेपाळसारखी क्रांती झाली तर लोक राहुल–अखिलेश यांच्या घरांना आग लावतील. ठाकरे यांच्या शिवसेनेने राहुल गांधींच्या वक्तव्याला साथ दिली. भारतातही असे घडू शकते, भाजपाने तयार राहावे, असे ते म्हणाले. या सर्व चर्चांवर संयुक्त जनता दलाचे निरजकुमार म्हणाले, की भारत म्हणजे बांगलादेश नाही आणि नेपाळही नाही. भारताचे संविधान मजबूत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटले की, निवडणूक आयोगाला बदनाम करणे ही काँग्रेसची जुनी चाल आहे. दरम्यान, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सॅम पित्रोदा यांनी आपण पाकिस्तानात गेलो की घरासारखे वाटते; बांगलादेश आणि नेपाळमध्येही असेच वाटते. त्यांनी असे म्हटल्यानंतर राहुल गांधींवर तुटून पडणारी भाजपाची फळी पित्रोदांकडे वळाली. त्यांना देशद्रोही ठरवण्यापर्यंत मजल गेली. शहजाद पुनावाला यांनी एक्सवर म्हटले की, २६ /११ च्या दहशतवादी हल्ल्यावर काँग्रेस मूग गिळून गप्प का बसली आणि पुलवामा घटनेच्या वेळी पाकिस्तानला काँग्रेसने साथ का दिली हे आत्ता उअमगते आहे. राहुल गांधी वारंवार सांगत आहेत की, संविधान धोक्यात आहे. पण हे सांगताना ते केवळ मतांच्या चोरीविषयी बोलत आहेत की रस्त्यावर युवाशक्ती उतरेल असा इशारा देत आहेत?

सोशल मिडियावर राहुल यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रियांचा वर्षाव होताना दिसला. राहुल गांधी 'एक्स'वर 'व्होट चोरी फॅक्टरी' असा उल्लेख करत असतानाच मुंबईत रात्री दोन वाजता नवा अॅप्पल फोन खरेदी करण्यासाठी तरूणाईची झुंबड बघायला मिळाली. काँग्रेसच्या काळात घरगुती गॅस सिलेंडरसाठी रांगा दिसायच्या, आता अॅप्पल फोनसाठी रांगा लागत आहेत. या पार्श्वभूमीवर बिहारमधील निवडणुकीच्या निकालानंतर जनरेशन झेड राहुल गांधीबरोबर आहे की अन्य कोणाबरोबर, समजेल अशी आजची परिस्थिती आहे. आग आणि हिंसाचाराच्या माध्यमातून नव्हे तर मतदानातून सत्तांतर घडवण्याची ताकद देशातील युवकांमधे आहे. भारत हा बांगलादेश, श्रीलंका किंवा नेपाळपेक्षा वेगळा आहे. त्या दृष्टीने पाहिले जावे, हीच कोणत्याही भारतीयाची अपेक्षा असणार आहे.

# महागाई आटोक्यात, पण दिलासा हवा

**अलीकडेच किरकोळ महागाईचे आकडे जाहीर झाले. जुलैच्या तुलनेत ऑगस्टमध्ये किरकोळ महागाई पुन्हा एकदा दोन टक्क्यांच्या पुढे गेली. तथापि, याबद्दल काळजी करण्याची गरज नाही. तज्ज्ञांचा विश्वास आहे की चालू आर्थिक वर्षात 'कोअर इन्फ्लेशन' ३.२ टक्के असू शकते. ते मागील अंदाजांपेक्षा कमी आहे. दुसरीकडे, रिझर्व्ह बँक चालू आर्थिक वर्षात ईएमआयकपातीच्या स्वरूपात हा फायदा सामान्य जनतेला देऊ शकते.**

परामर्श

हेमंत देसाई

ज्येष्ठ पत्रकार

गेल्या अनेक महिन्यांपासून महागाईचे आकडे कमी होत असताना, अन्नधान्याच्या किमती वाढल्यामुळे ऑगस्टमध्ये एकूण महागाईचे आकडे वाढले आहेत. असे असूनही काळजी करण्याची गरज नाही, असे म्हणायला जागा आहे. 'क्रिसिल' या संशोधन आणि रेटिंग फर्मने म्हटले आहे, की २०२५-२६ या आर्थिक वर्षात 'कोअर इन्फ्लेशन' ३.२ टक्के राहण्याचा अंदाज आहे. तो त्यांच्या पूर्वीच्या ३.५ टक्के अंदाजापेक्षा कमी आहे. 'क्रिसिल'ने त्यांच्या ताज्या अहवालात म्हटले आहे, की चालू आर्थिक वर्षात ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) मध्ये १.४ टक्के घट दर्शवते. त्यामुळे आर्थिक सुलभतेसाठी सकारात्मक वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. अहवालात म्हटले आहे, की रिझर्व्ह बँक या वर्षी व्याजदरात २.५ टक्के कपात करू शकते. 'क्रिसिल'च्या मते जागतिक स्तरावरील अडचणी वाढत असताना कमी महागाई आणि कमी व्याजदरांमुळे अर्थव्यवस्थेत देशांतर्गत मागणी वाढेल. अहवालात असेही म्हटले आहे, की खरीप हंगामात अतिवृष्टी ही एक जोखीम आहे. त्यामुळे पंजाबसारख्या प्रमुख बागायती आणि अन्नधान्य उत्पादक प्रदेशांना व्हडथळा येऊ शकतो. अन्न महागाई कमी पातळीपासून वाढू लागली आहे; परंतु तरीही ती मुख्य चलनवाढीपेक्षा कमी आहे.

ऑगस्टमध्ये किरकोळ महागाई मासिक आधारावर २.०७ टक्क्यांवर पोहोचली. ही वाढ प्रामुख्याने भाज्या, मांस आणि माशांच्या वाढत्या किमतींमुळे झाली. मागील महिन्यात जुलैमध्ये ती १.६१ टक्के होती. ग्राहक किंमत निर्देशांका (सीपीआय) मध्ये सलग नऊ महिन्यांच्या घसरणीनंतर महागाईमध्ये ही वाढ झाली आहे. नोव्हेंबर २०२४ पासून ती कमी होत होती. तथापि, वार्षिक आधारावर ग्राहक किंमत निर्देशांका (सीपीआय) वर आधारित महागाई कमी झाली आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये ती ३.६५ टक्के होती. या कालावधीत अन्न महागाई शून्यापेक्षा खाली म्हणजेच ०.६९ टक्क्यांनी घसरली. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) म्हटले आहे, की ऑगस्ट २०२५ मध्ये एकूण महागाई आणि अन्नधान्याच्या महागाईत प्रामुख्याने भाज्या, मांस आणि मासे, अंडी, तेल आणि चरबी, वैयक्तिक काळजी आणि अन्न उत्पादनांच्या किमती वाढल्यामुळे वाढ झाली. सरकारने रिझर्व्ह बँकेला दोन टक्के मार्जिनसह महागाई चार टक्के राखण्याचे आदेश दिले आहेत. ग्रामीण भारतातील महागाई जुलैमधील १.१८ टक्क्यांवरून ऑगस्टमध्ये १.६९ टक्क्यांपर्यंत वाढली. शहरी भागात महागाई २.४७ टक्के होती, जी मासिक आधारावर २.१ टक्के होती. केरळमध्ये सर्वाधिक ९.०४ टक्के महागाई होती तर आसाममध्ये सर्वात कमी म्हणजे उणे ०.६६ टक्के होती.



भारतीय जनतेला अमेरिकेसोबतच्या वाढत्या व्यापारयुद्धाचा झळा बसण्याची शक्यता आहे. अमेरिकेने पन्नास टक्के व्यापार शुल्क लागल्यानंतर वेगवेगळ्या क्षेत्रांमधील भाववाढीचा दर वाढण्याची शक्यता आहे. मात्र दुसरीकडे, केंद्र सरकारने वस्तू व सेवाकरात, म्हणजे जीएसटीत लक्षणीय कपात केल्यामुळे दिलासादेखील मिळू शकतो. असे असले तरी वाढत्या महागाईची चिन्हे ऑगस्ट महिन्यातच दिसू लागली हे समजून घेतले पाहिजे. भाज्या, मांस आणि माशांसह विविध अन्नपदार्थांच्या किमती वाढल्यामुळे ऑगस्ट २०२५ मध्ये किरकोळ महागाई दराने २.०७ टक्क्यांची पातळी गाठली आहे. ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाईचा दर जुलैमध्ये १.६१ टक्क्यांपर्यंत घसरला होता. तर ऑगस्ट २०२४ मध्ये तो ३.६३ टक्के इतका नोंदवला गेला होता. एनएसओ म्हणजेच राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने दिलेल्या आकडेवारीनुसार ऑगस्ट २०२५ मध्ये भाजीपाला, मांस, मासे, अंडी, तेल, वैयक्तिक निगा उत्पादने यांच्या किमतीत वाढ झाली. त्यामुळे अन्नधान्य भाववाढीसह मुख्य महागाई दरात वाढ झाली. ऑगस्टमध्ये भाजीपाल्याच्या किमतीत जवळपास १६ टक्के वाढ झाली. सर्वसामान्य लोकांना रोजच्या जेवणात भाजी लागते. त्यामुळे ही दरवाढ चिंताजनक म्हणावी लागेल. मांस आणि माशांच्या किमती दीड टक्के दराने वाढल्या, तर दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा महागाई दर ऑगस्टमध्ये २.६ टक्के होता. कपडे आणि पादत्राणांच्या महागाईचा दर जुलैमधील अडीच टक्क्यांवरून किंचित घसरला. इंधन आणि ऊर्जा क्षेत्रातील भाववाढही घसरून २.४ टक्क्यांवर पोहोचली. जुलैमध्ये ती २.७ टक्के होती. केंद्र सरकारने रिझर्व्ह बँकेला किरकोळ महागाई दर चार टक्क्यांच्या पातळीवर मर्यादित राखण्याचे निर्देश दिले आहेत. अन्नधान्य महागाईचा दर जुलै २०२५ च्या तुलनेत ऑगस्ट २०२५ मध्ये १०७ आधारबिंदूंनी वाढला आहे. ग्रामीण भागात तर अन्नधान्याची भाववाढ शहरांपेक्षा जास्त असून सरकारला याची दखल घ्यावी लागेल. विशेष म्हणजे कम्युनिस्टांच्या केरळमध्ये ऑगस्टमध्ये सर्वाधिक एकत्रित महागाई ९.०४ टक्के तर कर्नाटकमध्ये ३.८१ टक्के होती. आर्थिक विकास होतो, तेव्हा काही प्रमाणात चलनवाढ होतेच. परंतु कोणत्या वस्तूंची आणि किती प्रमाणात किंमतवाढ होते, हे पाहणे महत्त्वाचे असते. भाववाढीची झळ गोरगरीब वर्गाला कमीत कमी लागावी, असा विचार करावाच लागतो.

बरोबर नऊ वर्षांपूर्वी म्हणजे २०१६ मध्ये चलनवाढीचा दर चार टक्क्यांच्या मर्यादेत रहावा, असे धोरण ठरवण्यात आले. त्याचा टॉलरन्स बँड, म्हणजेच सहनशीलतेची मर्यादा खालच्या पातळीवर दोन टक्के आणि वरच्या पातळीवर सहा टक्के अशी निश्चित करण्यात आली. केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँकेनेच हे धोरण ठरवले. परंतु दर पाच वर्षांनी या धोरणाचा आढावा घ्यायचा, असेही ठरले होते. या धोरणाचा फेरआढावा मार्च २०२४ च्या आत पूर्ण झाला पाहिजे, अशी अपेक्षा होती. जानेवारी २०१४ पासून म्हणजेच केंद्रात नवे सरकार येण्यापूर्वीपासूनच येण्याच्या अगोदर सहा महिने भारतीय रिझर्व्ह बँकेने घाऊक किमतींपेक्षा किरकोळ किंमतवाढीवर लक्ष केंद्रित करण्यास सुरुवात केली. हे धोरण यशस्वी ठरले असून, त्यामुळे किरकोळ पातळीवरची महागाई टप्प्याटप्प्याने कमी झाली आहे. २०१२-१३ मध्ये किरकोळ किंमत निर्देशांकावर आधारित भाववाढ दहा टक्के होती. ती चालू आर्थिक वर्षात ३.१ टक्क्यांवर आली. या संपूर्ण वर्षात चलनफुगवट्याचा सरासरी दर अडीच टक्क्यांवर येईल, अशी आशा आहे. याचे कारण भरपूर पाऊस झाला आहे आणि वस्तू आणि सेवाकराचे दर कमी झाले आहेत.

उच्च गतीने निरंतर आर्थिक विकास साधायचा असेल, तर चलनफुगवटा कमी पातळीवर आणि स्थिर स्वरूपाचा असणे आवश्यक ठरते. वस्तूंच्या किमती झपाट्याने वाढत गेल्यास ग्राहकांची खरेदीशक्ती कमी होत जाते. दुसरीकडे, किमतीत अत्यल्प वाढ होत असल्यास कारखानदारांचा उत्पादनातील रस कमी होतो.

रिझर्व्ह बँकेचे माजी कार्यकारी संचालक जनक राज हे बँकेच्या एमपीसी, म्हणजेच मॉनेटरी पॉलिसी कमिटीचे सदस्यदेखील होते. त्यांच्या मते सध्याचा टॉलरन्स बँड कायम ठेवला पाहिजे. रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर पूनम गुप्ता यांनीही विद्यमान धोरणाचे समर्थनच केले आहे. मात्र एमपीसीचे २०१६ ते २०२० या काळात सदस्य असलेले अर्थतज्ज्ञ रवींद्र ढोलकिया यांच्या मते चलनफुगवट्याची चार टक्क्यांची मर्यादा ही खूप कमी आहे. विकसित भारताच्या दृष्टिकोनातून साडेपाच टक्के चलनफुगवटा ही मर्यादा योग्य राहील. याउलट एमपीसीवर काम केलेल्या काही सदस्यांनी चलनफुगवट्याचे लक्ष्य हे अडीच टक्क्यांपर्यंत खाली आणण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. रिझर्व्ह बँकेने 'हेडलाइन इन्फ्लेशन'वर (इंधनासह सर्व माल आणि वस्तूंच्या किमतीची पातळी) भर द्यावा की फक्त अन्नेतर वस्तूंच्या महागाईवर भर द्यावा, याबद्दलही मतभेद आहेत. मात्र या सगळ्यापलीकडे राजकीय वास्तवाचा विचार करूनच निर्णय घेतले जातात. ८० कोटी जनतेला मोफत अन्नधान्य दिले जात असून 'लाडकी बहीण' धाटणीच्या योजनेला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. याचा अर्थ अजूनही बहुसंख्य जनतेला भाववाढीशी झुंजावे लागत आहे. दैनंदिन गरजा भागवण्यासाठी त्यांच्या खिशात पुरेसे पैसे नाहीत, हे कठोर वास्तव आहे.

# सर्वोच्च न्यायालयाचा तार्किक निर्णय

**गेला काही काळ सातत्याने गाजत असलेल्या वक्फसंदर्भातील सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने महत्वाचा निवाडा दिला. सर्वोच्च न्यायालयाने वक्फ सुधारणा कायद्याला स्थगिती दिली नाही, तर त्यातील काही तरतुदींमध्ये सुधारणा किंवा निलंबन केले आहे. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय पूर्णपणे तार्किक आहे. तो संतुलन साधतो. हा निर्णय या नवीन कायद्याबद्दलच्या चिंता दूर करेल, अशी आशा करायला हरकत नाही.**

नोंद

शिवाजी कराळे

विधिज्ञ

गेला काही काळ सातत्याने गाजत असलेल्या वक्फसंदर्भातील सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने महत्वाचा निवाडा दिला. सर्वोच्च न्यायालयाने वक्फ सुधारणा कायद्याला स्थगिती दिली नाही, तर त्यातील काही तरतुदींमध्ये सुधारणा किंवा निलंबन केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या सुधारणा महत्त्वपूर्ण आणि आवश्यक आहेत. त्या संविधानाच्या भावनेचा आदर करतात. एक महत्त्वाची दुरुस्ती म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने वक्फ मालमत्तेच्या चौकशीच्या तरतुदी अंशतः स्थगित केल्या. केवळ नियुक्त अधिकाऱ्याच्या अहवालाच्या आधारे मालमत्ता वक्फ नसलेली मानली जाऊ शकत नाही. जिल्हा दंडाधिकाऱ्यांना मालमत्ता हक्क निश्चित करण्याचा अधिकार देणे हे संविधानात समाविष्ट असलेल्या अधिकारांच्या पृथक्करणाच्या तत्त्वाच्या विरुद्ध असल्याचे न्यायालयाने मानले. लोकशाहीच्या तीन महत्त्वाच्या अंगांमध्ये कायदेमंडळ, न्यायपालिका आणि कार्यकारी यांच्यात सत्तेचा समतोल राखण्यासाठी ही व्यवस्था करण्यात आली होती. एका दिशेने वाढणारा कल सत्तेचा समतोल बिघडवू शकतो. त्यामुळे सर्व अधिकार एकाच संस्थेला दिले नाहीत. त्यामुळे हुकूमशाही रोखण्यात यश आले आहे. अधिकारांचे केंद्रीकरण होणार नाही, याची दक्षता घटनाकर्त्यांनी घेतली आहे.

वक्फ स्थापन करण्यासाठी किमान पाच वर्षे इस्लाम धर्म स्वीकारण्याची आवश्यकता असलेली तरतूद राज्य सरकारे त्याच्या पडताळणीसाठी नियम तयार करत नाहीत, तोपर्यंत निलंबित राहणार आहे. धर्म ही देशातील वैयक्तिक बाब आहे. नागरिकाने त्यांची धार्मिक ओळख सार्वजनिकरित्या प्रदर्शित करणे बंधनकारक नाही. त्यामुळे एखाद्या धर्माचे पालन किती काळापासून करत आहे हे ठरवणे अत्यंत गुंतागुंतीचे आहे. राज्य सरकारांनी या संदर्भात नियम तयार करताना सर्व पैलूंचा विचार करणे आणि अधिक संवेदनशीलता दाखवणे अपेक्षित आहे. वक्फ सुधारणा कायद्याच्या अनेक पैलूंवर विरोधी पक्षाने जोरदार आक्षेप घेतला. संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये आणि रस्त्यावर बराच गोंधळ झाला. या प्रकरणाचे गांभीर्य आणि परिणाम लक्षात घेता सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा महत्वपूर्ण आहे. याचिकेत संपूर्ण कायदा रद्द करण्याची मागणी करण्यात आली होती; परंतु सर्वोच्च न्यायालयाने ते स्वीकारण्यास नकार दिला. अशी पावले अत्यंत दुर्मिळ प्रकरणांमध्ये उचलली जातात आणि त्यांचा व्यापक परिणाम होतो. या अर्थाने सर्वोच्च न्यायालयाने न्यायिक विवेकाचा वापर केला तसेच कायदेविषयक सीमा ओलांडू नये याची काळजी घेतली. सर्वोच्च न्यायालयाने वक्फ दुरुस्ती कायद्याला स्थगिती देण्यास नकार दिला; परंतु काही प्रमुख मुद्द्यांवर अंतरिम स्थगिती दिली. न्यायालयाने स्पष्ट केले, की संपूर्ण कायद्याला स्थगिती देण्याचा कोणताही आधार नाही. हे लक्षात घेण्यासारखे आहे, की वक्फ मालमत्तेचे योग्य व्यवस्थापन आणि वापर हा दीर्घकाळ वादाचा विषय आहे आणि मुस्लिम समुदायातही वक्फमध्ये सुधारणांच्या मागण्या केल्या जात आहेत.

केंद्र सरकारने आठ एप्रिल २०२५ रोजी वक्फ सुधारणा कायदा लागू करण्याचा निर्णय घेतला आणि २२ मे रोजी या प्रकरणात दाखल केलेल्या पाच याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने आपला निर्णय राखून ठेवला. सरन्यायाधीशांनी म्हटले, की जिल्हाधिकारी हा कार्यकारी शाखेचा भाग आहे आणि त्यांना असे अधिकार देणे हे अधिकारांच्या पृथक्करणाच्या तत्त्वाचे उल्लंघन करेल. शिवाय, वक्फ बोर्डांमध्ये गैरमुस्लिम सदस्यांना नामांकित करण्याची परवानगी देणारी तरतूद रद्द न करता, सर्वोच्च न्यायालयाने काही नियम निश्चित केले आहेत. या नियमांनुसार, केंद्रीय वक्फ बोर्डात गैरमुस्लिम सदस्यांची संख्या चारपेक्षा जास्त तर राज्य वक्फ बोर्डात तीनपेक्षा जास्त असू शकत नाही. संसदेने संमत केलेले कायदे केवळ दुर्मिळ प्रकरणांमध्येच बदलले जाऊ शकतात, असे न्यायालयाला अभिप्रेत आहे. लोकसभा आणि राज्यसभेत सुमारे १४ तासांच्या चर्चेनंतर आणि संयुक्त संसदीय समितीमध्ये सहा महिन्यांच्या चर्चेनंतर सर्वोच्च न्यायालयाच्या छाननीमुळे वक्फ सुधारणा कायदा सर्व बाबतीत निर्दोष सिद्ध होईल अशी आशा आहे. राजकीय हितसंबंधांच्या दृष्टिकोनातून न पाहता व्यापक दृष्टिकोनातून पाहिले तरच असे मुद्दे योग्य दिशेने पुढे नेले जाऊ शकतात.

सर्वोच्च न्यायालयात वक्फ सुधारणा कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्यायमूर्ती ए. जी. मसीह यांच्या खंडपीठाने सुनावणी केली. दुरुस्तीच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर अंतिम निर्णय येईपर्यंत न्यायालयाने ही स्थगिती लागू केली. न्यायालयाने वक्फ सुधारणा कायद्यातील एक तरतूद रद्द केली. त्यात फक्त पाच वर्षांपासून मुस्लिम धर्माचे पालन करणाऱ्या व्यक्तीलाच आपली मालमत्ता वक्फला दान करण्याची परवानगी होती. देणगी देणारी व्यक्ती मुस्लिम धर्माचे पालन करते की नाही हे पडताळण्यासाठी केंद्र सरकार नियम तयार करत नाही, तोपर्यंत न्यायालयाने कलम ३(आर) ला स्थगिती दिली. न्यायालयाने म्हटले, की नियमांशिवाय ही तरतूद सत्तेचा मनमानी वापर करण्यासारखे असेल. वक्फ मालमत्तेने सरकारी मालमत्तेवर अतिक्रमण केले आहे की नाही, हे ठरवण्याचा अधिकार जिल्हा दंडाधिकाऱ्यांना देणारी तरतूदही सर्वोच्च न्यायालयाने रद्द केली. न्यायालयाने म्हटले, की यामुळे अधिकारांचे विभाजन झाले आहे. वादग्रस्त मालमत्तेवर न्यायाधिकरण किंवा न्यायालय निर्णय देत नाही, तोपर्यंत वादग्रस्त मालमत्ता अप्रभावित राहील. न्यायालयाने नोंदणी अनिवार्य करण्याच्या अटीवर बंदी घालण्यास नकार दिला. न्यायालयाने म्हटले, की वक्फ मालमत्तांची नोंदणी १९९५ ते २०१३ दरम्यान झाली होती आणि आता त्यांची पुन्हा नोंदणी केली जात आहे. त्यामुळे ही नवीन कार्यवाही नाही. नोंदणीची अंतिम मुदत सुधारण्याची आवश्यकता असू शकते अशी चिंता न्यायालयाने व्यक्त केली.

न्यायालयाने वक्फ बोर्डात गैर-मुस्लिमांचा समावेश करण्याच्या तरतुदीवरही निर्णय दिला. खंडपीठाने स्पष्ट केले, की केंद्रीय वक्फ बोर्डात चारपेक्षा जास्त गैरमुस्लिम सदस्य असू नयेत; परंतु केंद्रीय वक्फ बोर्डात एकूण २२ सदस्य आहेत. राज्य वक्फ बोर्डात तीनपेक्षा जास्त गैर-मुस्लिम सदस्य असू नयेत, असे न्यायालयाने म्हटले असताना राज्य वक्फ बोर्डात एकूण ११ सदस्य आहेत. न्यायालयाने वक्फ सुधारणा कायद्याच्या कलम २३ लाही स्थगिती दिली नाही. त्यात वक्फ बोर्डांमध्ये पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीची तरतूद आहे. ते सहसा वरिष्ठ सरकारी अधिकारी असतात. न्यायालयाने म्हटले आहे, की शक्यतो हे अधिकारी मुस्लिम असले पाहिजेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, सचिवांची नियुक्ती मुस्लिम समुदायातून करावी. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात वक्फच्या कायदेशीर व्याख्येतून 'वक्फ बाय युजर' ही संकल्पना काढून टाकण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली नाही. 'वापरकर्त्याद्वारे वक्फ' म्हणजे अशा मालमत्ता, जिचा वापर धार्मिक किंवा धर्मादाय कारणांसाठी बराच काळ केला जात आहे आणि म्हणूनच त्यांना वक्फ मालमत्ता मानले जाते. वक्फ सुधारणा कायद्याने 'वक्फ बाय युजर'ची तरतूद काढून टाकली. त्याचा याचिकाकर्त्यांनी तीव्र विरोध केला. पश्चिम बंगालमध्ये अनेक ठिकाणी वक्फ सुधारणा कायद्याविरुद्धच्या निदर्शनांना हिंसक वळण लागले. याचिकाकर्त्यांना याचे समाधान आहे, की न्यायालयाने त्यांनी आव्हान दिलेल्या अनेक तरतुदींना स्थगिती दिली आहे. नागरिकत्व कायदा आणि प्रार्थनास्थळे कायदा यासारख्या असंख्य मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालयात अनेक वर्षांपासून खटले सुरू आहेत. परिणामी, वक्फ प्रकरणाचा निपटारा होण्यासाठी अनेक वर्षे लागू शकतात. तथापि, अंतिम निर्णय येईपर्यंत अंतरिम आदेश वक्फ कायद्यातील बहुतेक तरतुदींची पद्धतशीर अंमलबजावणी करण्यास परवानगी देतो. जलद निराकरण आणि न्यायालयीन शिस्त सुनिश्चित करण्यासाठी सरन्यायाधीशांनी खटल्याची सुनावणी करण्यासाठी पाच सदस्यीय घटनात्मक खंडपीठाची स्थापना करणे हा एक चांगला पर्याय असू शकतो. वक्फचा मुद्दा धार्मिक धर्मांतराशीदेखील संबंधित आहे. सर्वोच्च न्यायालयाने हरियाणा, मध्य प्रदेश, राजस्थान आणि उत्तराखंडच्या कायद्यांना आव्हान देणाऱ्या याचिका उच्च न्यायालयांकडून स्वतःकडे हस्तांतरित करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे जबरदस्तीने आणि प्रेरित धार्मिक धर्मांतरे रोखता येतील.

वक्फ (सुधारणा) कायद्यातील काही वादग्रस्त कलमे सर्वोच्च न्यायालयाने रद्द केली, ही सरकारला मोठी चपराक आहे. सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्यायमूर्ती ए. जी. मसीह यांनी सांगितले, की संसदेने मंजूर केलेल्या कायद्याच्या संवैधानिकतेचा अंदाज नेहमीच त्याच्या बाजूने असतो; परंतु काही तरतुदींना अंतरिम संरक्षण आवश्यक आहे. या निर्णयामुळे मुस्लिम समुदायाच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी दिलासा मिळाला आहे. अन्यथा, या मालमत्तांचे सरकारीकरण करण्याचा परवानाच सरकारला मिळाला असता. मौलाना अर्शद मदनी यांनी 'मुस्लिम मालमत्तेमध्ये सरकारी हस्तक्षेप रोखण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल' असे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे वर्णन केले आहे. हा कठोर कायदा रद्द होईपर्यंत 'जमियत उलेमा-ए-हिंद' आपला कायदेशीर आणि लोकशाही संघर्ष सुरू ठेवेल. हा नवीन वक्फ कायदा भारतीय संविधानावर थेट हल्ला आहे. तो केवळ नागरिकांना आणि अल्पसंख्याकांना समान हक्कांची हमी देत नाही, तर पूर्ण धार्मिक स्वातंत्र्यदेखील प्रदान करतो. हा कायदा मुस्लिमांचे धार्मिक स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा एक धोकादायक, असंवैधानिक कट आहे. वक्फ मालमत्तेवरील मनमानी आणि प्रशासकीय अधिकार रोखण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे. न्यायालयाने मुस्लिम समुदायाच्या धार्मिक स्वातंत्र्याचे रक्षण करणाऱ्या अनेक महत्त्वाच्या तरतुदींना स्थगिती दिली आहे. हा कायदा मुस्लिमांना 'दुय्यम दर्जाचे नागरिक' बनवण्याचा प्रयत्न करत होता. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावरून हे सिद्ध होते, की देशात संविधान सर्वोच्च आहे आणि कोणीही त्याची मुळे हलवू शकत नाही. न्यायालयाने सरकारच्या संविधानविरोधी हेतूंना फटकारले आहे न्यायालयाने म्हटले आहे, की वक्फ बोर्डाचा सीईओ मुस्लिम असावा, राज्य वक्फ बोर्डाचे तीनपेक्षा जास्त सदस्य इतर कोणत्याही धर्माचे असू शकत नाहीत, केंद्रीय वक्फ बोर्डाचे चारपेक्षा जास्त सदस्य इतर कोणत्याही धर्माचे असू शकत नाहीत आणि पाच वर्षांसाठी मालमत्ता मुस्लिम घोषित करावी, ही अटदेखील स्थगित करण्यात आली आहे.



# जगाचा पोशिंदा सदा उपाशी!

राज्यातील वेगवेगळ्या भागात पावसाने शेतकऱ्याची अवस्था काय केली हे संपूर्ण देशाने पाहिले. शेतकऱ्यांबरोबरच सामान्य माणसाचे डोळे देखील पाण्याने डबडबले. सरकार पुढे टाहो फोडून हाती काही मिळत नाही, हे सर्वसामान्य शेतकऱ्याला माहीत झाले आहे. त्यामुळेच त्याची अवस्था हतबल झाल्यासारखीच आहे. सर्व मार्ग बंद झाल्यानंतर त्याच्या हातात फक्त 'फाशीचा दोर'च शिल्लक राहतो आणि त्याचा तो वापर करून पुढील पिढीला वाऱ्यावर सोडून मोकळा होतो. शेतकऱ्याच्या नावावर मालामाल झालेली पिढी सुखाने जगत आहे. पण ज्याच्या जीवावर तो सन्मानाने जगतो, तो मात्र जवळपास मातीत गेल्यासारखाच असतो. म्हणूनच आता असे म्हटले जाते की, शेतकऱ्यांनी शेती सोडली असती तर निश्चितपणे त्यांची लक्षणीय प्रगती झाली असती. मातीचा धंदा 'माती'च देणार, नाहीतर काय 'मोती' थोडेच देणार? असे म्हणण्याची वेळ आता आली आहे. कारण वडा तळला तरी खर्च वजा जाता रुपया हातात पडतो. चहा उकळला, चुना मळला, स्क्रु, पान्हा, पक्कड फिरवली तरी तीच अवस्था आहे. तराजुत माल मोजला की रुपया हातात, स्टेथो लावला की रुपया हातात, पंक्चर काढलं की हाता रुपया हातात, टायरात हवा भरली तरी रुपया हातात, चपलेला टाका घातला पैसा हातात, ईस्तरी केली पैसा हातात, कुणाचीही हजामत केली पैसा हातात, देशी अन् गांवठी विकली तरी रुपया हातात, तीर्थ हातावर टेकवलं रुपया दक्षिणा म्हणून ताटांत, एवढचं नव्हे तर टोल नाक्यावर 'टाळी वाजवली' तरी दहा रुपये हातात, दोन-चार मंत्र उच्चारले पाचशे हातात, दोन तीन तास सरकारी काम केले की अख्खा पगार हातात, भंगार विकले तरी पैसा हातात, शौचालयात संडास केली तरी दोन रुपये हातात पडतात. अहो, भीक मागीतली तरी रुपया हातात पडणार. सारं कसं नगदी नगदी नगदी. उधार नाहीच, उशिरा तर कधीच नाही. इकडं हात पुढे केला की पैसा ताब्यात. पण शेतीची व्यथा पहा, घाम गाळेपर्यंत काम करा अन् सहा महीने वाट पहा. शेत नागरलं पैसा नाही, शेत वखरलं पैसा नाही, शेत पेरलं पैसा नाही, धान उगवलं पैसा नाही, रात्री बेरात्री पाणी दिलं पैसा नाही, अनवाणी शेत राखलं पैसा नाही, महागा-मोलाचं खत घातलं पैसा नाही, पीक आलं पैसा नाही, माल पार मोंढ्यात घातला पैसा हातात नाही. नांगरल्या पासून माल घाले पर्यंत पैसा नाही, मग झक मारायला शेती करायची का? सगळ्या धंद्यांत नगदी पैसा. शेतीत सहा महिन्यांनी? शेतकऱ्यांनी शेती बंद करावी का? त्यानेच जगाची चिंता करायची का? ज्या कोणी उत्तम शेती सांगीतली त्यांनाच आता भर चौकात जाब विचारला पाहीजे. आपल्याला उत्तम शेती सांगीतली आणि स्वतः उत्तम नोकरी लाटली. हे स्पष्ट झाले की, 'करा कोणताही धंदा तरच हाती जमेल रोजच चंदा'. शेती कराल तर बांधावरच्या झाडांवर लटकाल, असे कोणी म्हटले तर त्याचे काय चुकले? किती जरी पिकली शेती, तरीही नाही जाणार साडेसाती. पिक कितीही आलं जोरदारं योग्य भाव कधीच नाही मिळणार. शेतीचा कितीही आला पैसा मोठा, त्याला आहेत सतराशे साठ वाटा. शेतक-यांला कधीच सुखाची झोप मिळणार नाही. 'सगळेच त्याला राबवून घेती, नाही देत कसलाच रोब. जगाचा पोशिंदा सदा उपाशी अन् आयते कुत्रे रोज तुपाशी. बळी तुझे बळ दाखवल्या शिवाय पर्याय नाही!





अगदी शाळेत असल्यापासून सर्वांना शिकविले जाते की, जगाचा पोशिंदा हा खरा शेतकरीच आहे. तो बळीराजा आहे, तो अन्न पिकवतो, तोच जगाला जेवू घालतो. त्याला शेतकरी राजा म्हणा. अशी विशेषणे देऊन त्याला मोठे केले जाते. पण संपूर्ण देशात गरीबीमुळे, कर्जामुळे, दारिद्र्यामुळे सर्वात जास्त आत्महत्या त्या शेतकऱ्यांचीच होत असते.

शेतकरी म्हणून काम करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांना कोणी पोरगी द्यायला तयार होत नाही. मुली देखील नवरा शेतकरी असेल तर पाठ फिरवतात. असे नेमके काय घडते की, या जगाच्या पोशिंद्याची जगाकडून अशी हेटाळणी होत असते. सरकारी धोरणे हीच त्याला कारणीभूत असल्यामुळे आज शेतकरी देशोधडीला लागला आहे. ना समाज या जगाच्या पोशिंद्याची दखल घेतो ना सरकार.

त्याला जर भाव कमी मिळाला तर आत्महत्या शिवाय दुसरा पर्याय काय? कधी बियाणे बोगस निघते, तर कधी डीपी जळते. पाऊस जास्त झाल्यावर शेती व पिके वाहून जाते, तर दुष्काळ पडल्यावर पाण्याची अडचण येते, त्यावेळी शेतकरी सावकाराकडून पैसे घेतो. पैसे परत करायचे पण पैसा नाही. सावकाराकडून कर्ज घेतलेले असते. ते फेडण्यासाठी अडचण येते. त्यामुळे शेतकरी आत्महत्येचा मार्ग पत्करतो.

गरज लागेल त्यावेळी शेतकरी सावकाराकडून कर्ज काढतो आणि ते नाही भेटलं, नाही फीटलं तर तो आत्महत्या करतो. ही आता परंपरा निर्माण झाली आहे. म्हणूनच अर्थशास्त्राच्या नियमानुसार भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात वाढतो व आपले कर्ज पुढील पिढीच्या माथी मारून कर्जातच मरतो, हे तंतोतंत सत्यात उतरू लागले आहे. गेल्या काही दिवसांपासून शेतकऱ्यांचा मृत्यू झालेल्या बातमीकडे आता प्रसारमाध्यमे कानाडोळा करायला लागली आहे. कारण 'रोज मरे त्याला कोण रडे' अशी अवस्था सर्वांचीच झाली आहे. या शेतकऱ्याला जर सरकारने, समाजाने धीर दिला नाही तर शेतीवर आधारित हा देश संकटात सापडल्याशिवाय राहणार नाही. भारत हा कृषिप्रधान देश आहे. पण प्रत्येक ठिकाणी शेतकऱ्यांची हेळसांड होत आहे, ते पाहून या देशाला कृषिप्रधान देश म्हणून म्हणण्याचीही आता शरम वाटू लागली आहे.

शेतकरी खते, बी-बियाणे खरेदी करायला जातो, त्यावेळी त्याला कंपनीने ठरवल्या भावापेक्षाही चढ्या भावाने खरेदी करावी लागते. या प्रकारामुळे तो प्रचंड तोट्यात येतो. तोट्यातील शेती तो कुठपर्यंत सहन करणार? तो कुठपर्यंत टिकणार आहे. मुळातच शेतक?यांच्या मालाचा भाव दुसरे ठरवतात व ते व्यापारी कींवा दलाल योग्य दर ठरवत नाहीत. तरुण शेतकरी वर्ग हा संयमी नाही. जुना शेतकरी त्यामानाने संयमी होता. शेतीतील नुकसान नवी पिढी सहन करू शकत नाही. त्यापेक्षा तो हातात दोरखंड घेतो व गळ्याला बांधतो.

आत्महत्या हा पर्याय नाही. आपलं कुटुंब उघड्यावर पडतंय, याची जाणीव शेतकऱ्यांनी ठेवली पाहिजे. नैसर्गिक आपत्तीमध्ये सुद्धा शेतकऱ्यांना अडचणीचा सामना करावाच लागतो. शेतकऱ्याचा माल पाऊस जास्त झाला तर वाहून जातो व कमी पडला तर पिके वाळून जातात. चांगले उत्पन्न आले म्हणून शेतकरी खुष होतो, तर दर कोसळतो. म्हणून खंबीर असलेला शेतकरी देखील कोसळतो. शेतकरी उभा राहिला पाहिजे म्हणून सरकारनेच कठोर पावले उचलली पाहिजे.

शेतकऱ्यांना जर वेळेवर पिक कर्ज, पिक विमा दिला तर शेतकऱ्यावर वाईट वेळ येणार नाही. शेतकऱ्यांना जर वेळेत पैसा मिळाला तर तो आत्महत्या करणार नाही. केवळ पैसा वेळेवर न मिळाल्यामुळे आर्थिक अडचणीमुळे शेतकरी आत्महत्येस तयार होतो.

कौटुंबिक अडचणीमुळे त्याला त्रास होतो. शेतीसाठी खर्च करण्यासाठी लोकांकडून उसने घेतलेले पैसे परत वेळेवर जर गेले नाही तर लोक पुन्हा पैसे देत नाहीत. शेतकरी आत्महत्या करण्यामागचं कारण असं आहे की, शेतकरी अगोदरच कर्जबाजारी झालेला असतो. शासनाने जो मालाला भाव केलेला असतो तो भाव शेतकऱ्याला मिळत नाही.

कोणतेही सरकार शेतकऱ्यांचे मूळ प्रश्न सोडवित नाही. सरकार कुठलाही निर्णय घेत नाही. शेतकरी संघटीतही नाही. आता काहीच परवडत नाही. आता काय करावं तेही समजत नाही. त्यामुळे वैफल्यग्रस्त शेतकरी पुन्हापुन्हा मरणाच्या दारात जातो. महागडे शिक्षण आजकाल कोणालाही परवडत नाही. महागडी शेती परवडेनाशी होत आहे. खते बी-बियाणे यांच्या किंमती पाहून शेतकरी अवाक होतो. सरकार कुठलाच आधार देत नाही. अशा वेळी शेतकऱ्यांनी करावे तरी काय?

त्यातच शेतकऱ्यांना भाऊबंदकीचा लागलेला शाप कायमच आहे. शेतीचे तुकडे होऊन जातात. त्या तुकड्यात शेती केलेली परवडत नाही. वैफल्यग्रस्त शेतकऱ्यांचे बांधावरून होणारे वाद न्यायालयात जातात. तिथे पैसाच लागतो. तेथेही शेतकऱ्यांची लुबाडणूकच होते. म्हणूनच नवी पिढी शेतीकडे पाठ फिरवू लागली आहे.

एखाद्या कंपनीत जाऊन काबाडकष्ट करून निश्चित अशी रक्कम घरी येईल, याची व्यवस्था शेतकऱ्यांची पोरं करू लागली आहेत. ज्यांच्याकडे कमी शेती त्यांना परवडत नाही व ज्यांच्याकडे भरपूर त्यांच्याकडे करायला कोणी नाही, असे देखील ग्रामीण भागात चित्र निर्माण झाले आहे. राजकारणातल्या 'कोटीच्या कोटी' उड्डाणांच्या बातम्या ऐकल्यानंतर शेतकऱ्यांच्या दारिद्र्याच्या बातम्या ऐकायला कुणाला वेळ आहे? म्हणूनच जगाच्या पोशिंद्याच्या व्यथा समाजाने समजून घेतल्याच पाहिजे.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मो. ९४२०६९१४२०

बळीराजाला अस्मानी आणि सुलतानी आपत्तीशी लढायचं बळ मिळावं म्हणून सरकार काही तरी करेल, अशी अपेक्षा कुणी करतच नाही. शेतकरी, कष्टकरी, कामगार वर्ग हाच हा देश चालवत आहे, ही जाणीव राज्यकर्त्यांना राहीलेली नाही. हा देश सहिष्णू, सर्वसमावेशक आणि विविधतेने नटलेला आहे, हे भान स्वयंघोषित संस्कृती रक्षकांना आलं पाहिजे.

सर्वसामान्य माणूस शेतकरी, कामगार वर्ग यांच्या खांद्यावर आपली पालखी आहे याचं भान उद्योगपती आणि व्यवसायिकांना राहीलेलं नाही. सरकारी नोकरीची लाभलेली कवचकुंडले आपल्याला सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी असून आपण जनतेसाठी आहोत, जनता आपल्यासाठी नाही, हे भान तमाम सरकारी नोकरांना आलचं पाहिजे.

आपापल्या कलेच्या क्षेत्रात उत्तुंग यश मिळवणारे लेखक, कवी, कलावंत ह्यांना ज्या रसिकांच्या प्रेमावर मोठं होता आलंय, त्या रसिकांच्या आणि समळ्या समाजाच्या हितासाठी कणखर भूमिका घेऊन प्रसंगी समळ्या व्यवस्थेच्या विरोधात उभ राहण्याचं सामर्थ्य, बळ आणि सदबुद्धी जनतेला आली पाहिजे.

कुठल्याही जात, धर्म, समूहाची द्वेषमूलक मांडणी करणाऱ्या माथेफिरूंच्या मनातल्या द्वेषाच्या भिंती नष्ट होऊन प्रेमाचे पूल कधी निर्माण होवोत देवचं जाणो. आपल्या मागच्या पिढ्यांनी आपले संसार, घरादाराची राखरांगोळी करून, प्राणांचे मोल देऊन मिळवलेलं स्वातंत्र्य आणि या देशाची देश म्हणून असलेली ओळख जपण्याचं भान येणे गरजेचे आहे.

अश्या प्रचंड आशा अपेक्षांच्या ओझ्याखाली एक एक दिवसाची जगण्याची लढाई लढताना शेतकरी व जनताही मेटाकुटीला आली आहे. शेतकऱ्यांच्या जीवनातील अंधःकार जेंव्हा दूर होईल, त्याचवेळी हा देश जगाच्या पाठीवर राज्य करेल!

## शेतकरी वाऱ्यावर तिजोरीचे लुटेरे पारावर

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या तिजोरीचे लुटेरे राज्यभर फिरत होते. प्रत्येकाला अपेक्षित संख्याबळाचे आमदार निवडून आणण्यासाठी यात्रा काढाव्या लागल्या होत्या. या यात्रांमधील पंचतारांकित मंडप, जेवणावळी बघितल्या असतीलच. फुकट वाटपाच्या अनेक योजनांबरोबर 'लाडकी बहीण व भाऊ' योजनेमुळे सर्वात अधिक हाल शेतकरी वर्गाचे झाले. अशा योजनांमुळे फुकट मिळणारा पैसा व राशनमुळे शेतावर काम करणारे शेतमजूर हा वर्ग संपुष्टात आला. शेतकरी वर्गाचे तर अक्षरशः कंबरडे मोडले होते. महम्मद तुघलकाप्रमाणे शेतकऱ्याने उत्पादीत केलेल्या कांद्या सारख्या शेतमालाची निर्यात बंद केली जाते व विविध प्रकारचे निर्यात कर लावले जातात. तसेच शेती उत्पादनासाठी या शेतकरी वर्गाने घेतलेले कर्ज व त्यावरील व्याज यामुळे संपूर्ण शेतकरी वर्ग कर्जबाजारी झाला असून अनेक शेतकरी व त्यांची तरुणाई सावकारी पाशात अडकली आहे. दरवर्षी शेतीच्या उत्पादनात घट होत आहे. भविष्यात शेतकऱ्यांच्या मुलांच्या हाताला कामच शिल्लक राहिले नाही तर ते कोणत्या विश्वात शिरतील याचे भान सरकारला ठेवावे लागणार आहे.

## शेतकऱ्याला धीर द्या अन्यथा देश संकटात!

अख्ख्या महाराष्ट्राचा शेतकरी ओल्या दुष्काळाने बरबाद झाला. घरेदारे बरबाद झाली, पोटच्या लेकरासारखी सांभाळलेली गुरे पाण्यात वाहून मरुन गेली. अर्थात मदत फक्त दोन हजार कोटीची जाहीर झाली. याच दरम्यान नाशिक शहरात साधुंच्या कर्मकांडासाठी १४ हजार कोटी जाहीर झाले. देशाच भविष्य घडवण्याची जबाबदारी असलेल्या शेतकऱ्यांच्या हाती काय लागले? शेतकऱ्याच्या भाजीच्या देठालाही हात लावता कामा नये, कुणबी कष्टकऱ्यांच्या शेतातून घोडदळ पायदळ हे पिकातून न जाता बाजूने जावे, रयतेने पोटच्या लेकरासारखी काळजी घेऊन बहरलेले पीक हे आपल्या स्वतःच्या शेतात असल्यासारखे सैनिकांना वाटले पाहीजे, शेतकऱ्यांची दान्यांनी बहरलेली कणसे बघुन आपल्या शेतातील कणसे त्यांना वाटली पाहिजे, असा आपल्या सैनिकांना आदेश देणाऱ्या, शेतकऱ्याला तळहातावरच्या फोडाप्रमाणे जपणाऱ्या छत्रपती शिवरायांच्या धेय धोरणांच, विचाराचं राज्य जोपर्यंत निष्ठावंत अठरापगड समाजातील प्रतिनिधित्व करणाऱ्या तरुणाईत येणार नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांना न्याय मिळेल असे वाटत नाही.

# विकतचे पुरस्कार घेणाऱ्यांचा सुळसुळाट

हल्ली प्रत्येकाच्या मोबाईलवर फेसबुकच्या माध्यमातून आपल्याला काही खऱ्या तर काही खोट्या बातम्या तसेच जाहिराती किंवा विविध प्रकारची मार्केटिंग करणारे बॅनर वाचायला मिळतात. मग ते राजकीय क्षेत्राचे असो, धार्मिक क्षेत्राचे असो, शैक्षणिक क्षेत्राचे असो किंवा सांस्कृतिक क्षेत्राचे असो.

या प्रत्येक क्षेत्राशी निगडित पुरस्कार देणाऱ्या विविध सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक संघटना किंवा विविध संस्था विविध पुरस्कार वितरणाचे बॅनर सोशल मीडियावर फिरवत आहेत. वेगवेगळ्या पद्धतीचे म्हणजेच साहित्यरत्न पुरस्कार, समाज भूषण पुरस्कार, भारत भूषण पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार किंवा समाजरत्न पुरस्कार आम्ही देत आहोत म्हणून या संघटना बॅनरखाली आपला फोन नंबर देऊन मेसेजच्या माध्यमातून आपले सामाजिक कार्य व आपण कोणत्या क्षेत्रात कोणते कार्य करत आहोत, यासाठी माहिती व फोटो पाठवा, आम्ही तुम्हाला तुमच्या वैयक्तिक क्षेत्राशी निगडित कार्याची दखल घेऊन पुरस्कार देऊ असे सांगत आहेत.

लगेच दोन दिवसांनी मेसेज करत आहेत की आम्ही तुमच्या कार्याची दखल घेऊन तुम्ही पुरस्कारासाठी दखलपात्र आहात त्यासाठी तुम्हाला एवढी एवढी रक्कम आम्हाला पाठवावी लागेल, तेव्हा तुमची नोंद होईल आणि मग तुम्हाला पुरस्काराबाबत अधिक माहिती दिली जाईल, असे सांगून पैसे उकळण्याचा धंदा विविध सामाजिक संघटना व धार्मिक संघटना करताना दिसत असल्याचे चित्र आपण सध्या पाहत आहोत.



बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी, जि. लातूर.
7498715661

ज्यांना पुरस्काराची हाव आहे, ज्यांना पुरस्कार घेऊन मिरवायची सवय आहे, जे पुरस्कारासाठी हपापलेले असतात आणि ज्यांना विविध प्रकारचे पुरस्कार गोळा करायची सवय असते, ते लोक त्या संस्थांना व संघटनांना म्हणेल तेवढे पैसे देऊन पुरस्कारासाठी पात्र होत आहेत आणि पुरस्कार मिळवत आहेत. असे खोटे व विकतचे पुरस्कार घेऊन मिरवणाऱ्यांची संख्या आता प्रत्येक क्षेत्रात प्रचंड वाढली आहे. अ असे नापात्र व विकतचे पुरस्कार घेऊन लगेच बॅनरबाजी, पेपरबाजी आणि टीव्ही व सोशल मीडियावर पुरस्कार प्राप्त झाला म्हणून बातम्या देणाऱ्यांचा सुळसुळाट आता प्रत्येक क्षेत्रात वाढला आहे.

असे विकतचे व नापात्र पुरस्कार घेऊन मिरवण्यात काय अर्थ? विकतचे पुरस्कार घेऊन स्वतःचे नाव कधीच मोठे होत नसते तर उलट आपल्याला कमी समजून आपल्या पश्चात आपला अपमान केला जातो. ज्यांचे कार्य आपल्या क्षेत्रात खरोखरच उल्लेखनीय नाही, ज्यांचे आपल्या क्षेत्रात योगदान योग्य व उचित नाही, ज्यांचे समाजासाठी व देशासाठी सामाजिक कार्य शून्य आहे, जे आपल्या नेमून दिलेल्या कार्याशी व पेशाशी एकनिष्ठ नसतात, आपल्या कार्यात म्हणावे तेवढे सक्रिय नसतात, तेच महाभाग असे विकतचे पुरस्कार घेऊन स्वतःच्या हाताने आपले नाव मोठे करण्याचा प्रयत्न करतात.

पण हे खरंच कसे शक्य होईल हो? लोक तुमच्या नापात्र पुरस्काराची वाहवा कशी करतील हो? लोक तुम्हाला त्या क्षेत्रातील आदर्श व मौल्यवान हिरा समजतील का हो? समाज सुद्धा खूप हुशार व सुजाण असतो. त्याला प्रत्येक क्षेत्रातील प्रत्येक व्यक्तीशी निगडित लहान सहान गोष्टी माहित असतात. त्यांचे त्यांच्या क्षेत्रातील सामाजिक कार्य व एकनिष्ठपणा माहीत असतो.

आपल्या कार्याशी किती एकनिष्ठ आहात आणि आपल्या कार्याशी किती प्रामाणिक आहात? हे लोकांना सांगायची गरज नाही. गावकरी व समाज बांधव तेव्हाच ओळखतात की, हा व्यक्ती पुरस्काराच्या लायकीचा व योग्यतेचा आहे का? याचे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात खरंच उल्लेखनीय कार्य आहे का? याला भेटलेला पुरस्कार खरंच दखलपात्र आहे का? का तो हा विकतचा पुरस्कार घेऊन उगाच मिरवत आहे?

या प्रत्येक गोष्टीची जाण आणि भान समाजाला असते. म्हणून विकतचे पुरस्कार घेऊन लोकांना वेड्यात काढण्याचा धंदा बंद करा...

आपल्याला खरंच दखलपात्र व सामाजिक कार्याची दखल घेऊन विविध सामाजिक संघटनांतर्फे किंवा एखाद्या संस्थेतर्फे किंवा जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पुरस्कार दिला जातो तेव्हा त्या पुरस्काराचा आनंद खरोखरच अवर्णनीय असतो. समाज बांधव गावकरी व विविध क्षेत्रातील लोक तुमच्या दखलपात्र पुरस्काराची वाहवा करतील. तुमचे बॅनर व पोस्टर चौका चौकात लावतील. पेपरबाजी व सोशल मीडियावर तुमच्या नावाचा गवगवा करतील. फक्त त्यासाठी आपले काम प्रामाणिक, एकनिष्ठ व समाजाच्या आणि देशाच्या भल्यासाठी असले पाहिजे.

तरच तुम्हाला मिळालेल्या पुरस्काराची किंमत असेल. नाहीतर विकतचे पुरस्कार आजकाल कोणीही घेऊन आपल्या नावाचा स्वतःच्या हाताने डंका वाजवत आहे. हे आपल्याला सांगायची गरज नाही. सामाजिक कार्याची दखल घेणारे लोक प्रचंड प्रमाणात आहेत. ते तुमच्या कार्याची दखल घेऊन जर तुमचे कार्य खरोखरच उल्लेखनीय व प्रशंसनीय असेल तर तुम्हाला पुरस्कार देतीलच.

तुम्हाला कोणत्या राजकीय लोकांकडे किंवा प्रशासकीय अधिकाऱ्याकडे पुरस्कार द्या म्हणून त्यांच्या पाया पडायची किंवा त्यांचे पाय धरायची गरज पडणार नाही. एवढे मी खात्रीने सांगू शकतो. मी सुद्धा साहित्यिक व लेखक आहे. मला सुद्धा साहित्य क्षेत्रातील पुरस्कार देण्यासाठी एका संघटनेने माझ्या लेखांचे फोटो मागितले होते. मी ते फोटो त्यांना मोठ्या अपेक्षेने व खुशीने पाठवले. आणि त्यांनी मला सांगितले की तुम्हाला दोन दिवसात कळवतो की, तुमची पुरस्कारासाठी निवड होईल किंवा नाही?

बरोबर दोन दिवसांनी त्यांनी मला मेसेज केला आणि सांगितले की तुमची पुरस्कारासाठी निवड झाली आहे त्यासाठी तुम्हाला पाच हजार रुपये मानधन आमच्या संस्थेला द्यावे लागेल...मी लगेच माझे गुरुवर्य व सुप्रसिद्ध लेखक कवी तथा कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक बबनराव गुळवे गुरुजी यांना ही हकीकत सांगितली. तेव्हा त्यांनी मला सांगितले की, हे बघ असले विकतचे पुरस्कार न घेतलेलेच बरे..अशा अनेक संघटना आहेत जे की विकत पुरस्कार देऊन सन्मान करतात...अशा विकतच्या पुरस्काराला काय अर्थ? हे मला गुळवे सरांनी सांगितले आणि मी तो विकतचा पुरस्कार न घेण्याचे ठरवले.

गुळवे सर म्हणतात की, आपण आपल्या क्षेत्रात व पेशात आपले काम प्रामाणिकपणे व इमानेइतबारे करत राहायचे....आपल्या कार्यातून सुगंध दरवळत ठेवायचा... तो सुगंध आपोआप सर्व दूर पसरतो आणि आपल्या नावाचा बोलबाला आपोआप होतो. आपल्याला पुरस्कार मागायची किंवा द्या म्हणायची गरज पडणार नाही आपल्या कार्याची दखल घेऊन आपल्याला पुरस्कार देणाऱ्या प्रामाणिक व इमानदार आणि निस्वार्थ सामाजिक संघटना व संस्था भरपूर आहेत...त्या आपल्याला पुरस्कार नक्कीच देतील...मला सुद्धा माझ्या सामाजिक कार्याची दखल घेऊन एकही रुपया न देता मला अनेक पुरस्कार मिळालेले आहेत...

त्यासाठी प्रत्येक क्षेत्रातील कर्मचा?यांना, शासकीय अधिकाऱ्यांना, शिक्षकांना व इतर क्षेत्रातील कार्यकर्त्यांना विनंती आहे की, माझ्या मोठ्या बांधवांनो, विकतचे पुरस्कार घेण्याच्या फंदात पडू नका आणि आपले नाव खराब करून घेऊ नका...

प्रामाणिकपणे व तन-मन-धनाने आपले कार्य करत राहा नक्कीच आपल्या कार्याची दखल घेऊन आपल्याला योग्य व दखलपात्र पुरस्कार मिळेल... एवढे मात्र नक्की...

■ ■ ■

# मोबाइल फोनचे व्यसन

काही वर्षांपूर्वी माझी मावशी रात्रीच्या सुमारास वॉशरूमला जाण्यासाठी उठली तेव्हा तिला १५ वर्षांच्या एकुलत्या एका मुलीच्या बेडरूमध्ये अंधारात मंद प्रकाश दिसला. ती दार ठोठावून आत गेली. मुलगी पायापासून ते डोक्यापर्यंत अंगावर घेऊन झोपलेली होती. चादरीतून तो प्रकाश आणि हसण्याचा आवाज येत होता.

मावशीने लाइट लावताच मुलगी उठली आणि म्हणाली की सकाळी फेसबुकवर केलेल्या पोस्टवर आलेल्या लाइक्सला उत्तर देण्यात व्यग्र आहे. त्या शाळकरी मुलीशी बोलल्यानंतर, मला समजले की केवळ मुलीलाच नाही तर मावशीलाही समुपदेशनाची गरज आहे. पुढे असे झाले की आम्हाला दोघांनाही जाणवले की मुलगी मोबाइलच्या अनिवार्य उपयोगाकडे आकर्षित होते आहे. कारण तो नेहमी उपलब्ध असतो आणि कधीच कंटाळवाणे होत नाही. तेव्हापासून, मावशीने तिच्यासाठी शक्य तेवढ्या वेळा उपलब्ध राहू लागली. त्यामुळे मुलगी मोबाईल फोनपासून दूर राहू लागली आहे.

आता एआय हळूहळू मावशीची जागा घेत आहे. ते मुलांना कधीच म्हणत नाही, तुम्ही खुळचट प्रश्न विचारत आहात. ते आता भावनिक आधार देत आहे. ते माणसांसारखे संवाद साधत मैत्री करत आहे. तंत्रज्ञान मानवी नातेसंबंधांची पुनर्परिभाषा करत आहे त्यामुळे आपल्याला किशोरवयीन मुलांच्या तंत्रज्ञानाशी असलेल्या आसक्तीबद्दल काळजी करण्याची गरज आहे.

मुले आपला गृहपाठ करण्यासाठी आणि तो लवकर पूर्ण करण्यासाठी एआयकडे मदतच मागत नाहीत, तर ते व्यावहारिकरित्या काय खरेदी करावे, कुठे खरेदी करावे, काय घालावे आणि कोणती लिपस्टिक ड्रेसशी जुळते याबद्दल सूचना मागत आहेत. ते एआयशी अधिकाधिक संवादी होत आहेत, जे सल्ला देण्यास आणि मैत्री करण्यास सक्षम आहे.

परंतु तज्ञ म्हणतात की पालक म्हणून आपण दुतर्फा समस्येचा सामना करत आहोत. एकीकडे, एआय दिवसातील मुलांचा बहुतेक वेळ घेत आहे. दुसरीकडे, मुले विचार करू इच्छित नाहीत, म्हणून ते त्याचा अधिक वापर करत आहेत. एआय वैयक्तिक डिव्हाइसेस, दैनंदिन निर्णय आणि समस्या सोडवण्यावरील माहितीचा पसंतीचा स्रोत बनला आहे.

स्क्रीन व डिजिटल मीडियाचा अभ्यास करण्यासाठी आणि त्याचा सुज्ञ वापर करण्यासाठी, एआयची आवश्यकता आहे. कॉमन सेन्स मीडियाच्या एका अभ्यासातून दिसले की एआय कस्टमाइज्ड मित्र बनला आहे. तो कधीही टीका करत नाही, तर नेहमी कौतुक करतो व नवीन गोष्टी सुचवतो.

तज्ञ पालकांना नेमका असाच सल्ला देतात. कल्पना करा की तुमच्या १८ महिन्यांच्या मुलाने त्याच्या शर्टच्या चुकीच्या काजात बटण लावले. म्हणून तुम्ही त्याला बटन लावण्याची ही पद्धत चुकीची आहे, असे म्हणू नका. त्याऐवजी म्हणा, छान, हे बटण लावण्याची नवी पद्धत दिसते. , पण मी किंवा तू असे लावले पाहिजे, असे सांगा. नंतर बटण व्यवस्थित लावा. एआय असेच करते. परंतु तुम्ही आणि मी मुलांना देऊ शकतो ती शारीरिक मदत एआय देऊ शकत नाही.
त्यांच्या कामाचे कौतुक, तुम्ही त्यांच्याकडून काय अपेक्षा करता आणि कोणते काम कसे करावे - मुलांना एआयपासून दूर ठेवण्यासाठी या तिन्ही गोष्टी एकत्र कराव्यात. लक्षात ठेवा की तंत्रज्ञान ही समस्या नाही. परंतु प्रत्येक गोष्टीसाठी त्याचा सक्तीने वापर करणे ही आपल्या मुलांची समस्या आहे.

■ ■ ■

# खरोखरच महागाई कमी होईल का?

सरकारने जीएसटी कमी केल्याने अनेकांना लाभ अवश्य होईल यात दुमत नाही. परंतु जीएसटी सरकारनेच लावली होती आणि आता ती कमी केली म्हणजे काय केले? सर्वप्रथम जीएसटच्या माध्यमातून सरकारची तिजोरी भरली ही बाब ठीक आहे आणि आता जीएसटी कमी केली म्हणजे महागाई कमी झाली किंवा सर्वसामान्यांचे जगणे सुसह्य झाले म्हणता येणार नाही.

जीएसटीचा संपूर्ण पैसा हा जनतेच्या खिशातून जात असतो. देशाच्या १४० कोटी जनतेला खरोखरच दिलासा द्यायचा असेल, जीवन सुसह्य करायचे असेल तर केंद्र व राज्य सरकारांनी महागाई कमी करणे अत्यंत गरजेचे आहे. देशात महागाईचा भस्मासुर वाढत आहे. पगार व महागाई भत्ता वाढवून सरकारी कर्मचाऱ्यांकडुन सरकार आपली पाठ थोपटून घेते. याचा फायदा राजकीय पुढाऱ्यांच्या पगारामध्ये व पेंशनमध्ये होतो. परंतु व्यापारी व पुंजीपतीवर्ग महागाई वाढवून सरकारची दिशाभूल करीत असतो. याचे परिणाम देशातील सर्वसामान्य, गरीब, शेतकरी, मोलमजुर यांना महागाईच्या रूपात नेहमीच भोगावे लागतात.

देशातील कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात जर १ टक्क्याने वाढ झाली असेल तर त्याचा व्यापारी मोठ्या प्रमाणात फायदा घेऊन संपूर्ण भारतामध्ये सर्वच वस्तूंवर २० टक्क्यांनी वाढ करतात. याचे परिणाम शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांना भोगावे लागते. सरकारने महागाई कमी करण्यावर जास्तीत जास्त भर दिला पाहिजे.

एकतर देशातील मुठभर आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांनी देशाचे बाटोळे करून करोडो रुपयांची मोठ्या प्रमाणात चलअचल संपत्ती डांबुन ठेवल्याने देशात महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेरोजगारी व शैक्षणिक समस्या इत्यादी अनेक समस्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

दुसरीकडे देशातील महागाई वाढल्याने १४० कोटी जनतेला दुष्परिणाम भोगावे लागतात. त्यामुळे जीएसटीत कपात करून खुप मोठी कामगिरी म्हणता येणार नाही व जीएसटी बचत महोत्सव सुध्दा म्हणता येणार नाही.

देशातील राजकीय पुढारी जोपर्यंत सर्वसामान्यांनप्रमाणे वागणार नाही आणि रहाणार नाही तोपर्यंत देशाचा पायाभूत विकास संभव नाही.त्यामुळे सरकारने सर्वप्रथम आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या पाहिजे, त्यांच्या संपत्तीवर टाच ठेवायला पाहिजे.तेव्हाच देश सुजलाम सुफलाम होईल. तेव्हाच खरा बचत महोत्सव म्हणावा लागेल व जनता सुध्दा त्याचे मनापासून स्वागत करेल.

काही ठिकाणी सुधारणा होण्याची सुध्दा गरज आहे. सरकारने सर्वप्रथम जीएसटी दर वाढविले आणि आता कमी केले यामुळे गरिब व सर्वसामान्यांना काय फायदा?

सरकारने जीएसटी दर जर संतुलित ठेवले असते तर आज महागाईवर आपोआप नियंत्रण ठेवता आले असते. त्यामुळे आता जीएसटीमध्ये कपात करून महागाई कमी होईल असे वाटत नाही. आता जीएसटी महोत्सव आणि अगोदर जीएसटी वसुल केली त्याला कोणता महोत्सव म्हणावे? असाही प्रश्न सर्वसामान्यांनपुढे उपस्थित होतो.

त्यामुळे हा महोत्सव नसुन प्रथम जास्त वसुल करणे व नंतर त्याच्यात कमी करून स्वतःची पाठ थोपटने असेच म्हणावे लागेल. प्रधानमंत्री म्हणतात की, मी स्वदेशी खरेदी करतो, मी स्वदेशी विकतो ही भावना प्रत्येक देशवासीयांच्या मनात रूजली पाहिजे,तरच विकासाला गती मिळेल.

देशात स्वदेशीचा नारा हा १९४७ पासुनच होता. परंतु पुंजीपतीवर्गांनी, हायप्रोफाइलमध्ये रहाणारे व राजकीय पुढारी यांनीच स्वदेशीच्या नाऱ्याला तिलांजली दिली व महागड्या विदेशी वस्तू खरेदी करण्यास सुरुवात केली व यावर जास्तीत जास्त भर दिला याला काय म्हणावे!

आता आपण २१ व्या शतकात वावरत आहोत स्वदेशीचा वापर आपण जेव्हा म्हणतो तेव्हा याची सुरुवात देशातील आजी-माजी संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांपासूनच व्हायला पाहिजे.

देशातील राजकीय पुढारी भाषणामध्ये ज्ञान वाटत असतात. देशातील प्रत्येक राजकीय पुढाऱ्यांनी दर महिन्याला जाहीर करायला पाहिजे की मी आणि माझ्या परिवारातील सदस्यांनी या - या विदेशी वस्तूंचा त्याग केला व स्वदेशी वस्तूंचा वापर करायला सुरुवात केली. पुढे चालून कोणत्याही विदेशी वस्तूंचा वापर करणार नाही. तेव्हाच स्वदेशी खरेदी-विक्रीला महत्व येईल व खऱ्या अर्थाने देशाची वाटचाल आत्मनिर्भर भारत होण्याच्या दिशेने होईल.

आज शेतकऱ्यांच्या समस्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेरोजगारी, महागाई, महागडे शिक्षण,आरोग्य सुविधांच्या समस्या याला जबाबदार देशातील ९५ टक्के राजकीय पुढारीच आहेत. सरकारने जर आरोग्य सुविधा आणि शिक्षण सुविधा मोफत जर केले तर जनता आभारी राहील.

■ ■ ■

# ग्लॅम वर्ल्ड

## दोन वेगळ्या प्रेमकथा

निर्माते महेश भट्ट आणि त्यांची शिष्या दिग्दर्शिका सुहृता दास यांनी नवीन चेहऱ्यांसह एक नवीन प्रेमकथा आणली आहे. त्यांच्या 'तू मेरी पुरी कहानी' या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला. महेश भट्ट नेहमीच नवीन चेहऱ्यांना संधी देण्यासाठी प्रसिद्ध आहेत. या चित्रपटात हिरण्य ओझा आणि अरहान पटेल ही एक नवीन जोडी आहे. अभिनेत्री बनण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या एका मुलीची कहाणी या चित्रपटातून सांगितली आहे. अजय मुरडिया निर्मित आणि विक्रम भट्ट यांनी सादर केलेला हा चित्रपट २६ सप्टेंबर २०२५ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. 'तारा अँड आकाश : लव्ह बियॉन्ड रेयाल्म्स' या चित्रपटामध्ये अलंकृता बोरा आणि जितेश ठाकुर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. दिग्दर्शन श्रीनिवास अब्रोल यांचे आहे तर दीप्ती नवल, अमोल पालेकर, बृजेंद्र कला यांच्यासारखे कलाकार या चित्रपटात आहेत.



## जान्हवी-इशानचा 'होमबाउंड' ऑस्करमध्ये



१ अभिनेत्री जान्हवी कपूर आणि ईशान खट्टर यांच्या 'होमबाउंड' या चित्रपटाची २०२६ च्या ऑस्कर अकादमी पुरस्कारांमध्ये 'बेस्ट इंटरनॅशनल फीचर फिल्म' या श्रेणीसाठी निवड झाली आहे. भारताकडून विविध भाषांमधील २४ चित्रपट ऑस्करच्या शर्यतीत होते. यात अभिषेक बच्चनचा आय वॉंट टू टॉक, पुष्पा २, द बंगाल फाईल्स हे हिंदी चित्रपटांबरोबरच दशावतार, आता थांबायचं नाय, स्थळ आणि साबर बोंड या मराठी चित्रपटांचाही समावेश होता. यामधून 'होमबाऊंड' या हिंदी चित्रपटाची निवड करण्यात आली आहे.
विशेष म्हणजे आतापर्यंत या चित्रपटाने अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये कौतुकास्पद कामगिरी केली आहे. नीरज घायवान दिग्दर्शित या चित्रपटाने अनेक पुरस्कार जिंकले आहेत. टोरांटो आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आणि कान चित्रपट महोत्सवामध्ये धमाल केल्यानंतर हा चित्रपट जगभरातील प्रेक्षकांचे रंजन करण्यासाठी सज्ज आहे. जान्हवी आणि इशान खट्टर ही जोडी 'धडक' नंतर आता या चित्रपटातून प्रेक्षकांचे मनोरंजन करायला सिद्ध झाली आहे.
धर्मा प्रॉडक्शनचा हा चित्रपट 'द न्यूयॉर्क टाइम्स'च्या 'टेकिंग अमृत होम' या लेखावर आधारित आहे. निर्मात्यांनी आता 'होमबाउंड'च्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे. पोस्टरमध्ये ईशान खट्टर आणि विशाल जेठवा बाईक चालवताना दिसत आहे. हा चित्रपट जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे. त्याची कथा उत्तर भारतातील एका छोट्या गावातून येणारे बालपणीचे दोन मित्र शोएब अली आणि चंदनकुमार यांच्याभोवती फिरते. चित्रपटाची पटकथा बशरत पीर, नीरज घेयवान आणि सुमित रॉय यांनी लिहिली आहे. चित्रपटाची निर्मिती करण जोहर, आदर पूनावाला, अपूर्व मेहता आणि सोमेन मिश्रा यांनी केली आहे. थिएटरमध्ये प्रदर्शित झाल्यानंतर हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे.

## प्राजक्ता कोळी मराठी चित्रपटात

सोशल मीडियावर 'मोस्ट लीसन' म्हणून नाव कमावणाऱ्या प्राजक्ता कोळीची लोकप्रियता केवळ डिजिटल प्लॅटफॉर्मपुरती मर्यादित नाही. दैनंदिन जीवनावर आधारित विनोदी व्हिडिओंमुळे ती प्रसिद्ध झाली. त्यानंतर तिने अभिनयाकडे वळत नेटफ्लिक्सच्या 'मिसमॅच' या वेब सीरिजमध्ये मुख्य भूमिका केली. ओटीटी आणि बॉलिवूडमध्ये तिने आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. प्राजक्ताने धर्मा प्रॉडक्शनच्या 'जुग जुग जिओ' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते. त्यात ती वरुण धवन आणि कियारा अडवाणीसोबत लीड रोलमध्ये होती. अलीकडेच ती प्राइम व्हिडिओच्या 'अंधेरा' या मालिकेतही दिसली.
प्राजक्ता आता कारकिर्दीचा एक नवीन अध्याय सुरू करणार आहे. ती पहिल्यांदाच मराठी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवणार आहे आणि तिच्या चित्रपटाचे नाव 'क्रांतीज्योती विद्यालय – मराठी माध्यम' असे आहे. प्राजक्ताने एक पोस्ट केली आहे. त्यात ती म्हणते, मी माझ्या मातृभाषेच्या प्रेमात आहे. लवकरच भेटू. हा चित्रपट हेमंत ढोमे यांनी दिग्दर्शित केला आहे. चित्रपटाची कथा महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्था आणि मराठी माध्यमांच्या शाळांच्या घसरणीभोवती गुंफलेली आहे. हा चित्रपट समाजात एक गंभीर संदेश देण्याचा प्रयत्न करेल. चित्रपटाची स्टारकास्ट एकदम तगडी आहे. चित्रपटात प्राजक्ता कोळीसह सचिन खेडेकर, अमेय वाघ, सिद्धार्थ चांदेकर, क्षिती जोग, कादंबरी कदम, हरीश दुहाडे आणि पुष्कराज चिरपुटकर असे कलाकार आहेत.





## कोकणच्या मातीतला कुर्ला ते वेंगुर्ला

'कुर्ला टू वेंगुर्ला' या चित्रपटातून प्रेक्षकांना सहकुटुंब पुरेपूर मनोरंजन अनुभवता येणार आहे. उत्तमोत्तम कलाकार असलेल्या या चित्रपटात मालवणी बोलीचा मस्त तडका आहे. विजय कळमकर दिग्दर्शित हा चित्रपट १९ सप्टेंबर रोजी सर्वत्र प्रदर्शित झाला आहे. सध्या राज्यभरातील ग्रामीण भागात मुलांची लग्न जमणे ही समस्या झाली आहे. गावातल्या मुलींना शहराचे आकर्षण असते. त्यांच्याही आयुष्याबद्दल काही इच्छा–आकांक्षा असतात. परिणामी शहर आणि ग्रामीण भाग अशी एक दरी निर्माण झाली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांच्या रखडणाऱ्या लग्नाचा संवेदनशील विषय आणि त्याच्याशी जोडलेले सामाजिक मुद्दे याची अत्यंत मनोरंजक पद्धतीने या चित्रपटात मांडणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे पैसे नसताना वर्गणी काढून कोकणातील कलाप्रेमी तरुणांनी आणि त्यांचा 'गुडफादर' अमरजीत आमले यांनी हा चित्रपट निर्माण केला आहे. लोकसहभागातूनच याचे वितरण आणि प्रमोशन केले आहे.
सिनेकथा कीर्तन, चंद्रभागा स्टुडिओज आणि एम. व्ही. शरतचंद्र यांनी 'कुर्ला टू वेंगुर्ला' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. अमरजीत आमले, विजय कळमकर, चारुदत्त सोमण, नयना सोनावणे, अविनाश सोनावणे, एम. व्ही. शरतचंद्र हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवाद लेखन अमरजीत आमले यांचेच आहे. अभिनेत्री वीणा जामकर, प्रल्हाद कुडतरकर, वैभव मांगले, सुनील तावडे, स्वानंदी टिकेकर, साईंकित कामत अशी उत्तम स्टारकास्ट या चित्रपटात आहे. यासोबतच चित्रपटात्त अमेय परब, शेखर बेटकर आणि अनघा राणे या नवोदित कलाकारांचा अभिनयही पहायला मिळणार आहे. माती आणि नाती जोडणारा, प्रत्येक कुटुंबाची गोष्ट सांगणारा 'कुर्ला टू वेंगुर्ला' प्रेक्षकांशी नाळ जोडत असल्याच्या प्रतिक्रिया सर्वत्र उमटत आहेत.



## कतरिनाकडे 'गूड न्यूज'

अभिनेत्री कतरिना कैफ लवकरच आपल्या आयुष्याच्या एका नव्या टप्प्याला सुरुवात करणार आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला असून अनेक माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, कतरिना कैफ गर्भवती असून ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात आपल्या पहिल्या बाळाला जन्म देणार आहे. या वृत्तामुळे विकी–कतरिनाच्या चाहत्यांमध्ये आनंदाची लाट पसरली आहे. गेले अनेक महिने कतरिना सार्वजनिक कार्यक्रमांपासून दूर होती. त्यामुळे तिच्या गरोदर असण्याच्या चर्चांना जोर आला होता. ती अनेकदा सैल कपड्यांमध्ये दिसल्यानेही या चर्चांना बळकटी मिळाली. या वृत्ताला एनडीटीव्हीसह अनेक प्रतिष्ठित वृत्तसंस्थांनी दुजोरा दिला आहे. या जोडप्याने अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केली नसली, तरी त्यांच्या जवळच्या सूत्रांनी ही बातमी खरी असल्याचे सांगितले आहे.

## काजोल आणि ट्विंकलचा नवा शो

बॉलीवूडमध्ये सध्या टॉप शो आणि ब्रॉडकास्ट चा ट्रेंड वाढतो आहे. नेटफ्लिक्स वर कपिल शर्माचा 'द ग्रेट कपिल शर्मा शो' जोरात सुरु आहे. आता नेटफ्लिक्सला टक्कर देण्यासाठी प्राईम व्हिडिओ एक नवीन धमाल टॉक शो घेऊन येतो आहे.



प्रसिद्ध अभिनेत्री काजोल आणि अभिनेत्री लेखिका ट्विंकल खन्ना हा शो सादर करणार आहेत.
'टू मच विथ काजोल अँड ट्विंकल' असे या शो चे नाव आहे. २५ सप्टेंबरपासून ॲमेझॉन हा शो प्राईम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे. होस्ट म्हणून काजोल आणि ट्विंकल खन्ना सेलिब्रिटीसोबत मनमोकळ्या गप्पा मारणार आहेत. या शोमध्ये कोणते सेलिब्रिटी पाहुणे म्हणून येणार याची उत्सुकता चाहत्यांमध्ये आहे. अनेक मोठी नावे या शोमध्ये दिसण्याची शक्यता आहे. विशेषतः सलमान खान आणि आमिर खान यांचा समावेश आहे. हे दोन्ही दिग्गज कलाकार या शोमध्ये एकत्र दिसू शकतात असे म्हटले जाते. सलमान आणि आमिरने या भागाचे शूटिंग पूर्ण केल्याचे वृत्त आहे. त्या व्यतिरिक्त शाहरुख खान आणि अक्षयकुमार यांच्या नावाचाही या यादीत समावेश आहे.

## नेटफ्लिक्सवर 'धडक २' आणि 'सन ऑफ सरदार २'

२६ सप्टेंबर हा दिवस नेटफ्लिक्सच्या प्रेक्षकांसाठी मनोरंजनाचा खजिना घेऊन येणार आहे. 'धडक २' आणि सन ऑफ सरदार २ हे दोन्ही चित्रपट येत्या शुक्रवारी प्रदर्शित होणार आहेत. तृप्ती डिमरी आणि सिद्धांत चतुर्वेदी यांचा 'धडक २' हा २०१८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'परियेरुम पेरुमल' या तमिळ चित्रपटाचा हिंदी रिमेक आहे. त्याचप्रमाणे २०१८ मध्ये प्रदर्शित झालेल्या जान्हवी कपूर आणि ईशान खट्टर यांच्या 'धडक' या चित्रपटाचा हा स्पिरिच्युअल सीक्वेल असल्याचंही म्हटलं जात आहे. 'धडक २' या चित्रपटात एका कॉलेजमधल्या तरुण–तरुणीची प्रेमकहाणी दाखवण्यात आली आहे. यात जातीभेदाचाही मुद्दा अधोरेखित करण्यात आला आहे.
'सन ऑफ सरदार २'देखील २६ सप्टेंबरला नेटफ्लिक्सवर स्ट्रीम होणार आहे. या चित्रपटाचा पहिला भाग २०१२ मध्ये प्रदर्शित झाला होता. 'सन ऑफ सरदार' एक क्लिन कॉमेडी सिनेमा होता. त्याने प्रेक्षकांचं भरभरुन मनोरंजन केलं. आता पुन्हा एकदा अजय देवगण जस्सीच्या भूमिकेत चाहत्यांचं मनोरंजन करण्यासाठी आला आहे. सहकलाकारांमध्ये दीपक






डोबरियाल, चंकी पांडे, कुब्रा सैत, संजय मिश्रा, अश्विनी काळसेकर, डॉली अहलुवालिया, मुकुल देव, विंदू दारा सिंग, साहिल मेहता, रोशनी वालिया आणि शरत सक्सेना ही मंडळी आहेत.

## मोहनलाल फाळके पुरस्काराने सन्मानीत

मल्याळम चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते आणि मोहनलाल यांना भारतीय चित्रपटसृष्टीचा सर्वोच्च सन्मान मानला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. २०२३ साठीचा हा पुरस्कार त्यांना २३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहे. १९७८ मध्ये मल्याळम चित्रपटसृष्टीत करीयर सुरू करणाऱ्या मोहनलाल यांनी केवळ एक अभिनेता म्हणूनच नव्हे, तर निर्माता, पार्श्वगायक, डिस्ट्रीब्युटर, दिग्दर्शक आणि उद्योजक म्हणूनही स्वतःची ओळख निर्माण केली आहे. १९८६ मध्ये आलेल्या 'राजविन्ते माकन' या चित्रपटाने त्यांना सुपरस्टार बनवले. १९८६ मध्ये एका वर्षात मोहनलाल यांचे तब्बल ३४ चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले होते. त्यावेळी मोहनलाल फक्त २६ वर्षांचे होते. या ३४ चित्रपटांमधील २५ चित्रपट बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर ठरले. दर १५ दिवसांनी त्यांचा एक चित्रपट प्रदर्शित होत होता. मल्याळम चित्रसृष्टीमध्ये मोहनलाल यांचं मोठं नाव आहे. त्यांनी मल्याळमसह तेलुगू, तमिळ, कन्नड आणि हिंदी चित्रपटांध्येही उल्लेखनीय भूमिका साकारल्या आहेत. कीरीदम, वानप्रस्थम, ल्यूसिफर, थानमात्र, दृश्यमसारख्या चित्रपटातील त्यांच्या भूमिका गाजल्या होत्या. नुकत्याच आलेल्या त्यांच्या 'थुदारम' या चित्रपटाने शंभर कोटी उत्पन्नाचा उच्चांक मोडला आहे.

